म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ललित
सं. क. ३७०३



पाऊलखुणा

विमला जोशी

REFBK-0024632

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

14 AUG 1985
28 AUG 1985
18 SEP 1985
[illegible] 1985
17 NOV 1985
19 MAR 1986
18 MAY 1986
11 OCT 1989
3 NOV 1985
1 DEC 1985
22 DEC 1985
29 DEC 1985
9861 NVI 6
9861 NVI 2
5 FEB 1986
19 FEB 1986
(क्र. मा. पहा)
५०००-३-८४
8 OCT 1989
DEC 1989

संदर्भ
निबंध (लेखिम) लेखा
3902
28E32
तत्पात्र

21 APR 1999

पाऊलखुणा

ललित लेख



पाऊलखुणा

विमला जोशी


REFBK-0024632

प्रपंच प्रकाशन

प्रपंच प्रकाशन १५९

प्रकाशक

माधव रा. कानिटकर
३८९ शनिवार,
पुणे ४११०३०

मुद्रक

म. शं. परभाणे
सुभाष प्रिंटिंग प्रेस
३९० क, शनिवार पेठ
पुणे ४११०३०

© विमला जोशी
१० अबोली अपार्टमेंटस्,
पुणे ४११००४

मुखपृष्ठ : रविमुकुल

आवृत्ती पहिली : ७ मे १९८५

मूल्य : चाळीस रुपये

सांगायचं ते एवढंच--

माझ्या ललित लेखांचा पहिला वहिला संग्रह प्रसिद्ध झाला तो १९८० मध्ये. "कोथिंबिरीची फुले." त्यानंतरही फुले फुलत होती-फुलत आहेत. आता पंचवार्षिक योजनेच्या चालीवर दुसरा संग्रह प्रसिद्ध होत आहे "पाऊलखुणा." पण एकंदरीत माझ्या लेखनाची गत "विलंबितच." १९८२ मध्ये "प्रपंच" प्रकाशनाच्या श्री. कानिटकरांनी "मानिनी"त एक सदर लिहायला सांगितलं, "मधु विन्दति." लेखनाची गती जरा "द्रुत" झाली. तरीही "अरे संसार संसार" असं म्हणत आणि असार सबबी पुढे करीत लिखाण सुरू असतं. कारण "डबा बाटलीय्" सारखा एखादा लेख रस्त्या-वरून फिरणाऱ्या "बाटली ऽ ऽ" बाईचा आवाज विरायच्या आत लिहून तयार होतो तर "क्षण असे हे चिरस्थायी" ची पाने दिवस दिवस फडफडत असत.

त्या उलट "आइनाखाना." आइनाखाना म्हणजे जिथे आरसा ठेवतो तो कोनाडा-जागा. एक दिवस ड्रेसिंग टेबलाजवळच्या स्टुलावर बसून, माझी नात आरशात पहात होती; माझं लक्ष नाही असं समजून. टेबलावरचे बाटल्या डबे मागे पुढे होत होते आणि माझ्या मनात शब्दही. संध्याकाळी गुलामअलीची गझल ऐकली, "आइने मे देखते हो-अंदाज अपने देखते है।" मनातल्या कल्पनांचा अंदाज आला आणि आइनाखाना पूर्ण झाला. अन् अशीच संध्या-काळच्या सांजवातीकरता फुलवात वळत असताना मनात "फुलवात" फुलून आली.

दिल्लीहून आल्या आल्या स्थिरस्थावर होत होतो; शेजारच्या घरातल्या मोराची केका ऐकली. दिल्लीच्या घरातल्या हिरव्याकंच गवतावर डौलात फिरणारा मोर आठवला. आठवणीचे मयूरपंख

– विमला जोशी

असेच एकेक करून फुलत जातात. त्यांना शब्दांचा साज चढवला जातो. " आम्ही घरं बदलतो," त्याचप्रमाणं जीवनही बदलत जातं. लहान घरातून मोठ्या घरात जावं तसं विशाल होत जातं. अनेक अनुभव गाठी पडतात. अर्थात ते असतात एका साध्यासुध्या गृहिणीचे, त्यात गगनस्पर्शी असं काही नाही. जीवनाचा असा " सव्हें " घेत असताना अनेक " सँपल्स " पहायला, अनुभवायला मिळतात. त्यांची नोंद मनात तर होंतेच पण पुष्कळदा ती शब्दातून व्यक्त करावीशी वाटते, तशी ती होतेही.

जसं घडलेल्या गोष्टीमुळे जीवन बनत जातं, तसंच ते अपेक्षिलेल्या पण न " घडलेल्या प्रवासामुळे"ही. अशावेळी दातओठ खाण्याशिवाय आपल्या हातात काहीच नसतं. पण त्याबद्दल मनात खंत न बाळगता त्यातली मजा अनुभवता आली तर कितीतरी बरं ! जीवनातले हे हलके फुलके क्षण, काही गंधित, काही जडभारी; ते चिर टिकणारे " अक्षर " नसतीलही. पण त्या क्षणाचा आनंद तर खरा असतो, माझ्यापुरता, असंच जे अनुभवलं, भावलं ते टिपलं, लिहिलं पण कशातही योजनेचा गंधही नव्हता–नसतोही.

त्या अनुभवांची ही शब्दरूपे, यांना रसिकापुढे स्थान प्राप्त करून दिलं ते ' मानिनी ', ' ललना ', ' कथालक्ष्मी ', ' सुवासिनी ' या मैत्रिणींनी. त्यांच्या आभाराचं देणं मनःपूर्वक देत आहे. या सगळ्या लेखांना पुस्तक रूपानं देखण्या स्वरूपात आपल्यापुढे सादर करण्याचे श्रेय श्री. माधव कानिटकरांचं, त्यांचे आभार. रसिकांनी वेळेचं देणं देऊन " मुलाहिजा " ठेवावा. पण शेवटी सांगायचं ते एवढंच " आमार जेटुक शाध्धो करिबो ताइ आमी–"

रामाय ।

। आत्मारामाय ।

१.	न घडलेले प्रवास	५
२.	पथेर पांचाली	१३
३.	आम्ही पार्टी देतो	२१
४.	फुलवात	२७
५.	विसरायला शिका	३५
६.	डबा बाटलीय्	४२
७.	मत्तमयूर–मुक्तमयूर	४८
८.	क्षण असे हे चिरस्थायी	५५
९.	सँपल सर्व्हे	६२
१०.	पाऊलखुणा	६८
११.	आम्ही घरं बदलतो	७४
१२.	दंतकथा–दातांचीच	८२
१३.	गंधयोजना	८८
१४.	न केलेले भाषण	९४
१५.	बा आदब ! बा मुलाहिजा	१०४
१६.	आइनाखाना	१०८
१७.	तुमची चिंता–आमचे लेखन	११५
१८.	माझे छंदोपाख्यान	१२२
१९.	आभार–एक मानणे	१३०
२०.	कॅमकाठची संध्याकाळ	१३७
२१.	वेळ–एक देणं, एक खाणं	१४७
२२.	अथा तो ब्रह्मजिज्ञासा	१५६

मराठी ग्रंथसंग्रहालय पुणे
३७०२
दा. क्र. २४६३२
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

पाऊलखुणा

न घडलेले प्रवास

केलेल्या प्रवासाची, अन् पाहिलेल्या अनेक नवनवीन स्थळांची मौज काही औरच असते. त्यातूनही प्रत्यक्ष दिलेल्या भेटीपेक्षा त्या या स्थळांची वर्णनं पुनः पुनः करण्यात, दुसऱ्यांना ऐकवण्यात तर जास्तच गंमत. त्या त्या वेळी वाटलेल्या आनंदाचा स्वाद आठवून आठवून घेतला जातो. नाविन्याच्या अनुभूतीबरोबरच, काहीतरी केल्याचा, अपेक्षापूर्तीचा आनंद असतो.

पण न केलेल्या प्रवासातही मोठी गंमत असते. वरवर पाहता, मोठा विरोधाभास वाटेल या वाक्यात ! जे केलंच नाही, झालंच नाही, त्यात काय मजा वाटणार ! कसला अनुभव घेणार आपण !

केलेल्या प्रवासाबद्दल, त्या त्या अनुभवांबद्दल आपण पानंच्या पानं लिहितो. मला तर वाटतं, न केलेल्या, न घडलेल्या प्रवासाबद्दलही बरंच काही लिहिता येईल. पुष्कळदा काय होतं, मनानं आपण पुष्कळ गोष्टींचे बेत करीत असतो; उदंड मनोरे रचीत असतो. त्याच्या साफल्याकरिता खूप तयारीही करत असतो. पण आयुष्यात असे अनुभव अनेकदा येतात; योजलेल्या गोष्टी, आखलेले बेत, रेखीवपणे, मुळीचंच अंमलात येत नाहीत.

हातात पकडता न येणाऱ्या हिमकणासारख्या त्या अपेक्षा जागच्या जागी विरघळून जातात. मग मन होतं खिन्न. निदान त्या त्या वेळेपुरती तरी, सगळ्या गोष्टींचो, आयुष्याचीच चव गेल्यासारखी वाटते.

अपेक्षाभंगासारखं, दुःख नाही ! पण मग अशा त्या त्या गोष्टीकडे जरा विनोदाच्या दृष्टीनं पाहिलं. (द लाइटर साइड ऑफ इट्), अपेक्षाभंग खिलाडू वृत्तीनं सहन केला, तर वाटणारी खंत कमी होतेच पण त्या त्या गोष्टींची दुसरी बाजू लक्षात येते. मग आपली आपल्यालाच गंमत वाटते. अनेक गोष्टी आपण गृहीत धरतो. पण होतात कुठे ! तरीही माणूस धडा घेत नाही त्यापासून ! मनासारख्या गोष्टी झाल्या नाहीत तर होणाऱ्या गोष्टीसारखं मन तयार करायला हवं !

आयुष्यात बेत करायचेच, आशा तर बाळगायच्याच, पण न झालेल्या गोष्टींबद्दल ना खेद ना खंत अशी वृत्ती ठेवायची. आपण प्रवासाची तयारी करतो. पेटच्या भरणं–लागणार असतील त्यापेक्षा जास्त कपडे असू देत जरा जास्तीचेच ! खाद्यपदार्थ, नको उगीच वाटेतलं अरबट चरबट ! म्हणून घरचे पदार्थ. अन् असं प्रवासाला जाताना जरासं घरपण आपण बरोबर घेऊन निघतो. खरं तर, घरातल्या, त्याच आयुष्यक्रमांचा कंटाळा आलेला असतो. उबग आला असतो.

म्हणूनच हवा असतो फरक–चेंज. वाटतं जावं हे सगळं सोडून नवीन ठिकाणं बघावीत. नव्या रुची घ्याव्यात. मग 'टु द लास्ट डीटेल्स' तयारी होते. पण तो प्रवास आपण जसा आखला-रेखल असेल तसाच होईल असं नाही. आपण म्हणत असतो – उद्या आपण यावेळी गाडीत, नंतर अमूक जागी–तमूक करत असणार.' मित्र मैत्रिणी भेटतील–गप्पा रंगतील. मनानं, आपण आत्ताच इच्छित स्थळी पोहोचलेलो असतो. देह येथे तर मन तिथे अशी स्थिती ! नाही तरी शरीरापेक्षा–मनाचा वेग खूपच असतो–धाव लांब पल्ल्याची असते. पण प्रत्येक वेळी त्या मनामागे शरीराला जाता येतच असं नाही. 'कप आणि ओठ' यावद्दलची म्हण पाठ असली तरी ती दुसऱ्याच्या बाबतीत.

पण मग कुठंतरी खुट्ट होतं. हातातला पेला ओठापर्यंत जात नाही. बांधलेले बिस्तरे उघडले जातात, सगळी तयारी अन् आपण

आपल्या कार्यक्रमातला उद्या उजाडला तरी, आपण आजच्याच जागी असतो. त्याला कारणं अनेक असतात. काही अगदी साधी–आडवं गेलेल्या मांजरासारखी – काही आपल्या कुवती पलिकडची ! फक्त आपल्या हातात एवढंच असतं, जो आज आपल्या समोर आहे, तो मजेत घालवायचा.

भोज्याला हात न लावताच, एकदा आम्ही परत आलो, त्यावेळची गोष्ट ! दिल्लीहून हिस्सारला जायला निघालो, त्यावेळची गोष्ट. साधारण तीन तासांचा प्रवास. कारण रस्ता म्हणतात तसा पायाखालचा किंवा टायर खालचा पण 'टायरिंग' न होणारा, पावसाळा बहुतेक संपतच आलेला अन् दिल्लीचा पाऊस तो काय ! हवा छानच होती. बरोबर अगदी अर्धा प्रवास सुरळीत झाला. सुळसुळीत झाला. रेशीम वस्त्राची घडी उलगडीत जावी तसा.

मग जो पाऊस सुरू झाला की विचारू नका. असा अर्धवट पाऊस तिकडे खूप. इकडे पाऊस तिकडे ऊन–मध्ये रेषा सरळ आंखून घ्यावी. एक पाऊल पाण्यात, एक पाऊल उन्हात. तर असा पाऊस. अन् हिस्सारच्या बाजूला तर खूपच वाटत होता. नेहमीप्रमाणे पावसाळ्यामुळे रस्ते खराब झालेच होते; काही ठिकाणी पावसाळ्याचा मुहूर्त साधून नीट करायला काढले होते. खूपच डबकी साचली होती. गाडी हळूहळू, डबकी वाचवत, नागमोडी गतीनं, आमची कंबर मोडीत चालत होती. इतक्यात, समोर पाहिलं तर खूप चिखल. पाणी असलेल्या मोठ्या खड्ड्यात दोन अजस्र ट्रक्स, समोरून येणारे. अडकून पडले होते; तेही तिरके एकाच डबक्यात दोन म्हशी पाणी प्यायला याव्यात तसे उभे होते ! पुढचा रस्ता पार अडवून-नेहमीप्रमाणं त्यांच्या मागून येणाऱ्या वाहनांनी त्यांना 'ओव्हरटेक' करण्याचा प्रयत्न करून रस्ता अडवण्यास हातभारच लावला होता ! आजूबाजूचा रस्ता कच्चा ! त्यामुळे 'रस्ता बंद आणि कामही बंद' अशी स्थिती होती !

त्या अडलेल्या ट्रक्समागे आणि आमच्याही गाडीमागं मोटारींची आणि इतर वाहनांची रांग लागणार असा रंग दिसू लागला.

माणसांचे नेहमीचे घोळके तर होतेच ! तेव्हा थांबलेल्या वाहनांमध्ये आमचं 'सॅन्डविच' होऊन दीर्घ काळ रस्त्यावरच मुक्काम ठोकावा लागणार असं वाटू लागलं. अन् मग, मागच्या गाडीवाल्यांचे शिव्या शाप घेत, आमच्या ड्रायव्हरनं गाडी झटक्यात 'राईट अबाउट टर्न' केली अन् दिल्लीकडे परत फिरलो. आणखी २॥–३ तासांनी, घरी येऊन, घरात सकाळी तीन-तीनदा पाहून बंद केलेलं कुलूप काढलं, तेच तोंडाला लावलं; पिठलं-भाताची तयारी केली.

हिस्सारला मात्र भलीमोठी मेजवानी आमची वाट पाहात होती. आम्ही उनउनीत भात खात असता, तिकडे पुलाव 'थंडा' होत होता. त्या तांदुळावर आमचं नाव नव्हतं. संध्याकाळी तिकडून आलेल्या फोनवरून, तिकडच्या लोकांना वाटत असलेली काळजी व्यक्त होत होती. पुष्कळदा दाखवलेला आनंद वर-वरचा असला तरी ती काळजी खरी तरी वाटत होती. जाण्या इतकंच न जाण्यानी त्यांचं प्रेम व्यक्त झालं होतं !

मांजराप्रमाणंच, मार्जार वृत्तीची माणसंही कशी आडवी जातात आपल्या बेतांत ते बघा आता ! आमच्या आजोळच्या गावचे एक सद्गृहस्थ. आडनाव पिंगळे. लोक त्यांना म्हणत पिंगळा ! हें असेच नेहमी आडवे जायचे. एकदा काय झालं, आम्ही परत निघालो आजोळहून. आमच्या गावी शाळेच्या उन्हाळ्याच्या सुट्टया संपत आल्या होत्या ! जवळ सामान अर्थात्च अमाप ! आजीनं कौतुकानं दिलेलं. नातीला हे आवडतं अन् नातवाला ते आवडतं ! नेहमीचाच घोळ ! स्टेशनवर जाण्याची वेळ झाली. त्या काळी टांगेच असत. ठरलेला– हक्काचा महादेव टांगेवाल्याचा टांगा दाराशी वेळेआधीच उभा सामान टांग्यात, आमच्या हातावर दह्याची कवडी, आजीच्या डोळ्यांत पाणी. आजोबा डोक्यावर टोपी ठेवून उभे. तर पिंगळे उभे समोर दत्त म्हणून. अर्थात् दत्त म्हणणंही चुकीचं.

'काय भाहेरवाशीण चालली वाटतं परत. पण आजचा दिवस फारसा बरा नाहीये. लेकुरवाळीनं तर मुळीच नको जायला,' त्यांनी असा नाट लावल्यावर आजीचं मन घेईना. गुरुवार वार बरा, त्या

पलीकडं आजोबा बघत नसत. जावयांचा हुकूम हाच मुहूर्त त्यांच्या लेखी ! आम्ही मुलं कुरकुरायला लागलो पण एवढी छातीठोकपणं वाईटाची गॅरंटी दिल्यावर आजी जाऊ देईना. सामान टांग्यातून काढलं. तरी बरं, तिकीट रिझर्व करायची जरूर त्याकाळी नसे. स्टेशनवर जायचं लवकर. हमालानं जागा पकडून द्यायची !

मग काय, पिंगळ्यासकट सगळे घरात आलो. रात्री सगळ्यांनी मिळून टिफिन कॅरिअरमधली बटाट्याची भाजी अन् पुऱ्या खाल्ल्या. पण इंजिनच्या कोळश्याची चव त्यात मिसळली नसल्यामुळं ती गंमत आली नाही. दुसऱ्या दिवशी तीच वेळ, तीच तयारी, अन् तेच पिंगळे पण आमच्या बरोबरच गाडीत. गावी पोहचण्याच्या गॅरंटीसह. पण मूड मात्र तो नव्हता. आता हा शुभाशुभाचा मुद्दा. आपण अमावस्या वाईट समजतो. दाक्षिणात्य चांगली मानतात.

पण माणसांच्या सारखाच निर्जीव पदार्थांचाही प्रभाव पडावा म्हणजे काय ! करंजीला घातलेल्या मुरडीमुळे प्रवासालापण मुरड-घालावी लागली ह्याची ही खुशखुशीत कथा—मोहन न घालता झालेली! माझा भाऊ त्यावेळी कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होता. त्याच्या मित्राचं लग्न ठरलं. अर्थात् सगळ्यांना आग्रहाचं आमंत्रण असणारच. उन्हाळ्याच्या सुट्ट्या होत्या. तर भाऊ निघाला मित्राच्या लग्नाला. आमच्या शेजारच्या आजीबाई करंज्या तळीत होत्या, त्यांची मुलगी माहेरपणाला येणार म्हणून. माझा भाऊ गावाला जाणार म्हणताच, त्यातल्या दोन करंज्यांना त्यांनी सुरेखशी मुरड घातली (आम्हाला करंज्यांना तर नाहीच पण कशालाही मुरड घालतां येत नाही). गरम गरम तळलेले हे खुशखुशीत मुरड कानवले ताटलीत घालून भावापुढं ठेवले.

भाऊ म्हणाला 'पण आजीबाई आता कुठं खाऊ घाई गर्दीत हे गरमगरम मुरड कानवले ! पोट भरलंय् तुडुंब अन् जायची पण वेळ झालीय.' मग काय शास्त्रच आडवं आलं. खाण्याचं नाव काढलं की जाऊच नये मुळी कुणी ! न खाता गेल्यामुळे घडलेल्या वाईट गोष्टीची जंत्री ऐकण्यापेक्षा भावानं गरम करंजी तोंडात कोंबली, आपल्या आजीबाईचं तोंड बंद व्हावं म्हणून. तोपर्यंत आणलेल्या टांग्यात, आम्ही

त्याचं सामान ठेवलं होतं. टांगेवाला अन् घोडा दोघेही अधीर-अस्वस्थ झाले होते.

भाऊ बसताच टांगेवाल्यानं चाबूक फडकविला. आता फक्त दहा मिनिटाच्या अंतरावर स्टेशन राहिलं होतं. अन् घोड्यानं मनावर घेतलं सत्याग्रह करण्याचं. चौखूर उधळण्याऐवजी, चारी पाय भूमीवर रोवून उभं, एखाद्या शिल्पासारखं. टांगेवाल्यानं 'झ्याक झ्याक' पासून चाबकापर्यंतची आपली सगळी अस्त्रं वापरून पाहिली. घोडं रेसभरही पुढं सरकेना. मग त्यानं टांगा वळवून दुसऱ्या रस्त्यानं घेतला, पण शेवटी स्टेशनला जाणारा एकच तोच रस्ता होता, त्यामुळं, कुठूनही टांगा घेतला तरी त्या विवक्षित स्थळी यावच लागे. अन् घोडा तिथेच अडे. पाण्यात धनाजी दिसणाऱ्या घोड्यासारखीच याही अश्वश्रेष्ठाची अवस्था झाली होती, अन् मग काय, चुकली की गाडी माझ्या भावाची! गाडीही चुकली अन् लग्नाचा मुहूर्तही ! अर्थातच ही अश्वकहाणी त्या नववराला मान्य झालीच नाही. घोडा का अडतो, न फिरविल्यामुळे. पण हा तर चालता चालताच अडला !

रडत राऊत घोड्यावर बसला तर काय स्थिती होईल, कल्पना करता येते. पण घोडाच, रडका नव्हे अडका निघाला तर राऊत काय करणार ? मुरड कानवला देतात, तो जाणारा मूरडून लवकर परतावा म्हणून. पण त्याचा परिणाम इतका तत्काळ होईल, इतकी 'एक्सप्रेस डेलिव्हरी' होईल हे स्वप्नात देखील नव्हतं. भाऊ परत आला तरी आजीबाईच्या करंज्या चालल्याच होत्या.

परवा परवा तर आम्ही निघालो होतो न्यूयॉर्कला जायला ! तयारी पण जवळ जवळ तितक्याच लांबीची केलेली ! पण आत्तापर्यंतच्या अनुभवावरून जाहिरात मात्र केली नव्हती जाण्याची. कानवल्यापासून कुत्र्यापर्यंत कुणीतरी कडमडायचं, अन् झालंही अगदी तसंच. न्यूयॉर्कला जायला म्हणून घरातून निघालो. गेलो मात्र फक्त मुंबईपर्यंत. ती कथा ती मात्र आत्ताच सांगणार नाहीये. पण घरी परत आल्यावर 'डीफ्रॉस्ट' केलेला फ्रिज सुरू केला, फ्रिजबरोबरच माझंही फ्रॉस्टिंग सुरू झालं. कारण अशावेळी बर्फाची लादीच डोक्यावर ठेवायला

हवी. अर्थात् एकदा सेन्डॉफच्या पार्टर्या खाऊन, मग परदेशची ट्रिप रद्द झालेल्या आमच्या मित्रापेक्षा आमची स्थिती खूपच चांगली होती. अशा वेळी आपले प्रवास दुसऱ्यावर किती अवलंबून असतात ह्याची जाणीव होते. अनेक गोष्टी आपल्या आवाक्याबाहेरच्या, कल्पनेपलीकडच्या असतात. पण अनेकदा असतात क्षुल्लक !

आता रस्त्यावर काय कुत्री नसतात ? पावसाळ्यात जशी शेतात उगवतात तशीच रस्तोरस्ती पसरलेली. तर हे निघाले दौऱ्यावर. रस्ता दर महिन्याला अनेक वेळा जाण्यायेण्याचा. किती मिनिटांनी कुठलं गांव हा हिशेव पक्का. आपलं गांव आलं की सर्व प्रवासभर काढून ठेवलेल्या वहाणा पायानं शोधायच्या, आणि किल्ल्या पर्समध्ये पाहावयाच्या हे सगळे डोळे मिटून, ठरलेलं. रोज विचरून विचरून, भांग जसा आपोआप पडतो, तसंच या रस्त्याचं.

अशा सरावाच्या रस्त्यानं हे निघाले. बरोबर २।३ अधिकारी कामासाठी घेतलेले. वेळ सकाळची ७॥–८ ची प्रसन्न. साधारण अकराचे सुमारास पोहोचणार हे नक्कीच. टा–टा करून मी घरात वळले. म्हटलं प्रथम सटर फटर – साचलेली कामं करू, मग बाहेर फेरफटका. जेवणारी मी एकटीच. तेव्हा स्वयंपाक स्वल्पच ! रोजच्या मानानं साडेअकरा उशीराच वाजल्यासारखे वाटले. म्हटलं, उदरभरणच करायचं, तर करून टाकावं ! खिचडीचं भांडं टेबलावर घेतलं, अन् दाराची घंटा वाजली. घास ओठापर्यंत गेलाच नव्हता. दार उघडलं तर हे उभे दारात, आपल्या बरोबरीच्या लोकांसह.

जेवायच्या वेळी, १२ वाजता, कधी कधी परमेश्वर उभा ठाकतो म्हणतात, तशी ही त्रिमूर्ती उभी दारात ! प्रश्नांची सरबत्ती करण्यापूर्वी अगोदर थंडगार सरबत केलं, मग चारीठाव स्वैपाक झाला. तो किस्सा असा. घर सोडल्यानंतर एक तासाच्या आत एक कुत्रं गाडीसमोर आलं. रस्तो-रस्ती कुत्र्यांची मुटकुळी पडलेली असतात. वाहनं आलं की ती वेटोळी उलगडली जातात. अन् बरोबर चुकीच्या दिशेनं धावतात. तसंच हे धावलं, गाडीला आपटलं–अन् आटोपलंच.

गाडीचा समोरचा रेडिएटर फुटून गाडी अन् कुत्रं दोघांनाही गळती लागली. पुढे जाणं अशक्यच. गळक्या गाडीतून बसस्टॉप गाठला सगळ्यांनी. एका भरलेल्या बसमध्ये जेमतेम एका पायावर उभं राहून सगळे परतले होते. खिचडीच्या खरपुडीशी ही खमंग कहाणी श्रवण केली. घासा–घासाबरोबर जाणवत होतं, जाणाऱ्यानं 'जातो' म्हणण्यापेक्षा 'येतो' का म्हणावं ते ! अहो, हेच काय, रोमच्या एअरपोर्टवर जाऊनही रोम शहरात न जाता, थेट हिंदुस्थानात परतण्याचे प्रकारही आमच्याकडे घडले आहेत !

अशा अनेक गोष्टी ! प्रवासाला निघालं म्हणून तो झालाच असं नाही. मी तर सगळं भटकणं आटोपून घरी परत आल्यावरच तो प्रवास पूर्ण झाला असं समजते आता ! नाहीतर मला 'असं झालं असतं' असंच घोकावं लागतं. एक लेखक अशा न घडलेल्या गोष्टीबद्दल म्हणतो, 'दे एनेबल हिम टु प्ले द गेसिंग गेम ऑफ माइट हॅव बीन–'

इंग्लिशमध्ये अर्विंग स्टोनचं एक पुस्तक आहे. 'दे आल्सो रॅन' जे अमेरिकेचे अध्यक्ष झाले नाहीत, त्यांच्याबद्दल. प्रवासाला निघाले. पण मुक्काम गाठला नाही. तसलेच हे प्रवास–मुक्काम न गाठलेले ! ह्या सगळ्या असल्या प्रकारानंतर मात्र प्रकर्षानं वाटतं :

' अनृणीच अ प्रवासी च स वै चिरं मोदते !

उसनं न काढणारा आणि प्रवासाला न निघणारा नित्य आनंदात असतो.

* *

पाऊलखुणा

पथेर पांचाली

पाहिला आहेत तुम्ही हा सत्यजीत रे चा सिनेमा ? खूपच सुंदर आहे म्हणतात. म्हणजे खरं तर मी पण पाहिलाच नाही. पण आजच्या लेखाला शीर्षक म्हणून मला तो शब्द आवडला. अन् त्याचा अर्थही ! अन् नादमधुरता पण किती आहे !

पथेर पांचाली यातल्या पांचालीचा, महाभारतातल्या पांचालीचा–द्रौपदीचा अगदी संबंध नाही. आपण शब्दांचे अनर्थ करतो ना पुष्कळदा, यातलाच हा प्रकार. ह्या शब्दाचा उच्चार पांचाली पायाने चाल–पाथेर पांचाली–पथावरची वाटचाल; आपण मात्र द्रौपदीला रस्त्यावर आणली! पण ही वाटचाल, नेहमीच्या रस्त्यावरची असो अथवा जीवनातील असो; त्या चालीच्या वाटेवर, प्रकारावर, आपण इच्छित स्थळी कसे पोहचतो–पोहचतोच की नाही, हेही अवलंबून असतं नेहमीच !

'पथि चालता पडती तुझी किति संथ कोमल पाऊले–' कवि म्हणतात असं! पण पथावर पडणारं प्रत्येक पाऊल नेहमीच कोमल असतं, अथवा नेहमीच त्याची कोमलता शेवटपर्यंत–आयुष्याच्या वाटचालीत कायम राहील असं म्हणता येणार नाही. अन् आयुष्याच्या चढाओढीत तर संथ पावलं अन् मंद बुद्धीही कधीच काम देत नाही. (अर्थात् ती पावलं प्रियेची असतात तोपर्यंत ठीक असतं !) ही मंद चाल या धकाधकीच्या आणि धक्काबुक्कीच्या प्रवासात, वेळेवर आपल्या ठिकाणी जाणारच नाहीत. मागची पुढं जातील. तेही ठीक आहे.

हवं तर जाऊ द्या त्यांना पुढं ! पण आपली तरी आपण स्थिर ठेवली पाहिजेत.

तेव्हा ठिकाण नीट वेळेवर गाठायला आपली जागा राखायला तरी पावलं तत्परतेनं पडायला हवीत. अन् तरीहि ती फार जलद गतीनं नकोत. दमछाक व्हायची. आयुष्यात हे गतीचं नियंत्रण फार कठीण आहे तरी जरूर आहे. गतीवरचा ताबा गेला की आयुष्यात अपघात ठरलेलाच. चालण्याची रेसही लागता कामा नये अन् रेसभर मागेही राहून उपयोगी नाही. अशी ही गतीवरच प्रगति अवलंबून असते. कारण–

'उनसे कहदो, नही आहिस्ता रखते जो गोदाय (पाऊल) गिरही पडते हैं बहुत दौडके चलनेवाले–'

कुणीतरी तिला सांगा, जरा हळूच, जपून पाऊल टाक म्हणून ! फार वेगाने पळणारे आपटी खातात ! लहानपणी नाही का आपण बाळाला सांगत 'चाल चाल माते पायी मोडले कांटे–' पहिलंच पाऊल टाकताना जणू आपण संभाव्य संकटाची सूचनाच देत असतो.

सगळ्या जीवनाचं काय, रोजचं साधं रस्त्यावरून चालण्याचं देखील बघाना ! ह्या चालण्याबद्दल एक इंग्लिश लेखक म्हणतो 'द आर्ट ऑफ वॉकिंग इज ॲट वन्स् सजेस्टिव्ह ऑफ द डिग्निटी ऑफ मॅन.' सध्या रस्त्यावरून सरळ चालणारी माणसं किती दिसतील ! अन् रस्ते तरी कुठे साधे–सरळ असतात. कधी लक्षात येतंय् आपल्या. माणसांचे अनेक प्रकार अन् अनेक चालींची माणसं. कोणी झपझप चालताहेत, अगदी फुरसत नसल्यासारखं अफाट. उलट कुणी रेंगाळत रेंगाळत, सगळाच वेळ यांच्या हातात असल्यासारखं, अफाट आयुष्य पुढं पडलंय् असं. बैलाला कसं 'झिय् बैला झिय्' करीत पराण्या टोचतात तसं वाटण्यासारखं. तरी खरोखरीच तिरप्या तिरप्या चालत जाणाऱ्या गाईच आपली गति आडवतात !

आता कोणी खाली मुंडी अन् पाताळ धुंडीसारखी खालमानेची माणसं कदाचित खोल मनाचीपण असतील. जणू काय अगदी धरणीचा ठाव घेण्याकडे नेत्र लागलेली. तसं कोणाचे ऊर्ध्वनेत्र, नेहमीच वरती लागलेले. काही आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीची जाणीव नसणारे.

कोणाचे पायाबरोबर हातही हालताहेत तर कोणाची पायापेक्षाही तोंडं जास्त हलताहेत. खरं तर पायाच्या गतीपेक्षा तोंडाची गती नेहमीच कमी असावी.

आपल्याला शिकवण असते, नीट नाकासमोर पाहून चालावं ! पण एखाद्या वेळी, कुणी चालतोय एक बाजूला अन् पाहतोय दुसऱ्या बाजूला... संक्रातीसारखा ! अन् मग होतं काय, रस्त्यावर त्याच्यावरच संक्रांत गुदरायची ! परवाचीच गोष्ट. एक तरुण मुलगी रस्त्यावरून अशी तिरकी तिरकी चालली होती, रस्ता ओलांडत. आता रस्ता ओलांडताना दोन्हीकडं बघावं की नाही, पण ही आपली फक्त डाव्या बाजूला पाहात पाहात जात होती, जणू काय त्या बाजूनं कोणी हवंसं माणूस येतय् ! मी रिक्षात होते. रिक्षावाला आपला पोंगानाद करतोच आहे. अन् हळूहळू शंखनादही. ही आपली आपल्याच नादात चालली होती. रिक्षाशी होणारी टक्कर रिक्षावाल्याच्या कौशल्यामुळे वाचली. नाहीतरी 'रिक्षा रक्षति पुण्यपत्तने !'

तर असं चालताना, अन् आयुष्यात वागतानाही, कधीही कुठेही भान सोडून उपयोगाचं नाही. आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचं भान राखून जो वागतो, तोच शेवटपर्यंत टिकतो, अर्थात भान हरपणं वेगळं आणि सोडणं वेगळं. हे तारतम्य प्रत्येकच गोष्टीत असायला, ठेवायला हवं !

पुष्कळदा, माणसं रस्ता भरून चालत असतात. घोळक्या घोळक्यानं जात असताना फूटपाथ हे बहुधा शोभेकरतां किंवा विक्रीवाल्यांसाठीच बांधले असावेत असं वाटतं. दिल्लीला तर सोमवारी असा 'फूटपाथ बझार'च भरतो अन् तो आम्हा स्त्रियांना फार आवडतो. कारण सगळ्या दुकानातला माल ओळीनं लावलेला, तसाच एकापुढे एक पाह्यला मिळतो. दुकानात जाण्याची कटकट नाही. पण त्यामुळे होतं काय कीं सामान फूटपाथवर अन् माणसं रस्त्यावर. अन् मग अशी गर्दी होते ! "भाऊबंदकी"त भिकंभट म्हणतो कीं, नाही 'रस्त्यावरची गर्दी अगदी खपेनाशी झाली आहे'– अन् मग आपणच ओरडतो

'पळा पळा गारदी आले' – रस्त्यावरची गर्दी अर्थातच पांगते. मग त्याला 'आता रस्त्यावर चालायला कसं मोकळं मोकळं वाटतं!'

अन् त्यातही काय होतं, रस्ता आपल्या इतकाच दुसऱ्याचाही असतो ही जाणीवच नसते बहुधा. अर्थात अशी माणसं मग हे अगदी फक्त आपल्याचपुरतं आहे, आपल्याचकरता आहे, अशा भावनेनं वागत असावेत. 'नमवी पहा, भूमि हा चालताना'. हे सगळं ठीक आहे. कारण माणसाच्या बारीक सारीक वृत्तीतून त्याचं व्यक्तिमत्व प्रतीत होतं. म्हणूनच की काय, माणसाची चालरीत पाहावी असं म्हणत असावेत. चालीवरून त्याची रीत कळते.वागण्याची, आयुष्य जगण्याची!

रस्त्यात आपल्याकडे काही ठिकाणीच फक्त 'सायलेन्स झोन्स' च्या पाट्या लावलेल्या असतात. पण खरी शांतता असते कुठे! रस्त्यावर, घरात, आयुष्यात! आता जीवनातल्या शांततेबद्दल माहिती नाही. पण परदेशांत बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर मात्र शांतता, आढळते. रस्त्यानं चालणारी माणसं तशी कमीच. वाहनंच जास्त. रस्ते बहुधा प्रशस्त लेनचे, नीट खाणाखुणा, मोठमोठ्या शहरातच नव्हे तर उपनगरं खेडी म्हणून समजली जातात अशा ठिकाणीदेखील रहदारी नियमित, सुव्यवस्थित. वाहनं उजव्या बाजूनं व्यवस्थित पण झपाट्यानं मार्गक्रमण करीत असतात.

एकदा मात्र मोठं विचित्र दृश्य पाह्यला मिळालं. न्यूयॉर्कमध्ये 'बेअर माऊंटन पार्क' बघायला म्हणून निघालो होतो. आजूबाजूला दाट जंगल, पण सुरक्षित ठेवलेलं. रस्त्याच्यामध्ये नीटस दुभाजक. 'सुंऽई–सुं–ई' करत मोटर्स पळत होत्या. आमच्या समोरच दोन मोटार गाडचा जवळ जवळ समांतर पळत होत्या. अन् एका गाडीतली स्त्री दुसऱ्या गाडीतल्या माणसाबरोबर आपल्या सिगरेट्ची अदलाबदल करत होती! वाटत होतं, आता दोन्ही गाडचा एकमेकावर आपटणार–जवळ जवळ तीन–चार किलोमीटरपर्यंत हा प्रकार चालू होता. मीच श्वास रोखून पाहात होते. इतर मोटर्स त्यांना सफाईनं टाळून पुढे जात होत्या, हॉर्न न वाजवता. आम्हीही वाट मिळताच

पुढे गेलो. हाही एक अनुभव ! हीही एक चाल ! ! आपल्याला न पटणारी–आपला रस्ता तो नसल्यामुळे !

एवढं मात्र खरं, चालताना आपण बघत राहावं अशी खूप गंमत दिसते. आपलं चौफेर लक्ष मात्र हवं. दिवाळीच्या आसपासचे दिवस. आमच्या घराशेजारच्या कोपऱ्यावर स्पॅथोडियाचं झाड काय डंवरलं होतं ! लाल फूल आणि हिरवी कंच पानं. असं वाटायचं त्या अग्निफुलाला हात लावला तर ऊब येईल, तर कधी कुणाच्या गरीबशा खोपटावर निळावंतीची वेल मोठ्या दिमाखानं चढलेली असावी.

पण जमलंच तर आपल्या देवासाठी, दुसऱ्यांनी कष्टानं लावलेली फुलं घाईघाईनं ओरबाडण्या पलीकडे त्या फुलांच्या सौंदर्याची अनुभूति घेण्यासाठी बहुतेकांना वेळ कुठे असतो, या चालण्याच्या शर्यतीत! खरं तर जीवनाची ही वाटचाल सर्वार्थानं सर्व दिशांचं अवधान राखून व्हायला हवी. आयुष्यात मिळेल तेवढं ओरबाडण्यापेक्षा कुठलीही, कशीही वाट आपल्या नशिबी येवो, या प्रवासात आपण आनंदयात्रीच असायला हवं.

एका ठिकाणी म्हटलं आहे, 'चरन्वै मधुविन्दति'– जो चालत राहतो तो मध गोळा करतो– मला तर वाटतं, मधु गोळा करता–करताच चालत राहावं,मधमाश्यांचे डंख सहन करीत करीत,उन्हाळ्यात तापणारा उष्मा सहन करीत, गुलमोहराचं झाड व्हावं. थंडीत हाडाला बोचणाऱ्या थंडीत रक्तपर्णीच्या (पॉन्सेटिया) लाल रंगात गुल् होऊन जावं. ह्या झाडाबद्दल कवि म्हणतो.

'पान्सेटिया रीगल फ्लॉवर ऑफ विंटर.
इफ् इट्स ट्रु.
दॅट ओन्ली वन् फ्लॉवर ग्रेसड् दॅट लोन्ली स्टेबल.
वॉज इट् यू? '

हाताच्या ओंजळीतून सौंदर्य निसटून जावं असं हे फूल. रस्त्या-वरून जाताना थांबाच क्षणभर ह्याच्याजवळ.

हेही मात्र खरं, नेहमीच आकाशातले तारे मोजत निघालो तर दिवसाच डोळ्यासमोर काजवे चमकायचे ! पायाखालचे खाचखळगे लक्षात यायचे नाहीत. पाय वाकडा पडायचा, मुरगाळायचा. तेव्हा

आयुष्यातही 'वर पाहू किंवा खाली' अशी अवस्था होते– कारण रस्त्यात नेहमीच, जागोजागी, धोका! 'काम चालू– रस्ता बंद' अशा पाट्या लागलेल्या, अन् आपण आट्यापाट्या खेळाव्या तसं चालत असतो. पण काम बंद होऊन रस्ता सुरू झाल्यावरही धोका नाहीसा झालेला असतोच असं नाही. धोक्याचा लाल कंदील नेहमीच लक्षात ठेवायला हवा. धोका कधीच बंद होत नाही. पण त्यामुळं आयुष्यातली वाटचाल थांबवायची, घाबरून जायचं, असं मात्र नाही,

'कधी काटे अनेक वाटेवर
कधी फुले पसरली सुकुमार
असाच हा प्रवास–पथ असतो.'

दिल्लीला पूर्वी तांगेवाले ओरडायचे, रस्त्यानं जाताना– 'बचके-बचके'. म्हणजे ते चालले आहेत मस्तीत, आपण आपल्याला वाचवायचं. रस्त्यानं जाताना, दुसरा चुकीच्या मार्गानं जाणार हे गृहीत धरूनच आपण आपला मार्ग चोखाळायचा. लहान मुलं कशी चालवली जातात रस्त्यानं पाहिली आहेत? ती आपल्या आतल्या बाजूला हवीत. त्यांच्या आणि रस्त्याच्या मध्ये आपण उभं असायला हवं, त्यांना समजेपर्यंत. आमचा एक मित्र नेहमी म्हणतो, 'शाळा सुरू होताना आणि सुटताना त्या मुलांना रस्ता ओलांडायला (अन् मला वाटतं वृद्धांनाही) कुणी मदत केली तर केवढं समाजकार्य होईल!

आयुष्यात, अनेकदा, वाहनच नव्हे तर माणसं पण 'रॉंग साईडेड ओव्हर टेकिंग' करत असतात. अपघात होतात. आयुष्यं खराब होतात. आमच्या एका रसिक मित्राच्या बासरीचे सूर अशाच ओव्हर-टेकिंगमुळे कायमचे बंद झाले. माझ्या एका गाणाऱ्या मैत्रिणीचा गळा काही दिवसांकरता अबोल झाला. म्हणूनच या अथवा कुठल्याही वाटचालीत नियमबद्धता असणं जरूर आहे. आवश्यक आहे.

एकदा काय झालं, आमच्या ड्रायव्हरनं गाडी उभी केली ती बरोबर 'नो पार्किंग' या पाटीखाली. त्याला वाटलं, काय ते काम पटकन् करून झटकन् परत येऊ! पण कसचं काय! आलेच तेवढ्यात पोलीसदादा. मग थोडीशी शब्दाशब्दी. पण मग जेव्हा ड्रायव्हरला

म्हटलं 'बघ, तरी मी तुला सांगत होते, पोलीसाचं म्हणणं अगदी बरोबर आहे.' प्रथमच कायदा बरोबर आहे असं म्हणणारी बाई पाहून तो पोलिसही चकीत झाला असावा. (अदरवाइज वुई आर लॉ अनटू अवरसेल्व्हज्). जोराची तंबी देऊन सोडून दिलं त्यानं. पण असे अतिक्रमण आपण पुष्कळदा करतो, दुसऱ्याच्या जागेवर, वस्तूवर, वेळेवरसुद्धा, नको त्यावेळी त्याचा वेळ खाऊन! आक्रमण करणं आणि केलेलं बरोबर आहे हे दाखवण्याचा अट्टाहास करणं– विनाकारण माणसं दुखावली जातात.

'म्हणूनच, काही काही वाहनांवर लिहिलेलं हे वाक्य–'सुरक्षित अंतर ठेवा'–मला फार महत्वाचं वाटतं, दोन वाहनांमधील अंतर योग्य तेच हवं. नाहीतर एकमेकांवर आपटण्याचा संभव. पण तोच नियम व्यक्तीव्यक्तीमधल्या संबंधालापण लागू नाही का! दुरावा कोणाकोणाशी का करावा! किती जवळीक ठेवावी–किती अंतर असावं, ही सापेक्ष बुद्धी जीवनातही हवीच. दुराव्यानं मनं–नाती–मैत्रीचे संबंध तुटतात– फार जवळीकीनं अतिपरिचयात् अवज्ञा होते.

पण वाहनंही फार दूर असली एकमेकांपासून, म्हणजे मध्येच दुसरं येऊन घुसतं. परवा एक 'अमर सर्कस' नाव लिहिलेली रिक्षा आमच्या समोर येऊन उभी राहिली, अन् पाहता पाहता अशी गर्कन् फिरली की आम्हालाच जीव वाचवण्याकरता सर्कस करावी लागली! पण तोल सांभाळण्याकाता अशी तारेवरची सर्कस आयुष्यात नेहमीच करावी लागते, नाही का!

अन् मग असंही होतं ह्या वाटचालीत अनेक वेळा. ठरलेल्या वाटेपेक्षा वेगळचा वाटा शोधाव्या लागतात. ज्या वाटेवरून जायचं नाही ती कशाला विचारायची असं म्हणतात खरं– पण असं एकांगी असूनही चालत नाही. आयुष्यात जितकं सगळचा अंगानं ज्ञान मिळवता येईल, तितकी आपल्याला आयुष्याची दिशा अन् वाट ठरवण्यास मदत होईल. कारण 'कहाँके पथिक! कहो' असा सवाल आपल्याला कोणी केला तर नक्की जबाब देता येईलच काय!

तर ही अशी अनेकांची, अनेक वाटांवरची, अनेक प्रकारची वाटचाल. कोणी सारी सारी वाटचाल एकट्यानंच करतो तर एखादा कवि असंही म्हणतो–

'चलो तो सारे जमाने को साथ लेके चलो'

* *

पाऊलखुणा

आम्ही पार्टी देतो

आम्ही, म्हणजे खरं तर मी असंच म्हणायला पाहिजे. पण आमंत्रण देताना हल्ली पाश्चिमात्य पद्धतीप्रमाणे, मिस्टर अँड मिसेस सो. अँड सो (पण म्हणजे अगदी सोसोच नव्हे हं !) असं लिहिण्याची पद्धत आहे बरेच ठिकाणी. पार्टी शिजवण्याचं काम करावं लागतं बाईला, पण फक्त आमंत्रणकार्डात 'लेडीज फर्स्ट' या कायद्यानुसार (अर्थात तोही इंग्रजीच) बाईचं नाव प्रथम घातलं की ती खूष ! मिस्टर मात्र नाव घालूनही नावं ठेवायला नामानिराळे राहतात !

त्यावेळी लक्षात येत नाही, आपल्या शिरावर केवढा भार येणार आहे म्हणून ! पूर्वीच्या काळी आपलं बरं होतं. जेवणावळी उठायच्या असल्यामुळे भाज्या चिरणं, डाळ, तांदूळ नीट करून ठेवणं, बरंचसं सामुदायिक असे. चुली, शेगडचा, काय असतील, त्या फुंकायच्या ! कुठल्याही अर्थी म्हणा, डोक्यात राख घालायची, पण चारी ठाव रांधायचं. सखूबाई, साळूबाई वाढायला असायच्या. आमच्या माहेरची रखमा तर पंक्तीतल्या लोकांनी 'अन्नदाता सुखी भव' म्हणताच पानं गोळा करायला लागायची.

पुरुषांनी सांगितलं, 'वाढायला आणा बरं का', म्हणजे निमूटपणे पानात वाढायचं. अर्थात पानात पडलेलं निमूटपणे खाल्लं जाईलच असं नाही. पाट, रांगोळचा, उदबत्त्या हे वरकड खातंही कुणीतरी पाही. आता म्हणजे बायकांचा 'वन् मॅन शो' झाला आहे. पाटपाणी

जाऊन टेबलावर जेवणं सुरू झालीत, म्हणून फारसा बदल झालाय असं नाही.

कारण 'पाटावरचं ताटावर' करण्याऐवजी वेळेवर खुर्चीत अधिष्ठित झाले म्हणजे नशीब. चहा, जेवणाच्या वेळी वर्तमानपत्र मात्र हटकून पाहिजेच. त्यातल्या 'न्यूज आयटेम' वर आमच्या स्वयंपाकाची गोडी कमीजास्त होत असते. बरं, टेबलावर जेवण असल्यामुळे वाढायचं काम कमी व्हायच्याऐवजी इतर कामंच वाढली आहेत.

'टेबल मॅनर्स' प्रमाणं, निदान पार्टीच्या वेळी तरी, यजमानीण-बाईनं टेबलावर सगळ्यांच्या बरोबर बसलं पाहिजे, जेवायला आणि मधून मधून वाढलं पाहिजे, डाव्या हातानं! म्हणजे काय असतं की, कल्पना अशी असते की प्रत्येकानं घ्यावं आपआपल्या हातानं! पण होतं काय, गृहिणीला, सव्यसाचित्व पत्करून, उजवा हात आपल्या-करता आणि डावा हात वाढण्याकरता चालवावा लागतो. माझे असे दोन्ही हात कधीच बरोबर चालत नाहीत. एका हातात घंटा आणि दुसऱ्या हातात आरतीचं ताट, असं असताना, एकदा घंटा वाजवायची अन् मग निरांजन ओवाळायचं, असं करावं लागतं आणि अगदी 'बुफे' असलं तरी हे वाढण्याचे काम टळत नाही. सगळ्यांच्या बरोबर घेतलेली आपली प्लेट हळूच खुणेनं कुठेतरी बाजूला ठेवायची आणि एकामागून एक पदार्थ मार्गक्रमण करतोयना ते पाह्यचं!

तर अशा या पार्श्वभूमीवर पार्टी द्यायची! आतापर्यंत पुष्कळ पाटर्या खाल्ल्या होत्या, पचविल्या होत्या असं म्हणता येणार नाही. पण तो किस्सा ('किस्सा खुर्चीका' झाल्यापासून बरेच किस्से प्रकट होऊ लागलेत) सांगितला तर परत परान्न मिळायची आशा नाही! कारण सगळ्याच बायकांना वाटतं, आपल्या हातचं खाऊन कंटाळा आला की परान्न मिळेल म्हणून; मग त्याला कितीहि नाकं मुरडली तरी!

मी खाल्लेल्या काही काही पाटर्या तर अशा पाँश होत्या; आणि त्या पार्टीतली गृहिणी तर अशी सहजपणानं वावरत होती! मला तर

धन्य वाटली तिची. मनोहर कपडचातली, सुरेख मॅचिंग असलेली ती 'स्मार्ट' गृहिणी. सगळचा घरातली, निदान बसायचचा जेवायच्या खोल्यातली, सुंदर सजावट. कोपऱ्याकोपऱ्यातून हळूच डोकावणाऱ्या जपानमधल्या सगळचा 'चॅप्टर'च्या पुष्परचना, फुलांशिवाय केलेल्या· कुठून तरी दुरून येणारे मधुर संगीताचे सूर!

अगदी बरोबर वेळेला येणारा (आणि तोही गृहिणीनं आतबाहेर फारशा खेपा न घालता). वाफाळता सूपचा कप. पुष्कळ वेळा वाटतं, तो जरा कमी गरम असता तर बरं! मला बहुतेक अर्धाच खाली ठेवावा लागतो, एखाद्या 'फ्लॉवर अॅरेंजमेंट'च्या मागे दडवून! तरी पण एकूण एक पदार्थ अगदी छानच झालेले असतात. अगदी 'कुकरी इअर बुक'च्या रंगीत फोटोप्रमाणे सुबक, अन् चवदारही. नुसतं 'हाऊ व्हेरी नाइस' असं न म्हणता, मी भरल्यापोटी पावती देऊन टाकते दिलखुलास!

आता ही पार्टी डोळचासमोर असते. ते तयार चित्र पाहताना सहज असं लक्षात येत नाही की श्रम किती होत असतील! त्यामुळे कंबर कसावीच लागते. तशी कुठल्याही पार्टीची प्राथमिक तयारी बरेच दिवसांपूर्वी चाललेली असते. उदाहरणार्थ, स्वयंपाकावरची पुस्तके, 'कुकरी बुक' वगैरे वगैरे. लक्ष्मीबाई धुरंधराचं 'गृहिणीमित्र' हे पुस्तक, पण शिवण खिळखिळी झालेली असली तरी मला माझ्या भावानं लग्न होताच तडकाफडकी आणि मोठ्या मेहनतीनं मिळवून दिलं होतं ते पुस्तक. त्यावेळी तरी फारसा भरंवसा नसावा त्याचा माझ्या पाककौशल्यावर! या पुस्तकाचंसुद्धा होतं काय, की एका हातात, डाग पडू न देता, पुस्तक पकडायचं. एका हातानं पदार्थ ढवळायचा. त्यात लिहिलेली मसाल्याची यादी पाहून एकेक पदार्थ टाकावा, तर तेवढचात पानं मागे पुढे होतात, खुणेची दोरी असली तरी.

मग हळदीतेलाचे डाग पडणार नाहीत अशा बेतानं पान शोधायचं. नाहीतर पुस्तक 'कलरफुल' होतं! त्यापेक्षा लायब्ररीच्या रेफरन्स कार्डाप्रमाणे कार्ड असावं, त्यावर मागेपुढे दोन रेसिपीज असाव्यात. अमेरिकेतून आलेल्या एका मैत्रिणीकडे बघितलं होतं तसं. इतकंच की

बऱ्याचशा 'रेसिपीज' डोक्यातच गच्च बसल्यागत गच्च बसल्याहेत, ठासून ठेवलेल्या पुस्तकाप्रमाणे ! म्हणून हे आता तसं भागणार नाही.

तेव्हा यथावकाश पार्टीचे सगळे पदार्थ आपआपल्या जागी खदखदत असतात. नंतर डोळ्यासमोर प्रश्न येतो, अतिशय महत्वाचा क्रॉकरी कुठली काढायची असा ! द कन्टेनर इन्क्रीजेस द टेस्ट ऑफ द कन्टेन्ट. परवाच आणलेली 'इम्पोर्टेड' काढावी, की इथलीच पण भारीपैकी काढावी ! घरातल्या सगळ्यांचा मिळून खल होतो. क्रॉकरी इथली काढावी. नंतर धुताना जर खराब झाली तर ! पण मुख्य म्हणजे तेवढा 'शो' कमी होतो ना.

मुलाचं म्हणणं असं, 'ती इम्पोर्टेड क्रोकरी काय तू क्वीन एलिझाबेथ आपल्याकडे आल्यावर काढणार आहेस ?' अर्थात ती येण्याची शक्यता नसल्यामुळे ती स्पेशल क्रॉकरी बाहेर निघते. पुन्हा जेवताना पण बोलायला एक विषय होईलच, 'फॉरेनच्या ट्रिप'चा. जेवणापेक्षाही चविष्ट. मग कडक इस्त्रीच्या पांढऱ्या टेबलक्लॉथवर एक 'मायक्रोस्कोपिक' डाग मला दिसतो. अन् जीव घाबरतो. मग चटकन् सुचतं की एखादी फ्लॉवर अरेंजमेंटच ठेवावी. त्यावर काटे–चमचे एकमेकांच्या डोक्याला डोकी लावून पसरावी त्यावर. नॅपकिनची कमळं ! एवढं सगळं होईस्तो आमचे काटे ढिले होतात आणि मुखकमल कोमेजू लागतं !

जरा खुर्चीवर हुश्श करीत टेकते न टेकते तोच कॉलेजकन्यका पुत्रिका चीत्कारते, 'मम्मी, ड्रेस चेंज कर.' मराठी क्रियापद चिकटविलेली इंग्रजी वाक्यं ! पार्टी संपेपर्यंत आपल्या नसलेल्या पायावर मी उभी राहते ! खरं तर ही उभ्या–उभ्याची पार्टीही मला पसंत नसते. उभ्या–उभ्या येणं, आणि तासभर बसून जेवून जाणं वेगळं तासा दोन तासाकरता यायचं आणि उभ्या-उभ्या जेवायचं ! खरं म्हणजे होतं काय, सुरुवातीला असतात बहुतेक उभे. मग हळूहळू जागा शोधत एकेकजण बूड टेकवतो कुठेतरी. त्यात माझा पहिला नंबर असतो. परत त्यातही

गुडघ्यावर प्लेट सांभाळता सांभाळता, हातातोंडाची गाठ घालणं अजून जमलं नाही मला. नॅपकिन तर माझा कधीच हरवलेला असतो.

तर, घरचीच पार्टी असल्यामुळे, डगडगत्या पायावर माझ्या शरीराची इमारत कशाबशी उभी राहते आणि माझा निसर्गदत्त, निढळीच्या घामानं थबथबलेला चेहरा 'तयार' करायला जाते.त्या थकलेल्या, अवस्थेत 'ब्यूटी पार्लर'च्या सगळ्या सूचना पुस्तकातच उरतात. आणि फारशी सुधारणा करण्यासारखं मुळातच काही विशेष नसतं. पण मोडकी इमारतही डागडुजी करून थोडा वेळ तरी बरी दिसतेच !

घड्याळाचे ठोके आणि पाहुण्यांचे पदक्षेप एकदम ऐकू येतात. वातावरण सुगंधानं आणि हास्यानं भरून जातं. लागलेल्या संगीतातून मी एक कान स्वयंपाकघराकडे, अन् एक डोळा यांच्यावर ठेवून असते. कारण ह्यांच्या एकंदर आविर्भावावरून पार्टी आपल्याच घरची आहे हें ते विसरलेले असतात, नेहमीप्रमाणे ! आणि गुंतलेले असतात कुठल्यातरी गंभीर विषयावर आपलं मत प्रतिपादन करण्यात! एकंदरीत , मिस्टर अँड मिसेस सो अँड सो टेक द प्लेझर ' हे मिस्टरांच्या बाबतीत खरं आहे अगदी !

त्या कुणा बिचाऱ्याला यांच्या तावडीतून सोडवते. आणि भरकन् रिकामे ग्लासेस किती झालेत ते बघते. मग 'यज्ञकर्मा'ला सुरुवात होते. एकंदरीत माझं पण टेबल बरं सजलेलं दिसत होतं. मुलंहि छानच वागत होती. मला आपलं उगीचच काहीतरी भललंच वाटत होतं. 'ओः लव्हली ! छानचं बेत झालाय हं !' वगैरे उद्गारात पार्टी सुरू होते. पुरुष मंडळी जेवणाचा आस्वाद घेत असतात.बायका 'रेसिपीज एक्स्चेंज'करीत असतात. माझं 'ब्लडप्रेशर' आणखीन वाढलेलं असावं, पण 'ड्रायफल पुडिंग'चं 'सेकंड हेल्पिंग' घेतलेलं पाहून, ते नॉर्मलवर येऊ लागतं. पार्टी कुठलीही असो, मला आग्रह केल्याशिवाय राहवत नाही. मी स्वतःच उठते वाढायला आणि लोकांनी नको नको म्हणत घेतलं की न खाताही माझं पोट भरतं !

नंतर 'गुडनाईट' वगैरे होतं. माझ्याही डोळ्यात झोप भरलेली असते. अन् मनात तृप्ति. मी बाहेर येते, सगळ्यांना निरोप

द्यायला. आकाशही खच्चून भरलेलं असतं चांदण्यांनी. जणूं काही पार्टीच चाललेली आहे त्यांचीही. आता काही वेळ आणखी जाईल प्लेटी, ग्लासेस शोधण्यात, एखादा दुसरा कोपऱ्यात अथवा कोचा-खुर्ची खाली गेलेला, रांगतरांगत जाऊन काढावा लागेल. ते सगळं होईल, अन् होतंहि!

सगळं सगळं आवरून, मी झोपायला जाते आणि पुढल्या पार्टीच्या 'मेन्यू'ची तयारी अर्ध्यावर येताच, बहुधा झोप लागते.

* *

पाऊलखुणा

फुलवात

ही आहे फुलवात. जेमतेम पेटलेली, क्वचित् उजळता उजळताच काजळलेली. तसं म्हटलं तर, उजळलेली ज्योत अन् काजळलेली, यात फक्त फरक आहे एका अक्षराचाच ! पण एका अक्षराच्या असण्यानं, अथवा नसण्यानंही, आयुष्याचा पुरा अध्यायच बदलतो. आयुष्याचा तोलच इतका नाजूक, तरल असतो. त्या अल्प अक्षरामुळं सुखदुःखाचं पारडं खालीवर हिंदकळत असतं.

खरं तर ही इवलीशी फुलवात. तशी क्षणभंगुरच. पण काय सौंदर्य तेवत असतं तिच्यात ! 'जरि दीपकलिका धाकुटी ! परि बहु तेजाते प्रगटी'. अन् हे देखणंपण, शतगुणित होऊन एकवटलेलं, तुम्ही पाहिलंत तर त्या दृश्याला तोड नाही. हरिद्वारला, गंगेच्या पाण्यावर डौलानं तरंगत जाणाऱ्या असंख्य वाती तुम्ही पाहिल्यात कधी ? आजूबाजूला अंधाराचं साम्राज्य, त्यातून दृगोच्चर होणाऱ्या त्या दीपकळ्या. कधी एकमेकींच्या सांगाती. कधी एखादी एकटीच.

वाटू लागतं–त्या वातीच आहेत, संथपणे जळणाऱ्या, का आकाशातल्या तारकाचं, लपाछपी खेळत, रूप पाहत आहेत, गंगेच्या निर्मळ पाण्यात ! पण सगळ्याच वातींना शेवटपर्यन्त जाण्याचं, दुसरा काठ गाठण्याचं अपूर्व भाग्य लाभतंच असं नाही. एखादी कळी मध्येच शांत होते. आसमंतातल्या काळोखात विलीन होते. 'ना इसपार–ना उसपार–' धारेत वाहून गेलेली. त्या इवल्याशा वातीची दखल कोण

घेणार! ती शांत झाल्यानं जगात काही अंधार पडत नाही. 'पिप्पा पासेस, अँड ऑल इज् वेल् विथ द वर्ल्ड!'

सुंदर गोष्टींसारख्या, साधर्म्य असलेल्या सुंदर कल्पना कुठेही जन्म घेतात. पोलंडमध्ये विस्तुला नदीच्या काठावरूनही, दर वर्षी, ठराविक दिवशी, अशाच मेणबत्त्या सोडण्यात येतात. ज्या ज्या लोकांनी समुद्रावर आपले प्राण गमावले असतील त्यांच्या स्मरणार्थ ह्या मेणबत्त्या, गुलाबांच्या फुलांनी सुशोभित करून पाण्यावर सोडण्यात येतात. इवलीशी ज्योत, मधुर सुवासानं वेढलेली, अन् अथांग जलावर प्रवासास निघालेली. काय सुरेख प्रतीक आहे नाही जीवनाचं? चिमुकलं जीवन, आत्मज्योतीच्या प्रकाशात, जग शोधायला निघालेलं. त्या विस्तुलाच्या काठांवरून, पोलंडच्या स्वातंत्र्याकरता अशीच फुलवात वाहत गेली होती.

म्हणूनच असं वाटतं, सगळ्या जगाला नाही तरी, त्या फुलवातीला आजूबाजूला नक्कीच अंधार जाणवत असेल. ते तिचं जग हातभर असेल. काळोखाचं अथवा प्रकाशाचं महत्त्व त्याच्या सखोलतेवर अवलंबून असतं. पण आज कुठून आली ही फुलवातीची आठवण! अन् ती सुद्धां आजूबाजूच्या विद्युतप्रकाशाच्या झगझगाटात! मनातल्या विचारधाग्याचं टोक कुठं अडकलेलं असतं, अन् आपण कसं कसं त्यात अडकत जातो– कधीकधी कळतच नाही. त्याचं असं झालं–

परवा प्रवासाच्या अनेक टप्प्यांपैकी एका मुक्कामात कळलं की आम्ही उतरलेल्या गावात, महादेवाचं खूप जुनं देऊळ आहे. देवही म्हणे नवसाला पावणारा अन् लक्षात आलं की त्या दिवशी अनायासे सोमवारच होता. पुण्य पदरात पडण्याची पर्वणीच होती जणू त्या दिवशी! मंदिराच्या आजूबाजूला वस्ती फारशी नव्हतीच. जी काय होती ती महादेवाच्या भणंग वृत्तीला साजेशीच! झाडं तर नव्हतीच. जंगलातला महादेव शहरानजीक आला अन् जंगलच उठून गेलं! माणसांनीच नाहीसं केलं. मंदिर टेकडावर होतं. खडबडीत रस्ता कसाबसा चढून मी मंदिरात प्रवेश केला. नेहमीप्रमाणं अनास्थाच होती सगळीकडं.

ओवऱ्या तर अंधारलेल्या, उकरलेल्या होत्याच. पण गाभाऱ्यातही बराच अंधार होता. तिथं लावलेला एकुलता एक बल्ब फ्यूज झाला होता. पुजाऱ्यानं पेटवलेल्या काडचाच्या पेटीच्या टिचभर काडीच्या, क्षणिक उजेडात घेतलेलं देवाचं अस्पष्ट दर्शन मनाला खिन्न करून गेलं. त्या काडचाही जास्त पेटवायची त्याची इच्छा नव्हती. तेलवात लावायची तर तेल महागलेलं. मग तुपाचं निरांजन कुठे तेवायला तिथं !

का 'स्वयंप्रकाशा, काय तुजपुढे नीरांजन ज्योती' अशी सोईस्कर समजूत करून घतली होती ! काही का असेना, जगाला प्रकाश देणाऱ्या त्या चंद्रमौलीचं, अंधारातलं दर्शन मनाला भावलं नाही. परतताना, वाटेत एका गावी, आमच्या मित्रांच्या घरी थांबलो. मी त्यांच्या अंगणात पाऊल टाकलं मात्र, अन् पाहिलं दारात देव कापूस हसत होता. अंगोपांगी फुलला खुलला होता. मी मैत्रिणीला म्हटलं, 'देशील का ग याच्या चार सहा बिया मला लावायला, माझ्या टीचभर अंगणात. तुझा कापूस माझ्या परसात फुलला म्हणजे तुझे-माझे धागे आणखीनच बळकट होतील.' तर ती म्हणाली, 'अग बिया तर देतेच पण कापूसही पाठवीन की येणा-या जाणाऱ्या बरोबर.'

म्हटलं 'तसं नको. मला फक्त बियाच हव्यात.' अन् जरा उसंत मिळताच, रोवल्या त्या अंगणात ! आपण रुजवलेल्या गोष्टींची गोडी काही वेगळीच असते. काही दिवस प्रतीक्षेत गेले. भूमीतून रोपं वर आली. झाडं भरली. लाल ठळक कुंकू लावल्यासारखं, पिवळ्या फुलांनी हिरव्याकंच पानातून डोकावणारी ती फुलं मोठी छान दिसत होती. तसं म्हटलं तर त्याना वास नाही तरी रंगामुळे ठसठशीतशी दिसत होती.

मग फुलं सुकली–मिटली–गळून पडली अन् घट्ट तोंड मिटलेली फळं झाडांना लटकलेली दिसली, जणु निरगांठ बसल्यासारखी. ती कांही मोठीशी देणगी होती असं नाही. उलट ओबडधोबडच. पण मग रात्रीच्या अंधारातून प्रकाशाचं फूल उमलावं, तसं त्या बोंडांतून धवल कापूस उमलू लागला. माझीही झाडं हसूं लागली. त्या काळचाशार चार–पांच

बियांतून उत्पन्न झालेली ही धवलतेची किमया ! श्यामलेच्या प्रसन्न हास्यासारखं, पावित्र्याचं लेणं ल्यालेलं ते कापसाचं झाडं ! देखणेपण कुठंही जन्म घेतं, पाह्यला मात्र हवं. सौंदर्याचा शोध घेणारे डोळे हवेत.

एकेका बोंडातून–काळ्या त्रिदळातून, सुळक्, सुळक्, कापूस बाहेर काढला. अन् इवल्या इवल्या गाठीतून, पाहता पाहता, पिंजलेल्या कापसाचा हलका फुलका पण भला मोठा ढीगच माझ्यासमोर उभा राहिला. आपल्या हातानं फुलवलेल्या जीवनाचं अप्रुप काही वेगळंच असतं. तसं पाहिलं तर सकाळ संध्याकाळ, जेमतेम लावलेल्या उदबत्तीवरच देवाला समाधान मानायला लावणारी मी ! असतो कुठे वेळ आम्हाला या असल्या गोष्टी करायला ? फार फार 'बिझी लाईफ' असतं ना आमचं !

समोरचे हलके फुलके, अतिशुभ्र ढग बघितले, अन् म्हटलं बघू या तरी, आपणही वाती करून. पूर्वी कधी तरी, आईच्या आग्रहाखातर लक्ष वातींचा नेम केला होता. अर्थात्च, त्यावेळीही तो अगदीच अपव्यय वाटला होता वेळेचा. असायची पूर्वी असली अनंत व्रतं लक्षवाती, काडवाती, बोटवाती. आता देवाच्याच अस्तित्वाबद्दल आमची वादावादी–मग दिवे कसले लावायचे त्याच्यासमोर ! कुठलीही गोष्ट करण्यापेक्षा न करण्याकडेच आमची प्रवृत्ती ! व्रतामागची निष्ठा न पाहता, टिंगल करणं हेच मुळी व्रत. दुसऱ्याकरता जळणं, हे माहीतच नाही.

म्हटलं, तरी पण करूया याचं काही तरी. तकली चालवणं तर कधीच विसरले होते. तो हलका फूल हातात घेतला अन् त्या हळुवार स्पर्शानं मी मोहूनच गेले. हळूच घातलेल्या फुंकरेसारखा, तो कळे न कळे स्पर्श ! मला आठवण झाली, नवबालकाच्या मृदु जावळाची–त्या सारखाच हुळहुळता, जवळ जवळ अदैहिकच, असा हा स्पर्श.

त्यातला इवलासा कापूस मी बोटाच्या चिमटीत पकडला, फुलवला अन् पीळ दिला. डौलदार फुलवात माझ्या पुढ्यात उभी ठाकली. अन् त्याचबरोबर, आम्हा भावंडाकरता उभं आयुष्य वाहणाऱ्या आजींची मूर्ती ! दुपारच्या वेळी, कामानं खरखरीत झालेली

त्यांची बोटं फुलवाती वळीत असायची. विचाराच्या भरात, न कळत माझेही हात चालत होते. पांढरी शुभ्र फुलं, देठ वरती करून ठेवावीत, त्याप्रमाणे त्या फुलवाती दिसत होत्या. तेवढ्यात डोकावली माझी जिवलग सखी, अन् मला वाती करताना पाहून झीट येऊन पडता पडता वाचली ! ! 'अग तुझा अन् वातीचा काही तरी संबंध येत चालला आहे. मग वातीचा ! हं-ह्य ऽ ! ! ' ती शहारली दीपमाळेवर असंख्य वाती फुलाव्यात तसा अंगभर काटा फुलला तिच्या.

'अग... अग, शुद्धीवर आलीस ना ! नाही तर याच्याच बोंडाचा रस घालते, तुझ्या त्या वर चढलेल्या नाकात !' ती बसली खरी, पण त्या पुंजक्यापासून सूतभर दूरच. मी म्हटलं 'जरा तरी पिंजून तर बघ कापूस, धर इवलासा चिमटीत, कसं बरं वाटतं बघ. नाही तरी अनेक चटोर विषय आपण पिंजणार आहोतच. ते पिंजून पिंजून त्यांची ती लक्तरं सोडतोच वाऱ्यावर. एकाच विषयात, एकाच गोष्टीत, वेळ फुकट घालण्यापेक्षा, तो दोन विषयात मिळून फुकट घालवू. दोन दगडांनी एकच पक्षी मारण्यासारखं, पिंजून पिंजून हलक्या होणाऱ्या कापसासारखं मनही हलकं हळुवार व्हायला हवं तरच ते तरंगेल वर.'

सखी चीत्कारते. 'म्हणजे काय, आता तू म्हाताऱ्या आजीबाईसारखी वाती वळत बसणार ? चित्रकला सोडलीस वाटतं ? त्यापेक्षा ब्रश घे हातात' मी म्हटलं, 'अग आजीबाईसारखं म्हणजे तरी काय ग ! झालोच की आपण दोघी आजी! अन् म्हातारपण तरी काय–मन तरुण असलं की झालं. शेवटी मनाचं तारुण्य, कलेचा आनंद हा आपल्यावरच निर्भर आहे. कला ही करणाऱ्याच्या हातात आहे. परवाचं ते चित्र बघितलंस ना ? पदराआड असलेल्या ज्योतीचं. त्यातली ती ज्योतही खरोखरी कुणी वळलीच असेल. खरं सौंदर्य काम करण्यात आहे. काम वळण्यात नाही.'

'असेल बाई. मी नाही असले कसले विचार करीत बसत' तिचं ते सुरेखसं नाक वर चढलेलं पाहून मी विचार केला, कापसाला बसलेला पीळ फार घट्ट असू नये. गाठी–निरगाठी आयुष्याच्या वस्त्रात आल्या की ते खरबरीत होतं. गरम वातावरण थंड व्हावं म्हणून गरम

गरम चहा केला मी, तिला आवडतो तसा. तणाव कमी झाला, पण गप्पांना सूर सापडेना.

सूतभर का होईना, फट पडली की आमच्यात सहज चाळा म्हणून तीनशे चार वाती वळल्या; पण गप्पा मात्र वळेनात नेहमीच्या वाटेने. चहाचे कप रिकामे झाले. मनं मात्र भरलेलीच. ती उठलीच. पटकन् म्हणाली 'जाते ग आता.' इतर वेळा, दहादा हाताला धरून तिला बसवणारी मी, जाऊं दिलं तिला मुकाट्यानं. काय होतं एकेक वेळी आपल्याला तरी असं!

तिनं वळलेल्या, त्या काळ्या मिचकुट फुलवाती, मी झुरळं उचलावीत तशा उचलून टाकून दिल्या. त्या शुभ्र कापराच्या मलिन रूपाकडं बघवेनाच मला! तिच्या अनिच्छेचाच रंग चढला होता जणू त्याच्यावर. त्या मऊ पिसाऱ्यातला, नखभर तुकडा, मी परत हातात घेतला. मनही विचाराच्या धाग्यात परत परत गुंफू लागलं. धागे लांबू लागले अन् मन शिरलं भूतकाळात. आयुष्याच्या उतरणीवर मन काही पुढं धावत नाही. मागंच वळून पाहातं.

माझ्या बोटांमधून एकेक फुलवात तयार होऊन समोर पडत होती; तसंच माझ्या स्मृतीतून एकेक फुलवात बाहेर पडू पाहात होती. नेत्रासमोर साकार होत होती. मानसगंगेच्या पाण्यावर अनेक ज्योती तरंगू लागल्या होत्या. त्यांनी वेगवेगळी स्त्रीरूपं धारण केली. माझ्या मनात विचाराचं वादळ घुमू लागलं, अन् स्त्री ज्योती हेलकावू लागल्या! अनेक रूपं, अनेक आकार, विविध रंग, वर्ण, उंच, ठेगण्या, ठुसक्या, धवळ्या, सावळ्या, कृष्ण वर्णाच्या, किती किती म्हणून सांगू! किती अन् कशी मोजदाद करूं!

कितीक जणींनी आपाआपले संसार उजळले, क्वचित् दुसऱ्याचेही तेजाळले. तर काहींनी दुसऱ्यांची इवलीशी जग–जीवनंच पेटवून उद्ध्वस्त केली. काही स्वतःच पेटून निघाल्या. आपआपल्या परीनं सगळ्याच वैशिष्टपूर्ण. ही त्यातलीच एक, नाजुक पण सरळ ताठ देठ असावा तशी मान, कापसासारखंच शुभ्र गोरेपण. फुललेलं मोहक मुखकमल. दाट भुवयांच्या छत्राखाली. स्थिरावलेल्या. निरांजनातल्या वाती

सारखीच शांत प्रसन्न नेत्रदळे. हात गोरे पान होते पण त्यांचा गोंडसपणा शिल्लक राहिलेला नव्हता. बोटं लांबसडक पण नखं मात्र काम करून करून वेडीवाकडी झालेली. जिच्या रूपात नखभरही उणं काढायला जागा नाही, तिला सुखाचं देणं का मिळू नये ! पण ती जळत राहिली थेंबभराच्या स्नेहाच्या आधारावर.

खरं तर ही डौलदार वात, चांदीच्या घासून पुसून लखलखीत केलेल्या निरंजनातच शोभायची. शिगोशीग भरलेलं पण न वाहणारं असं कणीदार साजूक तूप, त्यांत आकंठ न्हालेली. आंतरिक तेजानं प्रज्वलित झालेली. देखण्या महिरपीत, मनींच्या देव्हाऱ्यांत विराजमान झालेल्या आपल्या प्रिय दैवताकरता शांतगंभीर प्रकाशणारी. या वातींना तेजाळायचं असतं ते निरांजनाच्या आधारावरच; ते जितकं खोल तितकी स्निग्धता जास्त. पण नव्हतं ते तिच्या नशीबात.

ही आणखी एक-तसं म्हटलं तर निरांजनाचा आधार अल्पवयांतच सुटला. पण स्वतःच्या तळहातावर आपल्या आयुष्याची फुलवात प्रज्वलित केलीन् तिनं. स्वभाव प्रेमळ पण करारी ! देखणेपण इतके अनुपम की कित्येक फुलपाखराना उडचा घेण्याचा प्रयत्न केला ते जळून गेले. फुलवात विझली नाही. त्या पवित्र सुंदर रूपाकडे पाहिलं की वाटायचं अंतर्यामीच हिची ज्योत पेटली असावी. कैरोला एक दगड सापडतो, त्याला ॲलबॅस्टर म्हणतात. त्याचा दिवा केलेला पाहिला होता. ॲलॅबॅस्टॅर दगड कोरून स्त्रीमुख बनविलं अन् त्यात बल्ब बसविलेला. तो उजळला की काय देखणं बोलकं शिल्प दिसायचं!

अशा बहुत पाहिलेल्या. नाव हवीत. कशाला त्यांना द्यायला—सगळ्याच ज्योती—कांही रूपाचं लेणं न ल्यायलेल्या पण गुणाचं देणं जन्मतःच घेऊन आलेल्या. आपण म्हणतो ना 'दिवा लागला देवापाशी ! उजेड पडला तुळशीपाशी' असं घरात, बाहेर, सगळीकडं प्रकाशमान करणारं आयुष्य जगणाऱ्या, तर अशा काहीजणी न पेटताच थिजलेल्याच राहिल्या आयुष्यभर. जगानं चिमटीत धरून फेकून दिलेल्या !

एखाद्या महालात, चारही बाजूनी आरसे लावलेले असावेत आणि त्यात तीच प्रतिबिंबं पुनःपुनः परावर्तित व्हावीत तसं ते हरिद्वारच्या गंगेवरचं दृश्य समोर उभे ठाकतं परत परत. अन् घरगंगेच्या जीवनावर तरंगणाऱ्या अनेक वाती दिसू लागतात. असतील त्या लहान. कडकडणाऱ्या विद्युल्लतेशी अथवा प्रचंड ज्वालेशी तुलना नाही त्यांची. हवीच कशाला तुलना प्रत्येक वेळी ? प्रत्येक वस्तुमात्र, आपल्या जागी, तितकीच महत्त्वाची आहे.

'इफ् यू लाईट अ कँडल् इन् अ व्हेरी डार्क प्लेस, इट् शाइन्स अ लाँग वे.'

रवि ठाकूर म्हणतात : रवि म्हणतो मी निघालो. आता अंधार पडणार. माझं काम कोण करील आता ! खरंच ते. चित्रासारखी सगळी सृष्टी स्तब्ध झाली हा प्रश्न ऐकून. पण त्याला उत्तर दिलं एका छोट्याशा वातानंच.

'माटिर प्रदीप छिलो, शे कहिलो श्शामी।
आमार जेटुक शाध्धो, करिबो ताड् आमी॥
(कोपऱ्यात पणती मिणमिणती, हळूच बोलली देवा।
माझ्याने होईल तेवढी, करीन तुझी सेवा॥)

म्हणूनच क्षणमात्र का होईना, आपण जळून अंधार नाहीसा करायचा हेच या फुलवातीचं काम. त्याचंच नाव जगणं. "तन्नाम जीवितमिदम्।"

* *

पाऊलखुणा

विसरायला शिका

लहानपणी जवळपास असलेल्या आईच्या मैत्रिणीकडे जाण्याची वेळ यायची अधूनमधून. काहीतरी निरोप, एखादा डबा, असंच काहीतरी काम असायचं. लाजत मुरकत, पाय एकमेकांत गुंतवत, अन् हाताची नखं खात आईचा निरोप सांगितला की त्याच पायी पळायची तयारी ! पण सुटका नसायची. आईच्या मैत्रीच्या दाट किंवा पातळपणावर नावं असलेल्या त्या काकू किंवा मावशी, मला मोठ्या प्रेमानं बसवून घ्यायच्या. माझ्या हातात कसलीतरी वडी कोंबली की ती खायला फुरसत मिळू नये इतका तोंडावर प्रश्नांचा भडिमार त्यातला ठरलेला प्रश्न 'काय ग ! कसली भाजी खाल्लीस आज?' अन् मला कधीही अर्ध्या तासापूर्वीसुद्धा खाल्लेली भाजी आठवत नसे. त्या वयात भाजीपेक्षा 'दुरखई–तिरखई' सारख्या किती तरी महत्त्वाच्या गोष्टी होत्या लक्षात ठेवण्यासारख्या.

त्या प्रश्नाच्या मागे काय हेतू होता, हे त्या काकूच जाणे ! पण त्या भडिमारामुळे, काकूंच्या घरी कसली वडी खाल्ली होती हेही घरी जाईपर्यंत मी विसरायची. 'काटें, निरोप तरी धड सांगितलास का ? का तोही विसरलीस नेहमीप्रमाणं ?' घरी गेल्यावरचं ठरलेलं स्वागत. आमची आजी तर नेहमी मला म्हणायची, 'देव आठवण नावाची वस्तू वाटत होता तेव्हा त्यालासुद्धा हिची आठवण आली नाही.' त्यामुळे इतिहासाच्या सनावळ्यापासून, दुसऱ्याच्या कौटुंबिक प्रसंगापर्यन्त सगळ्या गोष्टी घडाघडा म्हणून दाखवणाऱ्या माणसा-

बद्दल माझ्या मनांत भीतियुक्त आदर असतो नेहमीच. कारण माझा स्वतःचा तरी अनुभव असा की, स्मरण वाटपाच्या वेळी हमखास हजर असणाऱ्या या लोकांच्या आठवणीत आपल्याला नको त्या गोष्टी सापडतात.

तीच ती साडी मी किती वेळा नेसले आहे, हे माझं मला कधीच आठवत नाही पण एक आहे माझी (आता मैत्रीण म्हणू की काय म्हणू हे काही नक्की ठरत नाहीये) ती नेमकी आठवण करून देईल मला त्या गोष्टीची. अगदी चारचौघांत, नको त्या वेळी, तिच्या स्मरण-शक्तीची आणखी काही प्रात्यक्षिकं होतात. मग मात्र मी तिलाच विसरायचं ठरवते. तिच्या आठवणीच्या टेपरेकॉर्डावरची, दुसऱ्याच्या आयुष्यातल्या लहानसहान तपशिलानिशी असलेल्या गोष्टींची तीच ती रेकॉर्ड नकोशी वाटू लागते. इतर मैत्रिणींच्या कागाळ्या, त्या तुलनेत स्वतःचं मोठंपण, अशा तिच्या अनेक रेकॉर्डस् आता खरखरू लागतात. असंही वाटून जातं, यातल्या काही काही गोष्टी ही विसरली तर पुष्कळांना आयुष्य सुसह्य होईल. पण न विसरण्याबद्दल तर अगदी लहानपणापासून ठोकून-पटून मनावर ठसवलं असतं. 'विसरू नका बरं का शिकवलेलं. नीट लक्षात ठेवा' वडील-माणसाचं सततचं सांगणं, न विसरतां पेपर लिहा बरं का' इति गुरुजी. 'ए, विसरू नकोस हं'. मैत्रिणीची लाडीक धमकी आणि जन्मोजन्मी एकमेकांना न विसरण्याच्या अखंड आणाभाका! तर असा हा आठवणीचा-आठवणी-करता अट्टाहास चाललेला असतो. त्यावेळेस वाटायचं, किती कठीण हे सगळं लक्षात ठेवणं! एकाद्या लहानशा पिशवीत खुपसत जाव्यात तसं चाललेलं असतं.

पण मग आयुष्याच्या प्रवासाची उतरण सुरू होते. हा उतरणीचा काळ केव्हा कसा येतो, तो कळत नाही. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात तो मागे पुढे येतो. मग त्या क्षणानंतर माणूस आठवणीवर जगायला लागतो. झाल्या गेल्या गोष्टींच्या प्रसंगाच्या आठवणीतच रंगून त्यात आनंद घेत असतो. आयुष्यातले गेलेले क्षण, त्या स्मृतीच्या रुपानंच शिल्लक असतात; बर्फ वितळल्यावर त्याचा सुखद गारवा काही

काळ भासत राहावा तसंच. आयुष्याच्या शेवटी तर क्षण कमी अन् स्मृतीच जास्त ! भविष्याची लांबी, भूतकाळाच्या लांबीवर जोडून ती वाढवू पाहातो आपण स्मृतिशृंखलेनं !

मग आठवणीच्या आधारावर जर आयुष्य काढायचं असेल तर विसरायचं ते कां–कसं आणि काय ! जे क्षण जगलो ते आयुष्यातून नाहीसे कसे करता येतील आणि विसरायचं ते काय काय ! अशा वेळी मला कुठे तरी वाचलेलं मादाम द स्तालचं हे वाक्य आठवतं : 'ओः मेमरी ! दाउ बिट्र स्वीट्, बोथ् अ जॉय अॅन्ड अ कर्स.' स्मृती– तू कडू–गोड याचं मिश्रण आहेस. तू आनंदायी आहेस, तशी एक शिक्षा पण आहेस. आणि किती खरं आहे, नाही ? कारण ज्या जीवनाच्या या आठवणी असतात, ते जीवनच माधुर्य आणि कटुता यांच्या हातात हात घालून चालत असत.

आणि असंही होत असतं अनेकदा. नकोत त्या आठवणी. ठेवू नयेत त्या स्मृती आपल्या मनात. मनाला जास्त चिकटून बसतात, कपड्याला चिकटून येणाऱ्या गोखुराप्रमाणं, झाडलं तरी निघत नाहीत. प्रवासात पुष्कळदा काटेकुटे लागतात, पायात जातात. कुसळं कपड्यांत शिरतात. डोळ्यांत तर नेहमीच ! तसेच सुगंधी लहरही हळूच स्पर्श करून जाते. पण ती असते नाजूक, अतिसूक्ष्म, तरल. ती लवकर निसटून जाते. पण तिलाच पकडायला हवं. दोन चार का होईना पण जे सुगंधी क्षण असतील, ज्या काय अल्प–स्वल्प देणग्या मिळालेल्या असतील त्या संगमरवरात कोरलेल्या अक्षराप्रमाणं चिरबद्ध करायला हव्यात. काट्यांची बोच, शब्दांच्या जखमा, दुसऱ्यांनी –आपल्याच लोकांनी केलेली अवहेलना. तुमच्याविषयीच्या असूयेमुळे इतरांचा जो जळफळाट होतो. त्यामुळं तुमचीच अंतःकरणं भाजली जातात. या सगळ्या आयुष्यात पदोपदी, पानोपानी आढळणाऱ्या कहाण्या ! आयुष्यातले असले अनेक प्रसंग, विविध क्षण, आपली शांतता कुरतडत असतात. या सगळ्या गोष्टी विसरता आल्या तर !

त्यामुळं पुष्कळदा असं वाटतं, ध्यानात ठेवण्याकरता जसं शिकवलं जातं तसंच विसरायला पण शिकता आलं तर ! पण असा

विसरायचा प्रयत्न केला तर आडळून येतं, विसरणं ही गोष्ट फार कठीण आहे. नवीन पिढीबद्दलचं काही माहीत नाही; पण पूर्वी देव-पूजा हा एक संस्कार–एक धार्मिक कृत्य असे, नित्याचं. तर आपण देवपूजेला बसलेलो असतो अन् विचार आपल्या मनात घोळत असतात. त्यांना मनातून हटवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ते जात नाहीत. क्षणभरापूर्वीही त्यांची विस्मृती होऊ शकत नाही. कसं ते माझंच उदाहरण सांगते. तथाकथित मैत्रिणींची पुरे झालीत! कुणीतरी सांगितलं म्हणून कधीच्या काळी व्यंकटेश स्तोत्र वाचायला घेतलं होतं. 'पुत्राचे सहस्र अपराध! माता मानी काय तयाचा खेद'? 'काट्यां, घेतलास ना उब्यातला लाडू न बिचारता'– म्हणजे लाडू आणि व्यंकटेश यांत शेवटी देवालाच बिसरायला होतं. मात्र देवानं आम्हाला विसरता कामा नये!

आणि आपल्याला हवा आहे तो बिसराळूपणा नव्हे, विसरण्याची शक्ती! नेमक्या गोष्टी विसरण्याचीही शक्ती म्हणा, प्रवृत्ती म्हणा, असणं सहजसाध्य नव्हे. पुष्कळदा आपल्याला लहर येते आवरा-आवर करायची, फडताळाची, कपाटाची, पेटयांची. माझा आवडता उद्योग आहे तो. आपल्याजवळ नको असलेल्या अनेक गोष्टी साचलेल्या असतात. त्या टाकवतही नाहीत; त्यांची तशी खास जरूर पण नसते. तसंच या आठवणीचं आहे. अर्थात नको असलेल्या पुड्या टाकण्या-इतकं, अप्रिय आठवणी सोडून देणं सोपं नसतं!

कारण या अशा विसरण्याच्या वृत्तीमागे, क्षमाशीलतेची भावना असते– असावी. 'फर्गेट् ॲन्ड फर्गिव्ह'चं हे तत्त्व! आपल्या या अप्रिय आठवणीशी संलग्न व्यक्तीही अर्थातच अप्रिय होऊन बसलेल्या असतात. एक जणू काय, कटुतेचं कुंपण तयार होतं. अशाच कटुतेच्या विषानं तिढं झालेलं आयुष्य जगणाऱ्याची ही गोष्ट. लॉइड डग्लस् या धर्मोपदेशकाची कादंबरी 'फर्गिव्ह अस् अवर ट्रेसपासेस.' त्यातला नायक 'दिनो' आपल्या आईवर अन्याय झाला हे गृहीत धरून सततच आपल्या वडलांचा राग करत असतो त्या रागाचे तडाखे इतरांनाही मिळत राहतात. त्याच्या जन्मकाळीच, त्याची आई, अगदी अल्पवयात,

वयाच्या अठराव्या वर्षी गेलेली. त्या तथाकथित अन्यायाची कल्पना तो बालवयापासून जोपासतो. इतरांकडून, नातेवाईकांकडून, नेहमी-प्रमाणेच त्या कल्पनेला खतपाणी घातलं जातं. एखाद्या चिघळणाऱ्या जखमेप्रमाणं ती कल्पना 'दिनी'चं आयुष्य व्यापून टाकते. जखम सेप्टिक व्हावी तसं त्याचं आयुष्यच सेप्टिक झालं असतं. अशा पूर्वग्रहदूषित मनानं, नको त्या स्मृती उराशी बाळगीत तो जगत असतो. ते आयुष्य, किड्यांनी पोखरलेल्या झाडासारखं वेडंवाकडं असतं.

पण मग, केव्हातरी, त्याला आपल्या आईची, मृत्यूशय्येवर लिहिलेली डायरी सापडते. ती वाचून, अनेक गोष्टींचा उलगडा झाल्यामुळे त्याच्या त्या दुराग्रही कल्पनेत आमूलाग्र फरक होतो.त्यातून त्याच्यापुढे एक अभिनव कल्पना साकार होते. लोकांची तुमच्याकडे अनेक प्रकारची ऋणं असतात जी परत करणं त्यांना शक्य नसतं. काही उणी असतात, ज्यामुळं तुम्हाला तोंड दाखवायला त्यांना जागा नसते. ते तुम्हाला टाळतात. तसल्याच काही कारणामुळं आपणही दुसऱ्यांना टाळत असतो. संबंध दुरावतात. तर अशा वेळी त्या त्या लोकांची ऋणी–उणी तुम्ही विसरून जा. तुमच्यातल्या उणीवा इतर विसरतील. अशी ही परस्परांवर असलेली कर्ज म्हणा–ओझी म्हणा, हलकी होतील. अशा प्रकारे ही एक साखळीच तयार होईल. 'फर्गेट् ॲन्ड फर्गिव्ह'ची, विसरून जा आणि क्षमा करा अशा वृत्तीची; अन् त्या वृत्तीला अनुसरून केलेल्या कृत्यांची.

आम्ही जर इतरांनी आमच्या जीवनांवर केलेली अतिक्रमणं विसरू शकलो, आमच्या आयुष्यात केलेल्या अधिक्षेपांची क्षमा करू शकलो तर कदाचित आमचेही अधिक्षेप विसरले जातील. हेही तितकंच खरं. हे विसरतेपण मोठं कठीण आहे.

पूर्वी पुष्कळदा आपण सामान घेतलं की 'कॅश मेमो'वर लिहिलेलं असायचं 'चूक भूल देणे–घेणे'– तुम्ही आमच्या चुका विसरा. न कळतेपणानं, अजाणतेपणानं झालेल्या गोष्टीकडे मेहेरनजरेनं पाहा. आम्हीपण तुमच्याबाबतीत तोच व्यवहार ठेवू. पुष्कळदा असंही आढळून येतं त्या त्या वेळी, काही गोष्टीची तीव्रता, उत्कटता आपल्याला

खूप जाणवते. कांही काळानंतर मात्र, ज्या गोष्टींचा बाऊ केला होता, त्या किती क्षुल्लक होत्या याची कल्पना येते. दूर दूर जाणारी वस्तू लहान वाटू लागावी तसंच. परवाच एक पत्र आलं, माझ्या एका लेखाच्या संबंधात ! खरं तर तिची-माझी पत्रोपत्री अनेकदा व्हायला हवी होती. पण नेहमीप्रमाणं काहीतरी कारणानं दुरावा निर्माण झाला. निकटचे संबंध विकट होऊन बसले. अन् ते कारण आता इतक्या कालावधीनंतर किती हास्यास्पद वाटतंय् ! तिलाही तसंच वाटून ती विसरली असेल का ! आणि म्हणून हे अभिनंदनाचं पत्र. अशावेळी असं म्हणावसं वाटतं–

'भूल जावो, हो गई भूल हमसे ।
जिंदा जलेंगे आगमें तुम्हारी जुदाईसे ।
भूल थी छोटीसी लेकिन छोटी है जिंदगी ।
रहम करो हमपर, यही है बंदगी ।

असं वाटतं आयुष्य किती मोठं अन् किती लहान पण आहे ! कशाला आपण मान-अपमान, एकमेकांची उणी-दुणी, हेवे-दावे यातच आयुष्यभर मग्न असतो. खरंच का माणसापुढे–माणुसकीपुढे या गोष्टी महत्त्वाच्या असतात ! तरीही त्या आम्ही विसरू शकत नाही– कारण माणूस स्वतःलाच विसरूं शकत नाही !

पण या विसरा-विसरीच्या भानगडीत नक्की काय विसरायचं हे ठरवायला हवं. कारण काटे काढताना, वस्त्राचे नाजूक तंतू तुटायला नकोत. लहानपणी आम्ही कागदाचं कातर-काम करीत असूं. एक चौकोनी कागद घ्यायचा, एक अर्धी, नंतर परत, नंतर आणखी एक, मग होतो त्रिकोनी आकार. त्यावर डिझाईन काढून हळूच कातरीनं कापायचं. सगळ्या घड्या उलगडल्या म्हणजे सुरेख जाळी तयार होते. मधले बरेच तुकडे गळलेले असतात. पण कापताना किती सावधानतेनं, जपून कापायला लागतं. नाहीतर नक्षीच्याऐवजी कागदाच्या चिंध्या हाती लागतात. तसंच आहे हे आठवणीचं. ज्या आपल्या आयुष्याला वाळवी लागल्यासारख्या खात असतील तेवढ्याच

विस्मृतीत टाकायच्या. एका छोटया मुलाचं गंमतीदार वाक्य वाचलं होतं 'माय मेमरी इज् द थिंग आय फर्गेट् विथ्'– तसं काही गोष्टी आठवणीनं विसरायच्या. सुपात रोळून रोळून कसं खडे–भुस्कट बाजूला काढलं जातं, आणि शेवटी निखळ धान्य राहतं. आयुष्यात प्रत्येक बाबतीत हा निखळपणा निवडता आला पाहिजे.

आणि शेवटी सगळ्यात विसरायला कठीण गोष्ट म्हणजे आपण स्वतःच आपण स्वतःला विसरू शकत नाही, दुसऱ्याचा विचार करू शकत नाही. आयुष्य शेवटी, असं गुंतागुंतीचं, दुःखाचं होतं. आपल्या जीवनाचा मध्यबिंदू आपण असलो तरी सगळचा संसाराचे नव्हे. आपला सगळा आवाका, आपल्या आचार-विचारांचा परिघ– 'मी' या मध्यबिंदूभोवती फिरत असतो. त्या माझ्यातल्या मीपणालाच आपण क्षणभर तरी विसरायला शिकलो तर–! यावेळी रे. टिळकांच्या ओळीची आठवण येते.– विसर मला परि! अमर्याद जग–' यात थोडासा बदल करून असं म्हणता येईल, हे जग अमर्याद आहे; याची आठवण ठेव आणि स्वतःचो मर्यादा ओळखून स्वतःला विसरायला शीक!

* *

पाऊलखुणा

डबा बाटलीय्

शांत दुपार–त्यातल्या त्यात ! मंद विस्तवावर ठेवलेल्या दुधावर जशी सुरेखशी साय धरावी, तशी उन्हाच्या वेळी श्रान्त डोळ्यांवर आलेली झोपेची साय. विकणाऱ्यांच्या ललकाऱ्या पण मंद होत चाललेल्या, त्यांच्या हलक्या झालेल्या पाटयांबरोबरच. क्वचित् मध्येच 'अंडेयऽ' असं ऐकू येणारी भांडीवाली जाते, गवयाच्या थाटात कानावर हाताचा पंजा ठेवून ओरडत.

साधारणतः ठरलेल्या वेळेचे ठराविक आवाज असतात. प्रत्येक आवाजाला त्याची त्याची वेळ असते. त्या क्रमानुसार ते येऊन जातात. म्हणजे आता निवान्त. पण पापुद्रा जरासा हलतो अन् मग खडखडणाऱ्या टिनांच्या भांड्याप्रमाणचं आवाज येतो, 'डब्बा बाटलीय'– झोपेचे अन् खिडकीचे पडदे बाजूला करून मी डोकावते. तिची पाटी रिकामी आहे. माझ्याजवळ बाटल्या खूप जमल्याहेत. डबे पण. मी देणार नाहीये इतक्यात.

तसं हे डबा–बाटल्यांचं, त्या जमविण्याचं आकर्षण अगदी लहानपणापासूनच असतं. कुठलाही डबा अथवा बाटली रिकामी झाली तरी फेकवत नाही एकदम आपल्याला. पडेल उपयोगी काहीतरी दुसरं ठेवायला. दुसऱ्याच्या बाटलीत तिसरं काहीही ठेवलं जातं. 'व्हॅनिशिंग' क्रीमच्या बाटलीत नाहीसं होणारं केशर सापडतं. पावडरच्या डब्यांची तोंडं उघडून, त्यातं मनीप्लँट ठेवलं जातं. वृन्दावन सोडून आलेली

तुळस, डालडाच्या डब्यात जाऊन बसते. तर असे हे रिकाम्या डब्यांचे सदुपयोग !

पण डबे म्हटले की माझ्या डोळ्यासमोर उभी राहते चकचकीत पितळी डब्यांची रांग. माझ्या लहानपणी, आमच्या ओळखीच्या एक बाई होत्या. पैसाही घरात बऱ्यापैकी येत असे. त्यांच्या स्वयंपाक घरात पितळी डबे, लहान मोठे, उंचनिंच, अगदी चकचकीत असे आकारानुसार लावलेले असत. रविवारच्या रविवारी, राख आणि चिंच लावून ते घासणं हा मोठा प्रेक्षणीय कार्यक्रम असे. त्या डब्यांवर बोटं किंवा आतली पिठं कधीही लागलेली नसत, हा मोठा आश्चर्याचा भाग होता. त्या बाई अन् त्यांच्या मुली पण नेहमी तशाच घासून पुसून लखलखीत केल्याप्रमाणे दिसत ! ते तसं परीटघडीचं राहणं आमच्या वृत्तीला साजेलसं नव्हतं. पण तसे डबे मात्र आपण जमवायचे हे माझं तेव्हापासूनचं ध्येय बनलेलं.

तरी पण मला नेहमी असं वाटतं, काही काही बाबतीत कुठलीही स्त्री तशी सारखीच. काही स्वभावधर्म असे असतात, त्यांना भौगोलिक मर्यादा माहीत नसावी–नसते. पुरुष, सगळ्या गोष्टी त्या 'ईव्ह'पासून सुरू झाल्या, असं समजतात. तसं स्त्रियांची 'डब्या–बाटल्या'ची आवड 'पॅण्डोराच्या बॉक्स'पासून तर आली नाही ना असा प्रश्न पडतो. तशी ही गोष्ट ग्रीक पुराणातली. तर ती पुराणकालीन माणसं गर्विष्ठ झाली. अगदी देवांनासुद्धा जुमानेनात. आपल्याकडले देव जसे अशा वेळी विष्णूकडे जातात, तसे ते ज्युपिटरकडे गेले. ज्युपिटर यानं आपला मुलगा व्हल्कन याला एक सुंदर स्त्री मूर्ती करायला सांगितली. 'ती मूर्ती पृथ्वीवर पाठवेन; ती माणसांना चांगली शिक्षा करेल.' (आता सगळीकडची पुराणंसुद्धा पहा कशी एका चालीवर लिहिली आहेत; का ती सुद्धा एकमेकांवर 'आधारीत' होती हल्लीप्रमाणे !) पित्याच्या आज्ञेप्रमाणं व्हल्कननं केलेलं स्त्री शिल्प देवांना अतिशय आवडलं.

इतकंच नव्हे, तर मिनर्व्हानं त्याच्या घेतलेल्या चुंबनानं ते शिल्प सजीव झालं. तिच्यावर देणग्यांचा अर्थात्‌च वर्षाव झाला–तिचं नाव

ठेवलं 'पॅण्डोरा.' मर्क्युरीच्या सोबतीनं, पृथ्वीवर एपिथिमससशी लग्न लावायला निघालेल्या पॅण्डोराच्या हातात, ज्युपिटरनं एक हस्तिदंती बॉक्स-पेटी ठेवली. त्या डब्याभोवती सुवर्णसर्प लपेटलेला. नेहमी, प्रवासाच्या गडबडीत सामान पडतं-झडतं, त्याप्रमाणं तो पेटी पॅण्डोराच्या हातातून नदीत पडली. मर्क्युरी म्हणाला, 'ती पाण्यातच वाहून जाऊ दे. त्या डबीपासून तुला दुःखंच मिळतील-' पण छे ! प्रवासाला उशीर झाला तरी चालेल. पण ती डबी हवीच बरोबर ! बरोबर जंगी सामान नाही तो प्रवास कसला !!

सासरी गेल्यावर, त्या पेटीकडे पाहात असताना, तो सुवर्णसर्प आपोआप उलगडला गेला. पॅण्डोरानं झाकण उघडलं मात्र, तिच्या हाताला मधुमक्षिका चावली; अन् मग एकामागून एक संकटमालिका त्यातून बाहेर पडली. नेहमीप्रमाणं, नवरा-बायकोचं भांडण सुरू. नवरा म्हणे 'हा तुझ्या फाजील जिज्ञासेचा परिणाम-आणि लोभाचा'. पॅण्डोरा म्हणू लागली, 'तुम्ही का नाही मला वेळीच नको म्हटलं ?'

आणि स्वानुभवावरून असंही वाटतं, जणू काय त्यानं नको म्हटलं असतं तर तिनं ऐकलच असतं ! एवढं मात्र खरं, तेव्हापासून हे डबा बाटलीचं आकर्षण कायम आहे. तेवढंच नाहीतर डब्यांनीच आता आयुष्य बंद केलं आहे. आता सकाळी जाग येते ती पक्ष्यांच्या कूजनानं किंवा गाईच्या हंबरण्यानं नाही. तर खडखडत जाणाऱ्या दुधांच्या बाटल्यांमुळे. रात्री दीनवाणेपणानं कोपऱ्यात उभ्या असणाऱ्या या बाटलीच्या भरण्यानंच दिवसभराचं भरीवपण अवलंबून असतं, आणि या दुधाच्या बाटलीवर मोठ्या माणसाचंच नाही तर लहान मुलाचं सुद्धा जिणं अवलंबून, किंबहुना त्याचंच जास्त.

गाय बाटलीत शिरली ! तान्हेपणापासून मुलांच्या हातात बाटल्याआल्या. कसं सुटसुटीत काम ! मात्र त्याचंही अन्न डबेबंद झालं. पूर्वी मात्र इतके विविध प्रकारचे डबे नव्हते. रंगीबेरंगी, विविध ढंगी बाटल्या नव्हत्या. केरोसिनचे मोठाले डबे, त्याला झाकण लावून, गेरुचा रंग लावून त्यात सामान ठेवलं जाई. मग जशीजशी घरोघरी मेलिन्स फूडची भरलेली बाळं भिंतीवरून डोकावूं लागली, तशी फळी-

वरून त्याचे डबे पण ओळीनं लावलेले. बरे पडायचे, एका साइजचे. मग तूप झालं महाग, कारण दूध वसलं होतं बाटलीत. तेव्हा तिलंग रागात आळवली जाणारी 'डालडा वनस्पति' आली, अन् नारळाचं तिरपं झाड घराघरांत शोभू लागलं. अश्मयुगापासून पृथ्वीवर जशी वेगवेगळी युगं येत गेली तशी या डब्या बाटल्यांतही आली. अन् 'निष्कलंक लोह' युग सुरू झाल्यावर मग कुठल्या युगातले डबे तुमच्याकडे आहेत हे 'स्टेटस् सिम्बल' होऊन बसलं. कल्हई नाहीशी झाली– पितळ उघडं पडलं !

दिल्लीला असताना, अगदी सुरुवातीला, तिथली एक पद्धत, पंजाब्यांची आणि इतरही काही लोकांची, मला फार सोईस्कर वाटायची. रोज आपलं थोडं थोडं सामान–किराणा आणायचा, पुडचात न. लागेल तेव्हां त्या पुडचा सोडायच्या, वापरायच्या. कागद फेकून दिला. परात समोर घेतली. बाजारातून आटा आणला. परोठे केले, खाल्ले. परात पालथी ! आमच्यासमोर तर 'वृक्षमूलेऽपि दयिता यत्र तिष्ठति तत् गृहम्' या न्यायानं लिंबोणीच्या झाडाखाली स्वयंपाक चाललेला असतो. गरजा वाढत गेल्या, डबे वाढत चालले. ज्या भरण–पोषणाकरता द्रव्यार्जन करायचं, तेसुद्धा उदरभरण डब्बे-वाल्याच्या डब्यातूनच, घाईगर्दीतच. लहान मुलांनी शाळेत गेल्यावर, त्यांचा सुरुवातीचा कार्यक्रम 'डबे खाणे'. जेवण नव्हे !

पण मग हे इतके डबे– इतक्या बाटल्या निघाल्यावर त्यांचे आकारही मनमोहक होऊ लागले. वरचे आकार बदलले, आतल्या वस्तू बदलल्या. पूर्वी मला बाटलीत गेलेल्या पलंगाचं फार आश्चर्य वाटायचं. अत्यंत कठीण आणि कलाकौशल्यपूर्ण गोष्ट म्हणजे बाटली-तला पलंग ! (अर्थात बालवयातल्या चित्तथरारक अशा कहाण्यात, राक्षस पण बसत असत बाटलीत जाऊन.) असं वाटे; कसा गेला असेल पलंग त्या एवढ्याशा तोंडातून ! अन् आता हल्लीच्या फ्लॅट-मध्ये कसरत करून सामानाची मांडणी करताना त्याची आठवण येते. त्यावेळी तर नुसते पलंगच बसवीत बाटलीत, पण आता टीचभर घरातल्या वीतभर जागेत, बाटलीत बसलेला बगीचा पण पाहावयास

मिळेल. इतकंच नव्हे तर क्वचित काळो पोस्टखात्याचं काम पण या बाटलीनं केलेलं ऐकलंय. कोणीतरी म्हणे बाटलीत निरोप लिहून ती बाटली समुद्रात सोडून द्यायची. जेव्हा केव्हा, ज्याला कुणाला तो निरोप मिळेल तेव्हा मिळेल–पोस्टातला तरी कुठे नेहमीच वेळेवर मिळतो !

आता जागेच्या अभावी, घरं पण बंद डब्यासारखी बनू लागली आहेत. काडचापेटीसारखी, व्यक्तित्वाचा ठसा नसलेली. निदान बाहेरून तरी. माझी एक मैत्रीण म्हणते– चौसोपी घरातल्या मनाची फरफट होते अशा बंदिस्त वातावरणात. अन् मग त्याच जागेच्या अभावामुळं, ताज्या हवेतली, झाडावरची फळं तोडून खाणं आणि बंद डब्यातली, अगदी ताजी वाटणारी फळं खाणं–असलाच फरक खाण्यात आणि जीवनात पडत गेला. शास्त्रज्ञ म्हणतात– आम्ही स्वाद टिकवण्याचा प्रयत्न करतोय. पण तोच स्वाद असणं आणि असलेला स्वाद टिकवणं यात फरक आहे.

पुष्कळदा काही काही गोष्टी अटळ असतात. विज्ञानाची प्रगती म्हणून म्हणा, काळाचा परिणाम म्हणून म्हणा, पण सुरुवाती सुरुवातीला रिकामी असलेली ही 'डब्बा बाटलीवाली'ची पाटी आता सर्वत्रच भरून ओसंडते आहे. पाश्चिमात्य देशात तर म्हणे आता ही समस्या म्हणून उभी राहिली आहे. वस्तूंची अमापता हाताबाहेर गेली की त्यांची विल्हेवाट कशी लावायची हा प्रश्नच पडतो. असलाच यक्षप्रश्न अमेरिकेसारख्या देशापुढे आहे. या सगळ्या डब्यांचं, वाटल्याचं, इतरही अनेक वापरून कचरा झालेल्या वस्तूंचं करायचं काय ! सुरेख सुरेख दुधाचे डबे, सावणांचे डबे, अनेक वस्तूंच्या लोभनीय बाटल्या, मागच्या वर्षीच्या परदेशीय दौऱ्यात इतक्या पाहिल्या की नेहमीच्या सवयीनुसार वाटलंच की घेऊन जाव्यात थोडचाशा. पण मग बहुधा त्या सामानाकरताच एखादं विमान चार्टर करायची वेळ येईल या ह्यांच्या धमकीमुळे नाइलाजानं तो विचार सोडून द्यावा लागला. मागच्या कुठल्या तरी एका महिन्याच्या 'रीडर्स डायजेस्ट'मध्ये चित्र पाहिलं, डब्यांना डबे चिकटवून एक बुजगावणं केलं होतं. कल्पना

चांगली होती. डब्यांचं एक सोडून द्या. पण शेवटी आपण निर्माण केलेल्या सगळ्याच गोष्टी अशा बुजगावणं म्हणून आपल्यासमोर उभ्या राहता कामा नयेत. देवांनी वर दिलेल्या अनेक असुरांसारखं.

मात्र कधी कधी या सभोवतालच्या अशांततेला उबगलेलं मन विचार करतं, गॅसच्या, ऑक्सिजनच्या सिलिंडर्सप्रमाणं, शांततेची सिलिंडर्स तयार करता आली तर किती छान होईल. पण आवाजावरचा उपाय म्हणजे आवाज–बंद (साउंड प्रूफ्) खोल्याही नव्हेत, त्यामुळे आवाज नाही बाहेरचा, असा आभास निर्माण होतो. शांतता निर्माण होत नाही. झाली तरी आपल्यापुरती. बाटलीत चाफ्याची फुलं ठेवून फक्त त्यांचाच ताजेपणा टिकावा तशी. बाटलीच्या बाहेर काढताच काळी पडतात.

पण इतक्या सगळ्या विविध पेटचा–डब्या–बाटल्या यांचा अनाठायी संग्रह करीत असताना वाटून जातं, हे आपलं मन, हे आयुष्य ही पण एक कुपीच आहे. कुणाची असेल टिनाची, कुणाची असेल सोन्याची. कुणाची ओबड धोबड, कुणा एकाची नाजूक हस्तीदंताची, नकस कामाची. या प्रवासाकरता त्यांत जे पाथेय बरोबर आलं असेल तेच महत्त्वाचं. त्याचा नीट साक्षेपानं वापर करायला हवा. त्यात दुसरं काही ठेवून चालत नाही. पॅण्डोराच्या डब्यात, अगदी शेवटी तळाशी असणारी वस्तू होती, तिचं नाव आशा ! जीवनाच्या कुपीत जोपर्यंत हा आशेचा सुगंध असतो, तोपर्यंत त्या कुपीला महत्त्व–अर्थ. नाहीतर मग जीवनाचंच बुजगावणं बनतं. त्या मौल्यवान कुपीची बनते 'डबा–बाटली' – रद्दीवाल्याच्या पाटीत खडखडत जाणारी !

* *

पाऊलखुणा

मत्त मयूर !- मुक्त मयूर

पिहचु ! पिहचु ! !

'ए ! मोरानं पिसारा उघडला रे उघडला.'

मागच्या रस्त्यावरून आवाज ऐकू आले, किशोरांचे, बालांचे एकमेकाला हाकारल्याचे, अन् पट्पट् असे पायांचेहि, पळत पळत गेल्याचे. मला एकदम जाणवलं. काही काही गोष्टीचं अप्रूप, माणसाला अगदी जन्मभर वाटत आलं आहे !

विशेषत: लहानपणाच्या काही गोष्टी तर ठरलेल्या असतात जणु काय ! मोराची पिसं गोळा करायची, ती पुस्तकात ठेवायची, त्यावर हळद कुंकू टाकायचं. ती देखणी पिसं फुलवून भितीवर लावायची हा तर आवडता उद्योग ! तरुण वयात स्वप्नं फुलवून, त्यांच्या भिती बांधण्याचा प्रयत्न असतो !

भारद्वाज दिसला रे दिसला की त्याला उजवी घालायला धावायचं अन् तो तर जातो तुमच्या अगोदर पळून. कोकिळा कुऽहु कुऽहु करायला लागली की, प्रतिसाद देऊन तिला चिडवणारे कोकिळकंठी अनेक असतात. पण लहानपणाचा अन् जराशा मोठेपणी पण माझा आवडता शकून म्हणजे नीलकंठ पक्ष्याचं दर्शन ! अन् त्याचबरोबर गवतात दिसणारी इवली इवली विष्णुक्रांताची फुलं. गवताच्या हरियालीवर, आकाशाच्या निळाईचे जणु थेंबच पडले आहेत अशी. शकुनावर तुम्ही विश्वास ठेवा अथवा नका ठेवू. पण त्या त्या सौंदर्यांच्या दर्शनानं

मन सुखावून जातंच, नाही का ! त्रिगुणातल्या एका गुणाचा साक्षात्कार म्हणजे शुभशकून. ही सौंदर्याची ओढ अगदी लहानपणापासून असते– असावीच.

म्हणूनच, मोराचा फुललेला पिसारा पाहून, आनंदित झालेली बालमनं ऐकली. माझंहि मन सुखावलं अन् एकदम मला माझ्या मोराची आठवण झाली. पुस्तकातली मोरपिसं पुस्तकातच बंदिस्त होती. अन् मोरपिशी स्वप्नं प्रत्यक्षात आणण्याची धडपड सुरू होती, त्यावेळची गोष्ट.

तर हा माझा मोर मी पाळला वगैरे नव्हता. पण काय झालं होतं की आम्हाला 'मोराचं घर' मिळणार होतं. सात वर्षं वीतभर जमीन आणि टीचभर भिंती असलेल्या घरात राहून जीव उबून गेला होता; आणि आता आम्हाला घर मिळणार होतं, चित्रात असावं तसं. हिरव्याकंच गवताचे मऊ गालिचे मागेपुढे पसरलेले, ग्रीक बनावटीचे पांढरेशुभ्र खांब असलेला प्रशस्त व्हरांडा. फुलं तर अनेक प्रकारची, अनेक रूप–गंधाची, अनेक रंगांच्या विविध छटा ल्यालेली. हिवाळा संपत आला होता पण फुलांचं देखणेपण कमी झालं नव्हतं.

फ्लॉक्स, लेडीजलेस, कॉसमॉस...त्यातूनच डोकावणारी पिवळी जुई...बोगनवेल तर सगळ्यातच पूर्णपणे गुरफटलेली; दाराला कमान केली आहे, असं वाटणारी. त्या सुगंधित रंगानं डोळे सुखावताहेत तोच कानावर साद आली 'पिहचु'– नवीन घराच्या आवारात आम्ही शिरतच होतो अन् जणू कोणी म्हणालं, 'या'– समोर पाहिलं तर म्हणतात तसं 'अहो ! आश्चर्यम् !' त्या ग्रेशन खांबाच्या मध्ये असलेल्या पायऱ्यांपैकी एकीवर, एक मोर पिसारा फुलवून उभा होता ! वाटलं पुस्तकातली, बाल्यातली आणि यौवनातली सगळी मोरपिसं एकत्र होऊन, त्या नूतन गृहाच्या द्वारी उभी आहेत. असं अनपेक्षित अन् मनोहर स्वागत कुठल्याही नवीन घरात झालं नव्हतं.

मी सहजच माळ्याला विचारलं, 'कुठला रे मोर हा' तर तो म्हणतो 'बाई, इथलाच, बहुधा याच बंगल्याच्या आवारात असतो.' इतक्यात, शेजारच्या घरातून एक बालरूप धावतपळत येत होतं,

'मावशी, तुम्ही आलात आता, या मोराच्या घरात राह्यला ! मी येत जाऊ रोज त्याला पाह्यला'– धावता धावता लागलेला दम, कोंडलेला श्वास मध्येच फुसकन् बाहेर पडतो. 'आमच्या घरात किनई ऽ बाग नाहीये ना, म्हणून मोर नाही येत आमच्या इथे.' मी त्याला जवळ घेऊन म्हटलं,' 'अरे तूच तर मिठूमिय्या आहेस. मिठ्ठास. बरं... बरं... येत जा हं तू हवं तेव्हा.'

मग मला आठवलं, आमच्या पूर्वी, या बंगल्यात राहणारे डॉ. पाल एकदा म्हणाले, 'या आठ नंबरच्या बंगल्यात दोन कायमचे रहिवाशी आहेत; एक म्हणजे चिचुंद्री, घरात नित्य वावरणारी (ते तिच्या 'श्रू' या इंग्लिश नावावर जोर द्यायचे !) अन् दुसरा मोर, बगीच्यात, मालकी हक्कानं, ऐटीत वावरणारा–फिरणारा. अन् मग रोज सकाळी 'स्विस्–स्विस्' असा आवाज यायचा म्हणजे समजावं मयूरपंतांची बागेतली प्रभातफेरी सुरू झाली म्हणून. सकाळचे दोनतीन तास तरी बागेत वास्तव्य असायचं. तितक्या वेळ माळ्यांना त्यांच्या मागे रखवालीचं काम. कुठल्या वेळी, कोणाच्या झाडांच्या शेंड्या हा शिखावल उडवील, याचा नेम नसायचा.

आला की अगोदर बाहेरच्या पांढऱ्या फाटकावर बसेल. तिथून एक ललकारी 'मिआंव'ची. म्हणजे जणू काय 'मी आलो.' त्या फाटकावर बसल्यावर त्याचा तो बंद पिसारा, जमिनीपर्यंत लागत असे. वाटायचं, एखादी नवयौवना, आपला निळसर छटा असलेला विपुल केशसंभार, खांद्यावरून समोर घेऊन, उन्हात धूपवीत, बसली असावी. अशा ऐटीत बसला असायचा–जणु म्हणतोय काढ माझं चित्र ! मी म्हणायची–अरे, अनेक समर्थ कुंचल्यानी टिपलेले तुझं रंग ! मी कसे ते फिके पाडू ! नीलकंठ हे तुझंहि सार्थ नाव, सार्थ रूप. ते माझ्या अंगणी नाचतंय् त्यातच समाधान आहे.

मग, त्याचं जे टाहो फोडणं सुरू व्हायचं–ते चांगलं ऊन तापेपर्यंत. मीहि तापू लागायची ! एरा कुंपणापलीकडची मैत्रीण म्हणायची, झाली वाटतं तुझ्याकडची 'केकावलि' सुरू. तर दुसऱ्या बाजूचं कुंपण फारच अरसिक ! ती म्हणायची, 'अग, केकाटणं म्हण !'

—म्हणजे बघा एकच गोष्ट, आपण कशी बघतो ती ! नाण्याला दोन बाजू असल्या तरी त्या इतक्या परस्परविरोधी असू नयेत ! समोरच्या घरात राहणाऱ्या, कुसुमबेनचा नमुना तर आणखीनच न्यारा ! ती म्हणायची, ' हमारे घरमें क्यों नही आते यह मोर–मोरनी ? अच्छा शगुन होता है। भेजिये ना उनको जरा ! आपका बगीचा क्या ज्यादा खूबसूरत है।' म्हणजे आता बघा ! मी काय, त्या मोराचं पार्सल का करून पाठवायचं ! स्वानंदात नाचणारा पक्षी तो !

आणखी पुढंहि तिचं वक्तव्य चाललेलंच ' मोर और मोरनी का जोडा कैसा अच्छा लगता है न !' म्हटलं जोडा काही लक्ष्मी–नारायणा-सारखा दिसत नाहीये, पण मोरनी हे नाव मात्र छान वाटतं, आपल्या लांडोरपेक्षा ! नाकातल्या चमकीसारखं वाटतं.

त्या मोराचं आवडतं ठिकाण होतं मागच्या बाजूला असलेलं कडुलिंबाचं डेरेदार झाड. जवळजवळ वीस–पंचवीस वर्षांचं जुनं. बुंधा दोन्ही हातांच्या कवेत मावणार नाहीसा. आजूबाजूच्या कॅक्टस्नी आपली भेंडोळी त्याच्यावर चढवलेली. ऊनसावलीचा खेळ, त्याच्या पानापानातून चालायचा. झाडातून येणारे कवडसे त्याच्या पिसाऱ्यावर पडून ते सगळे पंख झळाळून निघायचे; तर काही कवडसे खालच्या गवतावर सांडायचे, अन् त्यालाच मोरपिसाऱ्याचं स्वरूप यायचं. सुरेखच वाटायचं.

एकदा माझ्या मनानं घेतलं, त्या बागेच्या कोपऱ्यात जराशी भाजी लावायची. तशी माझी ही गद्य कल्पना, कुणालाहि फारशी रुचली नाहीच. पण मनात म्हटलं, भाजी खाल्ली की कल्पनाहि पचेल. शालजोडीला ठिगळ वगैरे सगळ्या कल्पना बोलून झाल्या. मी त्या मुकाट्यानं ऐकल्या अन् वाफ्यांत भाजीच्या बिया टाकल्या. कोथिंबिरीची, पालकांची, इवलीशी रोपं जमिनीतून डोकावून पाहू लागली. काळ्या मातीवरच्या हिरव्यागार रेखांनी मी खूष झाले, पण कसचं काय ! आमच्या ' मोरू ' भाऊंना पण ही माझी कल्पना फारशी आवडली नसावी. कल्पना आवडली नसली तरी कोवळी भाजी त्यांना

मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
अ. क. 3702
दिनांक 24637
ग्रंथ शाखा

फारच प्यारी ; रोज पहावं तर, 'चुटुक् चुटुक्' करून अन् मान वाकडी करून, माझ्या भाजीची चटणी करणं सुरू होतंच.

फुलांच्या बारीक बारीक कळ्या पण तोडायला पाह्यचे, पण माळ्यांच्या पुढे, त्यांचा क्षेत्रात टिकाव लागेना. त्यामुळं त्यांनी सगळं उट्टं माझ्या वीतभर बागेवर काढलं. अन् त्यानंतर मात्र ती जोडी तिकडे चारपाच दिवस गायब होती. आजूबाजूला होती ना शेतं हिरवीगार. तिकडे असायचा कधीमधी फेरफटका मारायचा. मग मात्र बागेत एकदम शांतता. पण तेहि बरं वाटायचं नाही, मिठ्ठूमिया अन् मी सारखीच त्या जोडीची वाट पाहत असू. मिठ्ठूमियांनी माझं नाव ठेवलं होतं मोराची मावशी. (नशीब, मोरूची मावशी नव्हतं!) काही दिवस असे सुने गेले की मग पुन्हा, सूर्याच्या प्रकाशात, ते हिरवे निळे 'डोळे' चमकू लागायचे. या सगळ्या रूपाला न साजणाऱ्या पायावर इन्द्रधनुष्य डोलू लागायचं. मिठ्ठूमिया म्हणायचे 'नाचे रे मोरा– पण मावशी, आंबे कुठे आहेत!' त्याचा मनमोर तरी कुठे एका ठिकाणी स्थिर रहात होता! एका विषयाकडून दुसरीकडे त्याच्या चिमुकल्या मनानं वर्तन चाललेलं असायचं.

तर असं हे मयूराख्यान सुरू असायचं आमच्या बागेत. ऋतूंचे रंग बदलले, फुलांची रूपं बदलली. आमच्या शेजारचा मिठ्ठूमिया गावाला निघून गेला– उन्हाळा आणि सुट्टया म्हणून. हळूहळू त्या जीवघेण्या उन्हाळ्या नंतर, परत मेघ जमू लागले. नुसतेच हुलकावण्या दाखवू लागले. त्यांना आमचे मयूरपंत पण हाकारू लागले. पण मोर काय किंवा मेघ, बोलावल्यावरून थोडेच येणार! एक दिवस मात्र पावसानं मनावर घेतलं अन् अगदी मनापासून पडला. पण तो उत्तरेकडचा पाऊस पहिल्या सपाट्याला काहीं धरणी सुखावत नाही. उलट संतप्त वाफारेच बाहेर येतात आणि त्या उष्म्यामुळं संत्रस्त झालेले, भूमिस्थित प्राणी, पण विशेषेकरून साप; रात्री दिवसा कधी कुठं दर्शन होईल, ती नागमोडी रेखा सळसळत जाईल, कल्पनाही नसायची.

रात्री नोकरांचा आरडाओरडा–'मारो पीटो–बहोत जहरीला है'. मग काठ्यांचे आवाज आणि सुटकेचे निश्वास. सकाळी मोर दिसला की

त्याला म्हणायची 'अरे ! शत्रू ना तुझे. काय करतोस तू. त्यांच्या नागमोडी चालीची भीती वाटते ?' त्या रात्री असंच झालं. सगळ्यांच्या आपसातल्या गप्पा मंदावत, डोळे मिटत होते. तोच कुणाच्या तरी किंकाळीनं त्या नीरव शांततेला तडा गेला. 'क्या हुवा, क्या हुवा' करत सगळे उठले. मला बाहेर अंगणात आलेली पाहून एकजण म्हणाला, 'माईजी आप बाहर मत आना. जोडा है।' मला कळेचना. म्हटलं– मोराची जोडी आता याला रात्री कुठे दिसली. ती तर झोपली असतील, झाडावर.

पण मग मघाचाच माणूस म्हणाला– तो जोडा नागाचा होता. त्यांना पाहणं म्हणजे अशुभ. कुठली जोडपी पाहावयाची आणि कुठली टाळायची, मोराचं देखणं अन् नागाचं अभद्र. तसं तर त्या जनावरातहि देखणेपण होतंच. पण त्याचं स्वरूप रौद्र. मग ही भद्राभद्रतेची कल्पना माणसाच्या सुरक्षिततेवरच निर्भर असते, नाही का ! त्या देखणेपणाच्या रौद्रत्वाची प्रचीती मीच पाहिली एकदा. एका बाजूला डोलणारा, नयनरम्य असा मोराचा इन्द्रधनूषी पिसारा अन् दुसरीकडे तसाच डोलणारा डौलदार नागाचा फणा ; जणू एकमेकांचं बल मापत होते; मोरानं मान वाकडी केली अन् सळसळ गवतात नाहीसा झाला.

तर अशा रम्य अन् रौद्र सौंदर्याच्या नृत्यदर्शनात दिवसरात्री पळत होत्या. मी म्हणायची, 'जसं घर हे उंदीर–घुशीचं तसं अंगण हे सर्प–मयूरांचं.' मी नंतर दुर्लक्षच करू लागले. रोजचंच मयूराख्यान अन् नागांची कहाणी सुरू असायची. या माळी लोकांना बरं– तेवढाच वेळ जास्त झुरके ! त्या संध्याकाळी मात्र विलक्षण उकडत होते. अंगातून घामाच्या सहस्रधारा सुरू होत्या. वारा अजिबात बंद होता. झाडाचं पानन्पान चिडीचिप् होतं. दिल्लीतला ऑगस्ट महिना सहन केल्याशिवाय समजणारच नाही. उकडणं म्हणजे कसं असतं त्याचं प्रात्यक्षिक.

कोणाच्याहि गप्पा रंगेनात. रात्र चढली तरी डोळ्यांत नीज चढेना. इतक्यात कुणीतरी बाहेर जाण्यासाठी टॉर्च पेटवला अन् काय झालं– काय दिसलं, कुणास ठाऊक. सपासप, हातातल्या लहानमोठ्या

काठ्या, अन् जे जे काय असेल ते एका विवक्षित दिशेनं फेकलं गेलं. त्या सगळ्या आवाजात पंखाचा फडफडाट ऐकल्यासारखा वाटला. प्रत्येकानं आपला रोखलेला श्वास सोडला आणि मग अंगणहि मोकळं झालं निःशब्दतेत– अस्वस्थतेत.

दुसऱ्या दिवशींच्या पहाटवेळच्या सूर्यकिरणांवरोबरच, आजूबाजूच्या लोकांचं कुजबुजणं ऐकूं येऊ लागलं मागच्या अंगणाच्या आजूनं. इतके दिवसाच्या मळभानंतर आकाश स्वच्छ होतं. दुपार तापणार होती; पण निदान सकाळ शीतल प्रसन्न होती. सहजच, माझी पावलं कालच्या प्रसंगाच्या स्थळाच्या अनुरोधानं निघाली. त्या विशाल लिंबाच्या खालचं गवत तुडवलं गेलं होतं, सकाळच्या नितळ उन्हात न्हालेलं एक पिवळं धमक वेटोळं सैल होऊन पडलं होतं. अन्... तिथंच अन् त्याच त्या लिंबोणीच्या झाडाखाली, मयूर नृत्य कायमचं शांत झालं होतं. मला एकदम मिठ्ठूमिय्याची आठवण झाली. त्याच्या चिमुकल्या डोळ्यातली प्रचंड भीति पाहवली नसती. कटुतेची फळं आणि अत्यंत मधूर अशी नाजुक फुलं धारण करणाऱ्या त्या प्रचंड वृक्षाच्या उन-सावलीत भुजंग आणि भुजंगभुकं, रौद्रता आणि रम्यता, दोन्हीही आपलं जीवन–नृत्य थांबवून चिरविश्रांति घेत होते. सकाळच्या सौम्य उन्हात, मोरपिसांचे ते अनेक डोळे, आपल्याच मिटलेल्या त्या दोन डोळ्यांकडे पाहत होते. बहुधा झाडावरून पडतापडता, कॅक्टाय्वर अडकून पसरलेला, बर्हिनाचा तो पिसारा तितक्याच निर्जीवतपणे झळाळत होता. जीवन मिटलं तरी मोहक स्वप्नच फक्त उरतात तसा. पण स्वप्नं उरतात म्हणून जीवनहि परत परत उमलत जावं !

* *

पाऊलखुणा

क्षण असे हे चिरस्थायी

चिरस्थायी ! नेहमी करता असणारा. कुणाच्यासाठी थांबलेला ! पण खरं म्हटलं तर, असतं काय या जगात, चिरस्थायी असं ! म्हणतात ना असं की, काळ आणि समुद्राची भरती, थांबत नाहीत, कधीच, कुणासाठीहि ! मग क्षण तरी स्थायी असेलच कसा ? कुणाकरताहि थांबलेच कसा ? कारण जीवनाचं खरं वैशिष्ट्य म्हणजे क्षणभंगुरता !

अन् तरीहि मला वाटतं, प्रत्येकाच्या आयुष्यात, असे काही क्षण येतात की ते तसेच थबकून राहतात, जिथल्या तिथेच, स्मृतीच्या उंबरठ्यावर ! अमोल असतात, अविस्मरणीय असतात, मग ते क्षण सुखाचं मोहक रुप लेवून येवोत अथवा दुःखाचे दाट गहिरे रंग पांघरून येवोत ! कधी प्रेमाचा गुलाबी असतो, कधी वात्सल्याचा धवल असतो. येवोत कुठल्याहि रूपात–राहतात मात्र कायमचे कोरल्यासारखे. ते त्याचं चिरस्थायित्व अवलंबून असतं तुमच्या त्या वेळच्या भावनेच्या उत्कटतेवर.

क्षण क्षण मिळून काळाचं वस्त्र विणलं जात असलं तरी हे क्षण कालातीत असतात. बाटलीत बंद करून ठेवलेल्या चाफ्याच्या फुलासारखे मोहक दिसतात. ती फुलं मात्र बाटलीच्या बाहेर काढलीत तर लगेच काळी पडतात. या क्षणाचं तसं नाही. कधीहि उघडा तुमची

स्मृतिमंजूषा–त्यांचा ताजेपणा, त्यांचा सोनेरी रंग तसाच आढळेल तुम्हाला अनेक क्षणानंतरही !

तसं म्हटलं तर, सर्वसाधारण जीवनात भव्यदिव्य असं काय आढळणार ? असं वाटतं, टाळ्या मिळवण्याचे प्रसंग आयुष्यात नाही आले तरी, नशीबाच्या नावानं बोटं मोडण्याचे पण नसावेत. मान-सन्मानांच्या हारतुऱ्याच्या कलाबतूत शोभणारे क्षण मिळाले नाहीत तरी वेदनांचे वेढे तरी कमी असावेत. एवढीच अल्प अपेक्षा असते. पण शोधायचंच म्हटलं तर अशा साध्यासुध्या जीवनातही एकादा क्षण, आपल्या कुठल्या तरी वैशिष्ट्यानं वेगळा दिसतो. आपल्याला वेगळा भावतो. ते तसले वेगळे क्षण पकडण्याची धडपड !

मुलांच्या परीकथेतल्यासारखी ही काळाची चिमणी हे क्षणाचे दाणे उचलून नेत असते. त्यातला एखादा वैशिष्ट्यपूर्ण–कधी रुचकर, कधी कडवट, असा दाणा ! त्यांची येणारी यादगार–मोजदाद ! आपल्या नगण्य जीवनावद्दल खंत करीत बसण्यापेक्षा, याही जीवनात हे असे काही क्षण पकडता आले, थांबवता आले तर–तर हे सामान्य जीवनहि तेवढ्यापुरतं असामान्य होऊन जातं. काजवे मुठीत पकडून, बाटलीत भरून, सूर्याच्या प्रकाशाशी सामना करण्यासारखं वाटतं का हे ?

ही अशी क्षण पकडण्याची कल्पना मला आली ती अशी–एकदा मी आगगाडीतून प्रवास करीत होते. माझ्या समोरच्या सीटवर खिडकीजवळ, तीनसाडेतीन वर्षांचा एक गोंडस छोट्या बसला होता. गाडी सुरू झाली होती. बाहेरचे खांब गाडीबरोबर धावू लागले; तशी त्या पिल्लानं आपले चिमुकले हात बाहेर काढले खिडकीच्या, अन् ते पळणारे खांब पकडण्याचा प्रयत्न करू लागला. खांब खिडकीसमोर आला की तो आपली बालमूठ मिटून घ्यायचा, जणु तो खांबच त्याच्या हातात आल्याप्रमाणे. परत मूठ उघडायचा. खांब आला की परत बंद करायचा, हातात जरी काही येत नसलं तरी त्या पकडण्याच्या उद्योगात तो बालजीव खूप रमला होता.

आपल्या हातात शेवटी काय येत असतं ? आपणहि जीवनाच्या धावत्या गाडीतून, पळते क्षण मुठीत धरण्याचा प्रयत्न करतो. पण तेही तसेच, त्या धावणाऱ्या खांबासारखे, जवळ येत येत, डोळ्या-समोरून निसटून जातात. तरीही अट्टाहास हा चाललेलाच असतो, मग मलाही असं वाटू लागतं, काही नेमके निवडक क्षण, पकडून ठेवले, तरच आयुष्य सुसह्य होत जाईल. गाणारा जसा, स्वरांचा आविष्कार करताना नेमकी सम पकडतो, तसंच या विषम गोष्टींनी भरलेल्या आयुष्यात या यादगारीचे हे क्षण म्हणजे साधलेली समच आहे. आयुष्य बेताल, बेसूर तरी होत नाही.

त्या इवल्याश्या मुठीत, खांब सापडले नाहीत, तरी त्याच्या लेखी काळ थांबलेला असतो. वर्तमान हाच त्याचा क्षण असतो. आपल्या स्वतःच्या अस्तित्वाशिवाय, इतर गोष्टींचं बंधन-भान काहीच नसतं. चाललेला जो क्षण तो त्याचा. –जे 'आत्ता' ते खरं, ते शाश्वत. आपण मात्र, वय वाढत गेलं की–पुढचा क्षण जगण्याचं स्वप्न पाहत असतो. अन् मग सगळेच क्षण निसटून जातात, पाऱ्याच्या थेंबासारखे !

पण तेच थेंब काचेत बंद करून ठेवले की तपमान कळतं. तसंच या बंदिस्त स्मृतीनी आपल्या आयुष्याचं – तालमान – तापमान कळतं. सुखदुःखाचा थंडावा–संताप समजतो. सुखाचा उच्चांक अन् दुःखाची खोली प्रत्ययास येते. म्हणूनच असं वाटतं, आपण कसं मैत्रिणीला म्हणतो–क्षणभर थांब. तसंच या क्षणांना म्हणावं–जरा थांबा !

कारण असतात काही क्षण की जे आपल्या लेखी, आपल्या-करता थांबलेले असतात. ते आपले असतात. 'तत्रैव तस्थौ' अशी त्यांची अवस्था असते. अनेकदा हारतुऱ्याचे चकचकीत गेंदेदार क्षण येऊन जातात आयुष्यात. अगदीच नाही असं नाही ! पण ती चमक कलाबतूची असते, सुवर्णाची नाही. ते फक्त आपलेच नसतात. ज्याला पब्लिकपणाचा उडून जाणारा वास असतो, ते क्षण सोडून द्यावेत. गळ्यात घातलेल्या हारांसारखे तेही काढून ठेवायचे. मी म्हणते ते

क्षण हे नव्हेत ! तसे ते अगदी साधे असतात. जसे 'अवचिता परिमळु। झुळकला अळिमाळु,' तसे अलगद येतात, न कळवता.

असं वेळेला पकडायचा प्रयत्न आपण लहानपणापासून करतो, नाही का ! शाळेत असताना, मुद्दामच आम्ही घड्याळ पुढे ठेवत असू, शाळेत जायला उशीर होऊ नये म्हणून ! जणु काय, तेवढीच १०-१२ मिनिटं वेळ जो काय जास्त मिळेल तो बोनस म्हणून समजायचा. मात्र खऱ्या रूपात असा बोनस कधी मिळत नाही. सकाळी उठताना सुद्धा पुष्कळदा वाटतं, अरे, घड्याळ पुढे आहे· झोपू या चारदोन मिनिटं ! म्हणजे असे जास्तीचे क्षण पकडण्याचा नेहमीचा प्रयत्न असतो.

एकदा काय झालं, प्रवास होता विमानाचा, पटकन होतो असा वाटणारा. आम्ही विमानात चढून बसलो अन् वाट पाहत होतो, पोटाला पट्टे बांधण्याची (तसे ते नेहमीच आवळले तर तोंडं तरी कमी चालतील !) पण विमान काही केल्या सुटेना. ठरलेली वेळ कधीच होऊन गेलेली. काय तर म्हणे कोणी व्ही. आय. पी. येणार होते. शेवटी तापलेल्या आमचं, सुटलेल्या घामामुळे, 'साल्टेड अॅण्ड बेक्ड' व्हायच्या आत विमानाची घरघर सुरू झाली. 'पहिलं नमन' होऊन विमान सुटलं एकदाचं !

तरी पण, कंटाळवाणेपणानं विमान सुटण्याच्यापूर्वीच परीसीमा गाठली होती. सहप्रवासी पाहण्यास, आणि लिमलेटच्या गोळ्या तोंडात टाकण्यास सुरूवात झाली. काही वेळानं विमानानं सूर धरला एकसंथ अन् त्या तालावर मी झोपी गेले. मध्ये एकदा डोळे किलकिले करून पाहिले घड्याळात, तर वाटलं अजून चांगला तासभर अवकाश आहे. तर अनाउन्समेन्ट ऐकली परत पट्टा बांधण्याची ! म्हटलं म्हणजे हे आहे तरी काय ? पाहिलं तर घड्याळच बंद होतं !

मला वाटला होता-तसा तो कंटाळयाणा तास नव्हताच-निदान माझ्या लेखी तरी ! मला इतकं बऽरं वाटलं ! पण मग असंहि वाटलं, हवे असलेले क्षण थांबवता यावेत अन् नको असलेले क्षण नकळत निघून जावेत. विशेषतः प्रतीक्षेचे. आयुष्य किती सुसह्य होईल, नाही ? तरीही काही क्षण असे असतात ही जे आपल्या लेखी थांबलेले असतात.

कारण जे काय पाहिलं–अनुभवलं ते आम्हाला तरी भव्य वाटतं. कधी न कल्पिलेलं असतं. वर्षापूर्वी कैरोनजिकच्या अफाट वाळंवटात मी उभी होते एकटीच. अनंत काळातले अनंत क्षण एकत्र येऊन एकादं युग बनावं तसे ते अनंत–अपार वाळूकण समोर पसरले होते. शेवटही दिसत नव्हता त्यांचा. संध्याकाळची वेळ. सूर्य झरझर खाली उतरता होता. त्याला लपायला इवलासा पण डोंगर नव्हता. कुठलीच आडकाठी नव्हती. अगदी क्षितिजाला टेकेपर्यंत, पर होईपर्यंत, त्याचं दर्शन होत होतं. वाळवंटातला गार वारा वहात होता. त्यालाहि अडथळा नव्हता कुठेच. निसर्गच सगळा मुक्त होता. त्या विस्तीर्ण वाळवंटात, एका अतिसूक्ष्म वाळूच्या कणासारखी मी, त्या अनुपम सूर्यास्ताचं निर्वेध दर्शनसुख अनुभवत होते. दिव्यत्वाचा साक्षात्कारच ती ! तो सोनेरी क्षण त्या तिथेच थांबला आहे. तो कधीही मावळणार नाही स्मृतीच्या क्षितिजावरून !

अगदी लहानपणापासून कोरलेला क्षण मात्र रक्तवर्ण धारण केलेला आहे. माझं वय 'लालयेत् पंचवर्षाणि' या सदरात मोडणारं. कोणीतरी सांगत होतं कुणाला तरी, 'मुलींना भेटवा शेवटचं !' वास सगळीकडे रक्ताचा. येत्या जीवानं जननीलाच जाण्याचं बोलावणं आणलेलं ! खोलीतली शांतता बोलकी, शब्द मात्र अबोल झालेले. आईचे शेवटचे शब्द ऐकले 'संभाळून रहा'– तो क्षण. आणखी काही नाही तरी तो क्षण मात्र सांभाळला आहे !

पण अनेक प्रसंगात किंबहुना जीवनातच जसं आपण काही क्षण संभाळतो, तसं संभाळण्यासारखं, काहीतरी देणारं, अन् आपल्यालाही संभाळणारं कुणीतरी असतं. ती व्यक्ति त्यावेळी आपल्याला मिळते तोही क्षण आपल्या लेखी कुपीत बंद झालेला असतो. ज्यावेळी दोन हातांचे चार हात होतात अन् चार डोळ्यांचे दोनच डोळे उरतात तो क्षण. बाकी आयुष्य पुढे पुढे जात असलं तरी डोळ्यातल्या बाहुली प्रमाणे जपला जातो. 'तरि अयुष्याते अवघ्या क्षण भूषवी–'

पुष्कळदा ग्रीन लाईट न मिळाल्यामुळे आपलं वाहन थांबलेलं असतं. आपल्या आजुबाजूलाही, भरभर येऊन बरीच वाहनं थांबतात.

विरुद्ध दिशेची वाहतूक चाललेली असते, त्यावेळी एक विचित्र भावना येते. आजुबाजूचं जग चाललेलं आहे अन् आपणच थबकलेलो आहोत. सगळे गतिमान आणि आपणच स्थिर! मजेशीर भावना. ते क्षण थांबलेले असतात पण निष्क्रिय नसतात. एक प्रकारे 'पल्सेटिंग'– सळसळणारे असतात.

ज्या क्षणी तुमच्या जीवनातून निर्माण झालेल्या, त्या इवल्याशा जीवाचा पहिला रूदन स्वर कानी येतो तो क्षण तो मातेच्या मनी तिथेच स्थिरावलेला नसतो काय? त्याच्या केसाच्या हळूवार स्पर्शात गुरफटलेला तो क्षण आपल्या जागेपासून केसभरही हललेला नसतो. इतकंच नव्हे तर त्याचा पुनः प्रत्यय येतो. नंतर दोन तपांनी–तीच प्रतिकृति परत साकार होते. जावळाचा तो स्पर्श–तोच गंध–त्याच स्मृति. दुधावरच्या सायीसारख्या! थांबलेला क्षण म्हणतो–बघ माझ्यातून असे अनेक क्षण येत जातील, कारण मी कालातीत आहे!

माझ्या एका मैत्रिणीनं लिहिलं होतं. 'यंदा भाद्रपदात काही गुलाब लावले होते. चार फुलं आली. गुलाब लावल्यापासून उमललेली फुलं घरात आणीपर्यंत मनाला गुंतवणूक. ईश्वराची किमया जवळून पाहण्याची–' हीपण जीवनोत्पत्ति–ती पहिली कळी ज्यावेळी हंसली असेल, त्यावेळी त्या किमयेचा, हास्याचा सुगंधित क्षण माझ्या मैत्रिणीनं, बंदिस्त केला आहे–नक्कीच!

'आय फील द टेन्डरनेस ऑफ ग्रास इन माय फॉरेस्ट वॉक, द वेसाइड प्लॉवर्स स्टार्टल मी–'

असे अनेक क्षण! असं म्हणतात 'एव्हरीबडी फिअर्स टाईम, बट् टाईम फिअर्स द पिरॅमिड्स,' त्या पिरमिड्सनी जणू काळालाच दहशत घातलेली आहे. तसंच इजिप्तच्या वाळवंटात, आयुष्याच्या कूट प्रश्नासारखी स्फिंक्स् कशी स्थिर बसली आहे. तसेच हे क्षण स्थिर–चिरस्थायी झालेले असतात. टागोरांच्या 'शामली' या कवितेत अशी कल्पना आहे–जांभळांच्या झाडांची जंगलं आपले हात उंचावून, आकाशात पळत जाणाऱ्या ढगांना म्हणतात, 'थांबा! थांबा! पूर्व दिशेच्या वाऱ्यावर स्वार होणाऱ्या ढगांनो! थांबा! कारण ते ढग

असतात जीवनदायी ! त्याची रंगरूपं विविध असतात. सर्वसामान्य असतात. महत्त्व असतं ते त्या क्षणातल्या भावनेच्या आत्यंतिकतेला ! त्या क्षणाच्या तुमच्याशी–फक्त तुमच्याशीच साधलेल्या समन्वयाला. ते असले क्षण पकडून ठेवायला हवेत या पळणाऱ्या जीवनात मग आणखी काही नाही साधलं तरी तुमचा तुमच्याशी तरी समन्वय साधला जाईल.'

कारण, आयुष्याच्या शेवटी मात्र सगळेच क्षण थांबलेले असतात. क्षणच कां, सगळा जीवनौघ थांबलेला असतो. आपण जगत असतो, जागच्या जागीच फिरणाऱ्या भोवऱ्यासारखे. पुष्कळदा हवे असलेले क्षण निसटून गेलेले असतात अन् नको असलेल्या क्षणाची याद हृदय कुरतडत असते. तारुण्यात 'क्षणशः कणश्चैव' खटाटोप केलेला असतो. पण आता सुखाचे कण सावडीत उरलेसुरले क्षण मोजावे लागतात बरेचदा ! – तरीही ते क्षण हलता हलत नाहीत. असं होता कामा नये ! असं कुणालाही वाटू नये– हा थांबलेला क्षण बंद पडलेल्या घडयाळासारखा–चालू करता येईल काय, कायमचा बंद पाडण्याकरता !

* *

सँपल सर्व्हे

Tinkle, tinkles the little bell, But it creates a big hell. Open the door, and you meet some Sample, and you lose, your sleep ample.

बाहेरच्या दाराला लावलेली घंटिका कितीही कर्णमधुर असली तरी बहुधा, बरेच वेळा, तुमच्या कानाला तिचा आवाज नकोसा वाटतो. विशेषत: तुमच्या वामकुक्षीच्या वेळी !

वायकांविषयीच्या सगळ्या लेखांत वर्णन केल्याप्रमाणे तुमची वामकुक्षी चाललेली असते. हातातलं मासिक हळूच गळून पडतं. (झोप आणून देण्याची फार मोठी शक्ती आहे बुवा या मासिकात !) तुमच्या घोरण्याचा सूर मोठा छान लागलेला असतो; आणि त्याच वेळी, तार सप्तकात तुमच्या दारावरची बेल वाजते. ती दारावर बसवताना अगदी Sing-Song आवाज येईल अशी बसवली होती. पण तुमच्या मूडप्रमाणं, आणि वाजवणाऱ्याच्या पद्धतीनुसार तिची मधुरता कमी जास्त होत असते; त्यातूनही दार उघडल्यावर जे 'सँपल' तुमच्या समोर ठाकतं, त्यावरही !

आता या घंटीचा आवाजच घ्याना. नारोशंकराच्या घंटेपासून, खुळखुळ्याच्या खुळावणाऱ्या नादापर्यंत सगळे सगळे प्रकार तुम्हाला एकाच घंटिकेत मिळतील. आमच्या ह्यांची बेल म्हणजे षड्ज-पंचम. पण तो जलद लयीत. हातातलं काम टाकून धावलंच पाहिजे. मुलांचं बेल वाजवणं म्हणजे काळ्या-पांढऱ्या सगळ्या पट्ट्या एकत्र. ताल

जलद झपताल, म्हणजे झपाटलेला ताल ! आला गेला आहेच. तर या दाराच्या घंटेच्या तालावर माझं घरकाम होत असतं. दिवसभराचं ठीक आहे. पण ती दुपारच्या वेळी वाजली म्हणजे तिचा होतो घंटाकर्ण राक्षसच !

अरेबिअन, इटली, स्पॅनिश या देशातला 'सिएस्ता' (याने वामकुक्षी) तुम्ही अनुभवलात तर आमच्या घडीभरच्या आणि घडी घडी मोडणाऱ्या वामकुक्षीला तुम्ही हसणार नाही. 'सिएस्ता' हा शब्द मूळ स्पॅनिश. पण तो कुठल्याही भाषेत अनुभवलात तरी त्याची अनुभूती ब्रह्मानंदाची. तिकडे तर टॅक्सीवाले, दुकानवाले, सगळेसगळे अगदी गाऽढ झोपलेले असतात. तो 'सिएस्ताटाइम' भंग करणं म्हणजे महापाप !

पण ते महापाप इकडचे लोक नेहमी आपल्या शिरावर घेतात. तर एकदा अशीच भर दुपार. ब्रह्मानंदी टाळी लावण्याची वेळ. पहिला सा लावावा आणि तंबोऱ्याची तार तुटावी तशी माझ्या समाधीची पहिलीच अवस्था बाहेरच्या घंटेच्या आवाजानं भंग पावली.

त्यावेळी आतून दारापलिकडचं बघण्याचं 'व्ह्यू होल' बसवलेलं नव्हतं. अर्थात् ती व्यक्ती कोण म्हणून समजलं तरी फारसा फरक पडत नाही. आलेली व्यक्ती, जाण्याकरता आलेलीच नसते. तर आत्ताची ती घंटावादिनी म्हणजे कुठल्या एका नामांकित साबणाची सँपल्स खपवणारी मुलगी होती. म्हणजे उरलीसुरली झोप धुवून निघणार !

मी तिला तशीच परत लावणार होते. पण इतक्यात शेजारीण डोकावली. ती होती पंजाबण. 'अडोस पडोस' त्याच सगळ्या. दिल्लीला होतो त्या वेळची गोष्ट. खाटेवर बसून एक उलटा, दोन सुलटे करताना तिला तोंडी लावणं हवं होतं काही तरी. ती म्हणाली, 'बेनजो, की चल् रहा है ! होने तो दीजे डीमान्स्ट्रेसन साबून का !' असं म्हणून ती तर माझ्या व्हरांड्यात चढलीच पण इतर सहेलींना पण तिनं हाकारलं. फुकटचे चार-दोन कपडे तर धुवून होतील. आणि आणले की मोठे मोठे कपडे तिने. साबण कसा आहे

तो पाहायला ! डेमोन्स्ट्रेशन माझ्याच व्हरांड्यात. तेव्हा बालटी पाणी माझंच. कपडे तिचे धुवून निघाले. एवढंच नव्हे तर ती घामाघूम झालेली साबुनवाली निघून गेल्यावर झालेला राडा निस्तरला मीच. आणि श्रमपरिहारार्थ चहापाणी करावं लागलं मलाच. वघणाऱ्यापैकी एकही उठली नाही सफाई करायला !

हे व असे अनेक वस्तूंच्या सँपलचे नमुने. उदबत्तीचे पुडे, चहाचे पुडे असे पुडे सोडणारे तर खूपच. वैतागच सगळा. दारावर येणाऱ्या असल्या सँपल्सप्रमाणे व्यक्तीचे नमुने पण अनेक चालून येतात. अगदी नुकताच संसार थाटला होता त्यावेळची गोष्ट ! ईनमीन दोनचा स्वयंपाक. दुपारचं जेवण झालं की सुरसुरी यायचीच. आजूबाजूला हिंदी भाषा, जी मला अजून येत नव्हती. मग बोलायचं कोणाशी ! पुस्तक आणायला पाच-सहा मैल जावं लागे. मग वेळ काढायला झोप बरी. दिल्लीला तर हिवाळ्याच्या दिवसात, उन्हात ही वामकुक्षी सुरेख जमत असे, हळूहळू रंगत गेलेल्या पानाप्रमाणे ! सुखाचा तवंग सगळीकडं पसरला आहे, ही झोप हळूच, पिसाप्रमाणे, तुमच्या डोळ्यांवर उतरत असते. तुम्ही अरत्री न परत्री असता. तेवढ्यात माझी शेजारीण, आमच्या लायनीतली एकुलती एक महाराष्ट्रीयन शेजारीण, रोज हटकून बोलावणं धाडल्यासारखी येई.

त्यावेळी आमच्या त्या सरकारी क्वार्टरला बेल्स वगैरे लावल्या नव्हत्या. आलेला माणूस प्रथम टक्टक करी, मग कडी वाजवी' तेवढ्यानंही दाद मिळाली नाही म्हणजे दारावर धडका देई. माझी ही शेजारीण आली की धडकच देई. त्याबरोबरच तिच्या कडेवरचं मूल सूर लावी. म्हणजे दार उघडणं भागच पडे. दार उघडलं की पहिला प्रश्न 'झाली की नाही झोप अजून' ! जणू मी चार-दोन तास झोपले होते ! घरकाम नुकतंच आटोपलेलं असतं हे तिला माहीत. पण रोज ठरलेला प्रश्न. अन् मग आपल्या मुलाला माझ्याकडे खेळायला सोडून ती झोपी जाई. ते मूल कुठं उपद्व्याप तर करणार नाहीना या भीतीनं माझी झोप उडून जाई.

रोज ही डोकेदुखी मागे लागलेली. पण मग मीच एक दिवस

तिच्याकडे जाऊन बसले तिच्या येण्यावेळी ती तिच्याकडचा चहा उपट ल्यावर उठले. त्याच्याही अगोदरची गोष्ट. सिमला मेल दिल्ली स्टेशन वर येण्याच्या सुमारास आम्हाला जुन्या दिल्लीच्या स्टेशनवर पोहोचायचं होतं. सकाळची वेळ भराभर कामं उरकून तयार झाले. स्टेशनवर भेटायला ज्यांना जायचं होतं, त्यांच्याकरता थर्मासमध्ये चहा घेतला. हेही ऑफिसमधून सुट्टी घेऊन आले, तोच दार वाजलं. लोणी विकायला म्हणून कुणी समोर ठाकला. आता त्याला काही तरी सांगून कटवायचं की नाही ! पण त्यावेळी इतका पोच नव्हता. (आता अनुभवानं चांगलेच पोचे पडले आहेत.) त्याला सांगितलं आम्ही आता स्टेशनवर जाऊन येतो. दुपारी ये म्हणून !

दोन अडीच तासांनी आम्ही परतलो स्टेशनवरून, व्हरांड्यातला समोरचा चिकाचा पडदा पडलेला दिसला. पण वाटलं आम्हीच टाकला नव्हता का ! भूक अगदी कडकडली होती. तेव्हा प्रथम पोटपूजा आटोपली. नंतर झोपेची सुरसुरी घालवली आणि आदल्याच दिवशी सुरू केलेलं शिवण हाती घ्यावं म्हणून पोलक्याचे तुकडे टेबलावर होते, ते पाहू लागले तर सापडेनाच. नंतर लक्षात आलं, तिथंच जवळपास एक सिल्कची साडी होती, तीही गायब ! आजूबाजूच्या लोकांनी निर्वाळा दिला, सकाळच्या लोणीवाल्याचा प्रताप असावा. व्हरांड्यातला पडदा पाडून एकाच उघड्या राहिलेल्या खिडकीतून काठीनं सामान काढलं होतं त्यानं. लोण्याऐवजी हा कठीण अनुभव घेतला आम्ही !

आमच्या घरासमोर, रस्त्याच्या कडेला लॉन्स होती. तिथं बरीच मुलं परीक्षेपूर्वी मार्च–एप्रिल मध्ये अभ्यासाला येऊन बसायची, स्वतःच्या घरात असलेल्या जागच्या अभावी. सारखं सारखं त्यांचं आपलं चालायचं, 'ऑन्टीजी ! कागज देना ! पेन्सिल देना'. मी म्हणायची, 'अरे अभ्यासाला येता अन् कागद पेन्सिलच कशी विसरता !' मग कधी कधी पाणी मागायला यायची. पाण्याला नाही कसं म्हणायचं ? पण ती सगळी पाणी पिऊन गेली की माझ्या व्हरांड्याचं तळं व्हायचं ! एकदा तर आफतच विकत घेतली मी. एप्रिलचे दिवस. दुपार जरा गरम होऊ लागली होती. जेवणाच्या मेन्यूवर शेवटचा घाईघाईचा हात फिरवत

होते. तोच घंटी वाजली. मनात म्हटलं, ह्यांना तर यायला वेळ आहे अजून ! कंबरेचा पदर सोडला अन् दार उघडलं, तर दारात एक जोडपं उभं. अठ्ठावीस तिशीचं. पण तरुण दिसणारं आणि तरुणांनाही लाजवील असं वागणारं !

'वहेनजी, जरा पाणी तो पिलाईये,' त्या माझ्या तात्पुरत्या भाऊभावजयीचं वागणं बोलणं इतकं नटरंगी होतं की माझ्याच तोडचें पाणी पळालं. तेव्हापासून ही माझी पाणपोई मी बंद केली. त्यामुळं 'जो दुवा देशील पान्था' असं न होता 'माईजी बहोत बुरी है' असं सर्टिफिकेट जरी मिळालं तरी काही दिवस शांततेत गेले.

काही वर्षापूर्वीची गोष्ट. आमच्या ओळखीचे एकजण सकाळी नऊचे सुमारास टपकायचे. कधी उगवतील ते सांगता यायचं नाही, पण आले की पहिला प्रश्न 'काय चाललंय ! झाला की नाही स्वैपाक ? जेवणं उशीराची, दीडदोनची. सकाळची ती वेळ घाईगर्दीची. येणारे जाणारे पुष्कळ. त्यांचं चहापाणी. मध्येच गॅसवरचा पदार्थ ढवळायचा त्यातच त्या गृहस्थांच्या प्रश्नांची सरबत्ती ! उलट तपासणी घेतल्यासारखं बोलणं, स्वैपाकघरात बोललं तर बसायच्या खोलीत ऐकायला जावं असं. गॅसजवळ उभं राहून, माझ्या स्वैपाकावर 'रनिंग कॉमेंट्री', तेल किती घालता, हळद नंतर घाला, वगैरे.

आपणच करावा कुणाला तरी फोन, तोच बेल वाजली. म्हटलं आज अगदी 'सँपलवाली' असली तरी तिला परत नाही पाठवायचं ! वेळ तरी जाईल जरा ! दार उघडलं तर समोर उभी माझी मैत्रीण, जिवाभावाची ! बऱ्याच वर्षांनी दृष्टीस पडणारी. पंधरा वर्षांपूर्वी बरोबरच लग्नं झाली होती आमची, एक दिवसाच्या अंतरानं ! पण नंतर भौगोलिक अंतर पडलं होतं कित्येक मैलांचं ! फक्त पत्रोपत्रीं एकमेकींचं जीवन कळत होतं तेवढंच समाधान !

माझ्याकडे दोनाचे चार झाले होते आणि ती अजून दोन एके दोन करत होती. त्याचे प्रतिसाद तिच्या पत्रात, चुटपुटत्या भेटीत उमटत होते. ते तसे तिच्या संसारात पण उमटतात की काय अशी भीती वाटू लागली होती, तीच ती मैत्रीण, स्वतःचं देखणं बालरूप

कडेवर घेऊन दारात उभी होती. ओळख पाळख न लागणाऱ्या त्या जिवाला तिनं 'ती बघ तुझी आवडती मावशी' अशी ओळख सांगितली, आज त्या बाहेरच्या घंटेतून घुंगुरवाळचांचे बोल उमटले होते ! मी म्हटलं, 'नाव काय ग या गुंडगोळचाचं ?' ती म्हणाली, 'सारंग.' होय, मधमाद् सारंगच अवतरला होता त्या दुपारी. माझ्या मैत्रिणीच्या आयुष्याच्या मध्यात अवतरून त्या सारंगानं तिचं आयुष्य मधुमय केलं होतं.

असे हे अनेक नमुने. वस्तूंचे आणि माणसांचे. तुमच्या दारात सतत येत असतात. आयुष्यभर हा 'सँपल सर्व्हे' चालला असतो. दारं बंद असली तरी ती तुम्हाला उघडावीच लागतात. जीवनाची दारं, झरोके बंद कशी ठेवणार तुम्ही ! घरात जशी खेळती हवा हवी तसंच आहे हे ! त्या उघड्या दारातून गार, गरम वारे येणारच. शुद्ध हवा, वातावरणातील दूषितपणा हाही तुम्हाला सहन कराबा लागणारच. तसंच आहे या अनेकविध नमुन्यांचं. यात विविधता आहे म्हणूनच आयुष्य गमतीदार, नमुनेदार होऊन बसतं ! It takes all sorts to make the world !

* *

पाऊलखुणा

'आई ! बुता घान्. काल !' लघुलिपीप्रमाणेच असलेल्या लघुबोलीत आणि मधुबोलीतहि केलेली आज्ञा ! पायातले बूट काढण्याची. ते इवलेसे पाय कधीचेच बंदिस्त झालेले असतात. ती बांधीलकी त्याना नकोशी असते. चालायला, नव्हे धावायलाच मोकळीच हवीं. खरंतर मऊशा मखमलीवरच त्या पावलांनी असायला हवं. सायीत, प्राजक्ताच्या देठांचा रंग मिसळलेला असावा, तसे नवनीत मृदु नितळ केशरी पाय, इवल्याशा कमळ पाकळ्याप्रमाणे ! गुंजेइतकी नखं ! हाताच्या मुठीत मावतीलशी पावलं !

जगातली घाण त्यांना अजून लागलेली नाही, जीवनातला खडतर मार्ग माहीत नाही. मातेच्या कडेवरून पित्याच्या स्कंधावर एवढाच सध्या प्रवास. फार तर, दोघांच्याहि हाताला लोंबकळून टाकलेली चारदोन लुटलुटती पावलं. हेच पाय हळूहळू नेटकी पावलं टाकायला स्थिकतील. धावायलाहि लागतील. कशाच्या मागे धावतील, ते त्याचं य नाच माहीत ! प्रत्येक जण पूर्वनियोजित मार्गानं जात असतो.

संध्याकाळी कामावरून दमून घरी आल्यावर संथ गतीनं पादत्राणं काढली जातात. श्रान्त देह जरा आडवा होतो. सातत्याच्या प्रवासाच्या कष्टांनी, दमलेली असतात. त्या पायावरच्या अनंत भेगा काळाच्या खुणा जशा चेहऱ्यावर उमटाव्यात तशा पायावरहि कातलेल्या ! ती कोवळीक कधीच निघून गेलेली असते. रस्त्यावर मैलाचे दगड असावेत तसे, वाटेवरचे खाचखळगे काटेकुटे, कधी सोपी

सरळ वाट यानी जीवनाच्या प्रवासातल्या काटलेल्या अंतराच्या खुणा त्या पावलावर उमटविल्या असतात.

असे अनेक पाय ह्या जीवनाच्या प्रवासात पावलोपावली दिसतात, आपली नजर पावलांकडे असली तरच. लक्ष्मणाला नाही का रोज रोज प्रणाम करताना सीतेच्या पायाकडेच नजर असल्यामुळे तिचे फक्त नूपुरच ओळखता आले! आता म्हणजे कोणाच्याहि पाया पडणं ही गोष्टच लाजीरवाणी वाटते. अर्थात हेहि खरंच, जिथं ज्यांच्यासमोर वाकायचं ते पाय मातीचे नसावेत! काही पावलं असतात, तुम्हाला मार्गदर्शन करणारी. आपल्या हाताच्या ओंजळीत घेऊन आपलं नतमस्तक त्यावर ठेवलं तर, तुमच्या मस्तकावरचा भार कमी होऊन लटपटणारी पावलं स्थिरावतात.

राघवाच्या पवित्र चरणांचा स्पर्श होताच शिळा बनलेली अहिल्या पूर्वस्थितीला पोहोचली. काहीजण मात्र आपले पाय दुसऱ्यांना तुडवण्याकरताच आहेत असं समजतात. इतरांना शिळा समजून आपल्या मार्गातून दूर ढकलतात.

उंबरठ्यावरचं माप ओलांडून, नव्या घरात, धान्य उधळीत येणारे लक्ष्मीचे पाय. बाल्याच्या कोवळ्या आवरणातून बाहेर येणारे पाय, आता यौवनाच्या, तारुण्याच्या तरलतेने, नवी वाट शोधत असतात. त्या पायांना, दुसऱ्या दमदार पावलांची साथ मिळते. त्या नाजूक गोजीरवाण्या पावलांवर मेहंदीची कलाकुसर असते. क्वचित् प्रसंगी, घुंगुरवाळ्या शृंखलेनं, त्यांना वेढा घातलेला असतो. धूरभरल्या डोळ्यांनी पण ठाम चित्तानं, सप्तपदी चालली जाते. पण त्या अगोदर, आपल्या घरी येणाऱ्या त्या लक्ष्मीचे, त्या विष्णुरूपाचे चरण धुतले जातात. पुढच्या आयुष्यात ते पाय निर्मळ रहावेत म्हणून! नवीन आयुष्य सुरू करताना, संसारात पदार्पण करताना, सगळी घाण निघून जावी म्हणून का ते जलसिंचन? त्या नवीन कुटुंबाचं सगळंच आयुष्य, भवितव्य, त्या मृदु कोमल पायाच्या दृढपणावर, त्या पावलांना साथ करणाऱ्या दुसऱ्या जोडीवर निर्भर असते.

आणि असा आयुष्याचा प्रवास सुरू होतो. ते नवथर पाय स्थिरावतात. घट्टे पडत असतात, पण आपल्या जागी घट्ट असतात. पण काही काही पावलोपावली अडखळतातही. काही खूपच भेगाळतात. पाण्याविना जमीन जशी फाटत जाते, भेगाळली जात तसे ते पाय अनंत चिरांनी फाटत जातात – जीवनाच्या ओलाव्याच्या अभावामुळे तर काही असे दुर्दैवी की कायमचे बंधनात अडकलेले असतात. पूर्वीच्या काळी चिनी लोकांत म्हणे पद्धत होती. स्त्रियांचे, मुलींचे पाय लहानपणीच बांधले जायचे. लहान पाय हे म्हणे सौंदर्याचं लक्षण. त्या बंधनातून आता स्त्रीचे पाय सुटले हे खरं ! पण सगळ्याच बंधनांतून मुक्त झाले आहेत काय ?

स्त्रीच्या पायाच्या काळेगोरेपणावर तर तिचं भवितव्य उभारलेलं, खरीतर तशी ही गंमतीचीच गोष्ट. एकदा डोक्यात विचार आला. एम्. ए. चा अभ्यास करावा. मराठी घेऊन. मामांच्याकडून प्रा. अनंत काणेकरांच्या काही लेक्चर्सना बसायची परवानगी काढली. अन् एक दिवस, ताईबरोबर शिरले क्लासमध्ये, मुंबईतले कॉलेजचं वातावरण नवखं. मी बावरलेली. प्रा. काणेकरांना यायला जरा उशीर झालेला; अपेक्षेपेक्षा अल्प. पण विद्यार्थिवर्ग त्यांचं वक्तव्य ऐकायला अधीर झालेला. मुली थोड्याशाच होत्या. सगळ्यांच जीव मुठीत धरून बसलेल्या. इतक्यात, विद्यार्थ्यांपैकी एकजण उद्गारला, 'अरे आज कुणीतरी नवं आलेलं आहे एक माणूस. पांढऱ्या पायाचं तर नाहीना ! सर आले नाहीत अजून !' अनेक डोळे माझ्याकडे वळले. अन् इतक्यात, अनंताच्या फुलासारखं, सुगंधी देखणं व्यक्तिमत्व असलेले काणेकर वर्गात शिरले.

लगेच दुसरा दबका आवाज आला, 'नाही रे नाही, काळेच पाय; नव्हे, नव्हे, श्यामल चरणच आहे बरंका.' आणि मग जेव्हा जेव्हा मी क्लासला जाई, त्या त्या वेळी 'येती बघ चरण श्याम' असा घोष होई. आता या पायापायी झालेला आणखी एक विनोद म्हणजे सदुपाय अर्थात् सदूचा पाय या सारखा. पण असले विनोद म्हणजे ज्यांच्या

कर्तृत्वा (!) पुढे लोकांचा निरुपाय होतो असा ! असल्या विद्यार्थ्यांना तरणोपायही नसतो.

पूर्वी म्हणत 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.' पण ते घरात असलेल्या पाळण्यात. पाळणाघरात वाढणाऱ्या मुलांचे पाय कुठल्या दिशेनं जाणार हे कोण कस सांगू शकणार ? ह्या लहानशा पायांना मजबुती देणारे हात स्नेहल असतील तरच ते नीट मार्ग अनुसरतील. पण आयुष्यभर जरी या पायांनी प्रवास करीत असलात तरी जगात प्रवेश करताना मात्र पाय प्रथम दाखवून अवलक्षण करायला नको. त्या पायाळू माणसाच्या मागे अनेक झंझटी लागतात. पावसाचं तांडव सुरू होऊन, विजांचं नर्तन सुरू झालं की आजी म्हणायच्या, 'अग, लोखंडाची किल्ली ठेव जवळ. विजेवर तोडगा आहे. पायाळूंना भीती असते बाई विजेपासून.' असे अनेक तोडगे आम्ही हसण्यावारी नेहमीच नेत असू. लोखंडाचा आणि विजेचा काय संबंध. त्या किल्लीकुलुपात बंद का करायची तिला ? आजीचं आपलं काही तरीच.

कुलुपातच काय, कशातही बंद न होऊ शकणाऱ्या त्या विजेचं रौद्रभीषण स्वरूप एकदा पहायला मिळालं. ऐन पावसाळ्याचे दिवस. मोटारीतून प्रवास सुरू होता. आकाशातून जणू गगाच कोसळत होती. कुठं थांबणंही शक्य नव्हतं. इतक्यात इंद्रानंच आपलं एखादं महान् अस्त्र सोडावं अशी, आकाश कापत जाणारी डोळे दिपवणारी नव्हे फाडणारी, विद्युल्लतेची अत्यंत प्रखर अशी प्रचंड रेखा ! दूर खूप दूर, कुठेतरी वीज पडली होती. आम्ही सगळेच, देहभान हरपून तो आकाशानं धरणीवर केलेला आघात पहात राहिलो. अन् मला आठवण झाली पायाळू नातीच्या मायाळू आजीची !

जसं लक्ष्मणाचं लक्ष फक्त पायांकडे, तसं पुष्कळदा कवींच्याही प्रतिभेचं लक्ष्य बनतात ललनेचे लालूस पाय ! रक्ताशोकाला तर फुलंच येत नाहीत, सुंदरीच्या डाव्या पायाची लाथ बसली नाही तर ! कधी तर मुकी झाडच नव्हे तर संस्कृत काव्यातला प्रणयीजनही ही लाथ भूषण मानतो आणि म्हणतो 'हे प्रिये, तुझ्या लत्ताप्रहारामुळे मला दुःख झाले नाही, पण माझ्या अंगावर उभे राहिलेल्या रोमांचाचे

काटे, तुला टोचले असतील याचेच मला दुःख वाटते.' आहे की नाही स्त्रीदाक्षिण्याची परिसीमा ! इतकंच नव्हे तर सुंदर स्त्रियांच्या पायाने उमटलेले आळत्याचे लाल फराटे पण कवीला सुंदर वाटतात. 'आगवाक्षात् पदवी अलक्तकाङ्कामतत्तान् '. कोण्या एका स्त्रीनं, दासीनं रंगविण्यासाठी हाती धरलेला पाय, ओला रंग असलेला तसाच ओढून खिडकीपर्यंतचा मार्ग आळत्याच्या रंगानं रंगवून टाकला. ती भूमी लज्जावर्ण धारण करती झाली. आता मात्र नेलपेंट लावता लावता वाळत असल्यामुळे, असं नक्षीदार रंगकाम घरात होण्याची भीती नाही आणि झालंच तर तो काव्याचा विषय होण्याऐवजी रागा-भांडणाचा व्हायचा.

एकदा काय झालं, शेजारच्या बगीच्यातून हसण्याची नाजूक, अल्लड लकेर कानावर पडली म्हणून बाहेर डोकावलं. 'आई आपले पाय वर घेऊन मुलीला वर उचलीत होती. मुलगी टाळ्या वाजवून 'मोथ्थी झाले' म्हणून हसतखिदळत होती. मोठं लोभस दृश्य होतं ते ! आईच्याच वळणावर गेलेली लेक, तिच्या पायाच्या आधारानं मोठी होत होती. पण मनात वाटलं, जेव्हा आईचे पाय चालेनासे होतील, तेव्हा थकल्याभागल्या पायांना कोण आधार देणार ? हे छोटे पाय तर त्यावेळी स्वतंत्र मार्ग चोखाळत असणार !

सरत्या पावसात, गजाननाच्या मागोमाग महालक्ष्मी येते. सगळ्या घरभर रांगोळीनं तिची शुभ पदचिन्हं रेखली जातात. 'महालक्ष्मी आली, सोन्याची पावलं,' अशा ललकारीत येणारी लक्ष्मी आपल्या जागी अधिष्ठित होते. गृहलक्ष्मी पण अशीच सोन्याच्या पावलानं येऊन घरभर समृद्धीच्या खुणा उमटवीत असते. त्या तिच्या पाऊलखुणांची दखल घ्यायला हवी कुणीतरी !

जीवनात अशा अनेक पाऊलखुणा उठत असतात, अन् समुद्राच्या वाळूतल्या ठश्याप्रमाणे कालौघात, विस्मृतीत नाहीशा होतात. ऐकलं आहे की, कोण्या एका स्थळी एका महत्त्वाच्या व्यक्तींची पावलं आणि हात सिमेंटमध्ये उठवून कायमची स्थिर करून ठेवली आहेत. आपले

हात म्हणजे कृती आणि चरण म्हणजे आपल्या जीवनातली गती. सुष्ट मतीनं घातलेला या गति–कृतीचा मेळ म्हणजेच हे जीवन.

पण हे सगळं झालं दुसऱ्यांच्या पायांबद्दल. शेवटी आपल्या पायाखाली काय आहे, हेच बघितलं पाहिजे. आपल्या पायाखालची वाट तुडवताना, हिमतीनं पडावीत, कष्टानं लटपटू नयेत–कधीच वाकड्या वाटेनं जाऊ नयेत म्हणून आपण फक्त म्हणायचं–

'तव चरणे प्रणतावयमिति भावय ए'

'कुरु कुशलं प्रणतेषु'–

* *

आम्ही घर बदलतो !

आम्ही घर बदलतो नव्हे-घरं बदलतो. एका घरात गेल्या गेल्या आंब्याची कोय लावून पुढच्या आयुष्याची सोय करणाऱ्या भाग्यवंतांपैकी आम्ही नव्हत ! पुष्कळदा तर असंही झालेलं आहे. मी घराच्या मागच्या अंगणात एक कोपरा साफ करून चार कोथिंबिरीचे दाणे-धने टाकावेत अन् त्यांनी मूळ धरेपर्यंत आमचीच त्या घरातून उचलबांगडी व्हावी ! नोकरीच्या शेवटी शेवटी जरा अवधी मिळत गेला, काही काही घरातून. पण अक्रोडाची फळे खाण्याइतका नव्हेच !

लहानपणी, सगळ्यात आवडता खेळ चूलबोळक्यांचा. उठल्या सुटल्या, वेळ मिळाला रे मिळाला की 'घर-घर' खेळायचं. कुठल्याही कोपऱ्यात, जेवायच्या एका पाटाला दुसरा पाट आडवा लावायचा की झालं घर तयार. मग ते सजवायचं. तास न् तास उद्योग चाले तो ! पण मग कधी असंही व्हायचं, जेवायची वेळ लवकर व्हायची, किंवा वाटायची, वेळेचं भान नसायचं ! मग घराच्या 'भिंती' निघायच्या. आतला पसारा आईच्या ध्यानात यायचा. क्वचित् जेवणापूर्वी धम्मक-लाडूही मिळायचे. लुटूपुटूच्या घरदारी ! लटकीच जाहले संसारी ! तेव्हाचे सुख ते आता हे सर्वस्वी लागू पडतं असं नाही. खेळ खेळता खेळता हाक यायची, वेणी घालायला, आंघोळ करायला, अभ्यास करण्याकरता. किती वाईट वाटायचं. ती लहान दुःखं त्या बालवयात किती मोठी वाटायची. असं वाटायचं, आईइतकी मोठी झाले की एकाच घरात खेळत राहीन. मुळीच घर बदलणार नाही. त्या लहान

रात तो इवलासा संसाराचा पसारा आवरणं, लगेच थोड्या वेळात दुसरं घर लावणं चटकन् व्हायचं. आटपाट नगरातली घरं ती !

पूर्वी, मुलगी मोठी झाली, तिचं लग्न होऊन ती सासरी गेली की फारसा प्रश्न पडत नसे घराचा दहा माणसं, एका छपराखाली, ते छप्पर कोसळेपर्यंत राहात. नवी सून पण त्यातच नांदून (आणि निंदून पण) निघायची. आता मात्र, प्रथम 'हम दो' नंतर 'हमारा घर' आणि 'हमारे दो' असा अनुक्रम असतो. आता ती शतकानुशतकं न कोसळणारी छप्परं उडून गेली कालौघात. 'फॉल्स सीलिंग आणि वातानुकूल'च्या बदलत्या जमान्यांत, जन्मगाठी बांधल्या की गाठीचे पैसे मोजत घराच्या शोधार्थ निघावं लागतं.

सरकारी किंवा बऱ्यापैकी नोकरी असली की हा प्रश्न सुलभ होतो खरा; पण त्यातही 'क्यू'च्या शेपटात अडकावं लागतं. तसंच आमचंही झालं. नोकरीच्या सुरुवातीला आम्ही दिल्लीला गेलो, तेव्हा घराचा प्रश्न समोर उभा होताच. तात्पुरती व्यवस्था आम्ही अशी केली की आमचे एक मित्र दोन महिन्याकरता सुट्टी घेऊन गावी जाणार होते; त्यांच्या घरात, ते परत येईपर्यंत आम्हा रहावं असं ठरलं.

नव्या दिल्लीच्या स्टेशनवर उतरलो. मला तर नाविन्य स्टेशनच्या नावातच नव्हे तर सर्वत्रच होतं. नव्या आयुष्याला सुरुवात होती. वाटत होतं, घरहि नवं मिळावं. झुळझुळीतसं, अंगावरच्या कोऱ्या वस्त्राप्रमाणंच. नव्या कोऱ्या घरात रहावयास जाण्याचा आनंद, नव्या पातळाची घडी मोडण्यासारखाच असतो. त्या कोरेपणाचा हवासा वाटणारा वास. तसंच घरावरही फक्त आपल्याच अस्तित्वाच्या खुणा असाव्यात असं वाटतं. म्हणून मला आयतं 'फर्निश्ड' घरही नको असायचं.

एखादं घर खूप जुनं असतं. दोन चार पिढ्या त्यात राहिलेल्या असतात. त्या एकाच कुटुंबातही किती विविध प्रकारची माणसं असतील. त्यांचे स्वभाव, आवडीनिवडी भिन्न ! इच्छा-आकांक्षा अनेक. त्या भिन्न भिन्न प्रवृत्तींचे, संघर्षाचे प्रतिसाद, त्या घरातल्या भिंतींवर उमटले असतील. आनंदाचे झंकारही उमटले असणार. भिंतींना नाही-

तरी कान असतातच ! ते अनेक स्वर-सूर त्यांच्या कानात गुंजत असणार. त्या अनेक सुरांच्या गोंगाटात आपण राह्यचं ! अशा जुन्या वास्तूत रहाणं मला तरी त्या वेळी फारसं पसंत नव्हतं ! त्या अल्लड वयात, अनेक मूल्यांची जाण नव्हती, फक्त कौतुक होतं ते नवेपणाचं ! वरवरच्या पॉलिशचं ! !

पुण त्यावेळी गेल्या गेल्या, मिळेल ते घर घेऊन, पथारी टाकायला मिळाली तर हवी होती. प्रश्न होता उपलब्धतेचा. म्हणूनच दोन महिन्याकरता का होईना, मालकांच्या अनुपस्थितीत मिळालेल्या आयत्या सजलेल्या घरात आम्ही आमची बोचकी सोडली. खरं तर सामानसुमान सोडून लागेस्तो, परत बांधाबाधी करावी लागणार होती. डोक्यावर छत होतं, पण घर आमचं नव्हतं, 'त्याचं हे सामान वापरू नको, त्याला हात लावू नकोस' असं ह्याचं चालायचं. 'विंडो शॉपिंग' करावं तसा आमचा संसार चालला होता. मालकांच्या परतीच्या त्राची धास्ती पुन्हा सदैव मनात होतीच ! रोज पुरचुंड्या सोडायच्या, तिखटमिठाच्या, डाळ–तांदुळाच्या. पुन्हा आपले पुडे बंद ! पण घराचा हा 'Package Programme' आम्ही लवकर संपविला. खरं तर पूर्वी उत्तरेकडे अशीच पद्धत होती. जसं जसं सामान लागेल तसं तसं आणायचं. भिजवता भिजवता कणिक संपली की पळाला 'मुंडू' (नोकर) वाण्याकडे. मीठ संपलं, आण ताजं !

आम्हाला मात्र धैर्य वाटेना. आमचे एक मित्र होते. त्यांनी पुरेपूर दीड-दोन वर्षं अशी काढली. जो कोणी सुट्टीवर जाई, त्यांच्या घरी दोन–दोन महिने राहात. पहिल्या घरात ते राहायला गेले की दुसऱ्याच्या शोधाला लागत. गमतीनं त्यांच्या घराला आम्ही 'हॉलीडे होम' म्हणत असू. विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर तसं त्यांचं हातगाडीवर असे. अशी घराच्या बाबतीत हातघाई असली तरी माणसं मात्र अगत्यशील हं ! एका बाजूला सामान गाडीवर भरताहेत, अन् दुसरीकडे चहाचं आधण उकळत आहे !

आम्ही मग एक घर भाड्यानं घेतलं. घर पाहण्याला हे गेले होते. त्या काळात, बायका फारशा हिंडत नसत. हे येऊन म्हणतात 'छान

आहे हे घर ! छोटं आहे पण आपल्याला पुरेसं आहे–' चार बोचकी, दोन ट्रंका आणि नव्यानं वाढलेल्या सामानाची खोकी हातगाडीवर घातली; अन् त्याच्या बरोबर आम्ही वन–टू करीत निघालो. घर इतकं कोरं करकरीत होतं की बांधणं चाललंच होतं. रंगहि लागला नव्हता. जेमतेम दोन खोल्या फक्त.–स्वैपाकघर नव्हतंच. मी म्हटलं 'हे काय हो ! स्वयंपाक कुठे करायचा !' तर म्हणाले 'माझ्या नाही बुवा लक्षात आलं.' मग मागच्या व्हरांड्यात स्वैपाकघर थाटलं. व्हरांडा उघडाच. वरून छत नाही, समोर आडोसा जेमतेम, दिवसभर स्वैपाकाला 'सोलर एनर्जी' मिळायची ! पण माझी कमी व्हायची ! रात्रीची जेवणं चंद्रप्रकाशात. वाऱ्यानं चूल पेटायची अन् भाजीत पाणी पावसाचं किंवा डोळ्यांतलं ! पण त्याही चंद्रमौळी घरात एकदा चोर डोकावले. त्यांना नेण्यासारखं आमच्याकड काही नव्हतं, पण अर्थात् हे चोरांना माहीत नसावं. घराला दारं, म्हणजे दिंडी दरवाजा नको होता; पण खिडीही नसाव्यात !

पुन्हा आम्ही आमच्या घराच्या मोहिमेवर निघालो. आमच्या खिशातला पैसा आणि जागेचा पैसपणा यांचा मेळ काही जमेना लवकर ! मुली करता स्थळं शोधण्याची वेळ आली नाही, पण राहण्याकरता स्थळ शोधण्यातच चपला आणि पाय तुटले ! जेव्हा मिळालं तेव्हा एका घरात भागीदारीनं. एका बाजूला मालक व दीड खोल्यात आम्ही. मालकाच्या चष्म्याच्या धाकात, त्याच्या खोकल्याच्या तालावर, आमचा संसार सुरू. मागच्या पानावरून पुढे चालू झाला. मालक मालकीण बिहारी, दोघेही म्हातारपणाकडे झुकलेली. पेन्शनला निघण्यापूर्वी, चार पैसे गाठी लागले तर हवे होते त्या चार भिंतीतली वीतभर जागा आम्हाला देऊन. कितीतरी अटींच्या भिंती त्यांनी आमच्याभोवती उभ्या केल्या होत्या. मालकिणीनं टाकलेल्या केसांच्या गुंतावळीनं माझं घर केराची टोपली होत चाललं होतं. तिनं फेकलेला माझ्या अंगणातला कचरा मी कस्पटासमान मानला होता. मालकीण स्वतः हातभर घुंगटात असायची आणि मी माझ्या लक्ष्मणरेषेच्या

बाहेर जात नाही ना याच्यावर पहारा करायची. त्या भाड्याच्या सासुरवासाला मी लवकरच कंटाळले.

पण आता सामान हळूहळू वाढत चाललं होतं; अन् संसारही. त्याच बरोबर घराची भांडीपण! प्रथम घरबदलीच्या वेळी हातगाडीवर वाहून नेलेलं सामान आता बैलगाडीच्या मापाचं झालं होतं. आमच्या ऑफिसमधून बैलगाडी भाड्यानं मिळे, मोठी एसपैस होती. टायरची चाकं. पुष्ट देखणे बैल माना हालवत, घुंगुरं वाजवीत, घरासमोर उभे राहात तेव्हा गंमत वाटे. चार भिंतीच्या आडोशानं दिमाखानं उभ्या असलेल्या वस्तू कोणत्याही कारणानं, घराबाहेर आल्या की मोठ्या केविलवाण्या दिसतात.

सामान काढून नेल्यावर, ते रिकामं घरही दयनीय दिसतं, एखाद्या साजशृंगार उतरून ठेवलेल्या युवतीप्रमाणं! त्या घरात आपलेच आवाज घुमू लागतात. तरीही इतके दिवस आवाजानं निनादत असलेलं घर आता निःशब्द झाल्यासारखं वाटत असतं. ते शब्द आपल्या मनात कोंडले गेले असतात. गरजेप्रमाणं, किंवा नोकरीतल्या बदलाप्रमाणं, घरं बदलत होतो. फारशी जरी नाहीत तरी अर्ध्या डझनावर झालीच! नवीन घरात जाताना, पुष्कळसं जुनं-पुराणं सामान, डबे बाटल्या, तुटक्या खुर्च्या आपण टाकून देतो, अर्थात् त्या जुन्या सामानातही आम्हा बायकांचा जीव अडकलेला असतोच. पण त्याला नाइलाज असतो. काही काही घरांत तर बकुल पारिजातासारखी झाडं, मोठ्या प्रेमानं लावलेली होती. ती सोडून जावं लागलं. एक वीण उसवून दुसरी सुरू करावी, त्याप्रमाणे हे भावनांचे रेशीमधागे एका ठिकाणाहून दुसरीकडे लावत होतो.

अशी जुन्या सामानाची छटाई होई, अन् नव्या घरात जायचं म्हणून नवी खरेदी होई. नोकरीच्या उतरार्धात मोठी घरं मिळत गेली. तेव्हा तर घर बदलण्याचा आनंद आणि खरेदीचा उत्साह काही विचारू नका! त्यामुळे सामानाच्या बेरीज वजाबाकीत हातचेच उरत शेवटी! आता घरात इतकं सामान झालंय की आम्ही घरात राहतोय ते सामान ठेवून उरलेल्या जागेत! घराचं झालंय वस्तुसंग्रहालय; तरीही टाकवत

नाहीत त्या वस्तू, देववत पण नाहीत; कारण त्या आहेत अनेक टप्प्यांच्या आठवणी !

आपण जेव्हा दुसऱ्या कुणीतरी वापरलेल्या घरात राहयला जातो, अन् नोकरीत वा इतरही वेळा असंच होतं, एकानं घर रिकामं केलं की आपण तयारच असतो, उंबरठ्यावर, आत शिरण्यासाठी ! अशावेळी खूप गंमतीदार अनुभव येतात. पूर्वीच्या रहिवाश्यांनी, बसायच्या आणि इतरही खोल्यात आपले व आपल्या नातलगांचे फोटो लावलेले असतात. अनेक वर्षांची कॅलेंडर्स एकावर एक लावलेली असतात. इतरही अडगळ, शोभा म्हणून भिंतीवरची जागा अडवून बसलेली असते. त्या घराला बरेच दिवसांत, सफेदीचा हात बहुधा फिरलेला नसतो. उलट घरातल्या मेंबरांचे हाताचे ठसे मात्र जागोजाग उमटलेले असतात. ते फोटो काढून गेल्यावर, पांढरे चौकोन उठून दिसतात, फोटोंना लागलेल्या जळमटांच्या मेहरपीत ! फोटोसाठी ठोकलेले खिळे जागजागी डोकावत असतात. एका ठिकाणी तर पूर्वीच्या माणसांनी घर अक्षरश: खिळखिळं करून टाकलं होतं खिळे ठोकून !

पुष्कळ घरं तर अशी आढळली की आम्ही त्या घरात पाऊल टाकताच हाती केरसुणीच घ्यावी लागायची. पूर्वीचे रहिवासी आपली पायधूळ सोडून जात की आम्ही जाता जाता नखशिखान्त बुडून जात असू ! मस्तकात राग आणि धूळ भरून जाई. ज्या घरात आपण वास्तव्य केलं, अल्प असो वा दीर्घ काळ असो, जिथे अनेक संमिश्र भावनांचे क्षण जगलो, ते आता आपलं का असेना, पण जाताना, त्यावर मायेचा हात फिरवून जावा असं का वाटू नये !

बरेच वेळा असं वाटतं, घरं बदलली की माणसं पण बदलतात काय ! साध्या साडीतली युवती भारी साडीत नटली की जसा तोरा येतो तिला. तसं पहिल्यापेक्षा बऱ्या घरात गेलं म्हणजे होत असावं काय ! एकदा असंच झालं–आमच्या बरोबरच्याच टाइप मधल्या घरात राहणारी माणसं. चार–पाच माणसांचं त्यांचं कुटुंब. ८।९ वर्षाचे आम्हा कुटुंबांचे संबंध; बरेचसे जवळकीचे. त्या गृहस्थांना एक प्रमोशन मिळालं. साहजिकच त्यांना वरच्या दर्जाला–पगाराला साजेसं

घरही मिळालं. तेही घर आमच्या या परिसरापासून खूप दूर होतं असं नाही. पण अंतरात नव्हतं ते पगारात, दर्जात होतं. त्या घरात जाण्यापूर्वी आम्ही सगळ्यांनी पार्टी दिली; नेहमी असंच येण जाणं ठेवण्याबद्दल सांगितलं. 'बघू या बाई, कसं जमतंय ते. आता जरा लांबच पडणार,' आम्ही ओळखलं, बाई दूर गेल्या, शरीरानं ना मनानं पण! आमच्या शेजारी असतानां पुष्कळदा त्यांना दहाचाचं विरजण लागत असे. आता आर्थिक परिस्थितीत बदल झाल्यावरोबर मैत्रीलाच विरजण लागलं!

असंच एकदा रस्त्यानं जात असता, समोर एक रिक्षा, नेहमी-प्रमाणं, आडव्या उभ्या रस्त्यानं येऊन उभी राहिली. समोर लाल दिवा होता तेवढ्यांत मी वाचलं रिक्षावर लिहिलेलं 'बदलते रिश्ते!' दिवा हिरवा होताच ती रिक्षा रस्ता बदलून निघूनही गेली. माझ्या मनात आलं—रस्ते बदलतात; रिश्ते (नाती) बदलतात. का रस्ते बदलल्यामुळे रिश्ते बदलतात, आमच्या शेजारीणबाईसारखे! मी तर नेहमी घर बदलताना शेजारचा विचार करते. एक डॅनिश म्हण माझ्या मनात येते अशा वेळी: No one is rich enough to do without a neighbour. लग्नात मिळालेली अन्नपूर्णा तीच असते, तुम्ही कुठंही गेलात तरी. तसंच घर बदललं तरी गाभा बदलू नये.

अशी अनेक घरं, अनेक व्यक्तिमत्वाची, आम्ही बदललेली. त्यांपैकी असंच एक, ऑफिसकडून मिळालेलं. घरात शिरताच कसं उदास वाटलं. खरं तर घर तसं प्रशस्त होतं. हिरव्या कंच गवताची पार्श्वभूमी होती. मग हे अंतरात मळभ का! पाहिलं तर सगळ्या भिंतींना गडद असा निळा रंग दिलेला. पावसाळी ढगासारखा! काहीच खुलेना त्यावर. आमच्या मनोवृत्ती तर नाहीच. त्या रंगात, त्या ढगाळ छायेखाली राहणं कठीण वाटू लागलं. शेवटी यांनी सगळ्या भिंतींना सुरेखसा फिका पिवळा रंग देववून घेतला. त्याबरोबर, ढगाळ हवेनंतर सूर्यप्रकाशानं प्रसन्न वाटावं तसं तेच उदास घर सोनसळी छटांनी झुळझुळीत दिसू लागलं. खुषीनं हसू लागलं. आमच्या पसंतीचा रंग घरानं घेतला. लगेच ते घर आमचं झालं.

शेवटचं घर सोडून आणि नोकरी संपवून निघालो तेव्हा ही बांधाबांध शेवटची, घर बदलण्याची कटकट संपली म्हणून खूप बरं वाटलंच. पण मन थोडं उदासही झालं. कारण आता आयुष्याच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात होणार होती. अन् तरीही आपल्या घराचे वेध लागले होते. आतापर्यंत राहिलेल्या अन् बदललेल्या घरातल्या उणीवा भरून काढणार होतो. काही हव्या असणाऱ्या गोष्टीची पण भली मोठी यादी होती. ही निरनिराळी घरं बदलताना आणि खिशात जरासे पैसे खुळखुळू लागताच हाच मंत्र सुरू झाला होता– 'आपण घर बांधलं की हे करायचं ते करायचं!' या सगळ्या बदललेल्या घरातूनच, स्वतःच्या घराचं एक स्वप्न साकार होऊ लागलं होतं.

आता इतक्या वर्षानंतर, घर बदलताना किंवा त्यात राहताना आलेल्या अडचणी मागे पडल्या आहेत. त्यांच्या अनेक स्मृतींची गोडी, स्वतःच्या घरात बसून चाखतो आहोत. 'Nostalgia is recalling the feel without reliving the pain,' ठरवलेल्या सगळ्याच गोष्टी आपण बांधलेल्या घरात करू शकतोच असं नाही. पण खरी मजा योजनेतच असते. तसं म्हटलं तर खरं घर तुमच्या आमच्या मनांतच असतं. ते बांधलेलं असतं अनेक स्मृतींनी. त्याला पाया असतो खंबीरपणाचा; आणि मजले चढविले जातात आपल्या कर्तृत्वाचे! भिती उभारतो, आपणच आपल्या भोवती! कधी त्या फार उंच असतात, सगळ्यापासून सगळ्या जगापासून संपर्क तोडणाऱ्या, कधी काही असतात फक्त बेताच्या आपल्या स्वत्व रक्षणापुरत्या. अनुकूल वात येणाऱ्या खिडक्या तर हव्याच. त्यातून धूळ येते आणि ऊन्हही येत असतं. पण हे घर, खरोखरीच आपलं स्वतःचं, कधीही न बदलणारं, बदलायला न लागणारं असतं.

फक्त माझं म्हणणं एवढंच, गावं बदलावीत, घरं बदलावीत, माणसांनी मात्र बदलू नये! माणसांनी पत्ते बदलावेत, बेपत्ता मात्र होऊ नये!!

* *

पाऊलखुणा

दंतकथा–दातांचीच !

दंतकथा दाताचीच, ही वाक्यरचना जरा विचित्र वाटेल. साहित्यात न बसणारी, शोभणारी. गाईच्या गोमूत्रासारखी, किंवा गृहीत धरणे यासारखी ! तसं म्हटलं तर, गृहीत म्हणजेच धरलेलं. धरलेलंच कसं धरायचं ! पण हेही खरंच की जे काही हातात धरलेलं आहे, ते पक्कं धरून ठेवायलाच पाहिजे !

तर तशीच ही दंतकथा–दाताचीच. दात कोरून पोट भरत नसलं तरी दंतकथांनी मात्र पानं भरतातच. पण खरं पाहिलं तर दंतकथा या शब्दांचा दाताशी तोंडदेखला तरी संबंध आहे की नाही, कुणास ठाऊक ! फार फार तर अगदी विनोदी कथांनाच दंतकथा म्हणता येईल; ज्या कथा दात दाखवायला लावतात ! दिलखुलास हसण्यासारख्या कथा असल्या आणि दाखवण्यासारखे दात असले तरच हे शक्य आहे. कारण टूथपेस्टच्या जाहिरातीप्रमाणे, एका रांगेत एका उंचीत उभे असलेले दात पांढरेशुभ्र असले तर वरं. एखाद्या द्वाड मुलाप्रमाणे, लाईन सोडून उभे असणाऱ्या दातांना काय दाखवायचं ? उलट त्यांना घट्ट मिटलेल्या ओठामागे कोंडूनच ठेवायला हवं. तसंच पान खाऊन, ओठाचा लाल रंग दातावर उतरला असला तर त्यांना पाहून रंगाचा बेरंगच होतो !

तसंच, कुठल्याही दंतकथांना किती महत्त्व द्यावं, याबद्दल श्रीधरस्वामी म्हणतात : ' जैमिनी अश्वमेघ पाहोन ! कथा त्याच कथिल्या संपूर्ण । वाऊग्या दंतकथा ऐकोन । नाही लिहिल्या ग्रंथी या.

आपण मात्र दंतकथा असोत अथवा इतर ऐकीव कथा असोत, त्यांचा हवा तसा वापर करतो. शिवाय दातांचा आणि दंतकथांचा काय संबंध हा प्रश्न उरतोच. कारण असं म्हणतात, दंतकथा हा शब्द संस्कृतातल्या 'उदन्त' या शब्दावरून निघाला आहे. उदन्त म्हणजे वार्ता.

'श्रुत्वा रामः प्रियोदन्तं मेने त्वत्संगमोत्सुक :'

'प्रियेची वार्ता ऐकून तिला भेटण्यास उत्सुक झालेला राम–'

तसाच हा दुसरा उल्लेख 'उदन्त' या शब्दाचा, वार्ता या अर्थी, कालिदासाचाच.

'कान्तोदन्तः सुहृदुपनतः संगमात्किंचिदून.'

'मित्राने आणलेला पतीचा निरोप हा प्रत्यक्ष भेटीपेक्षा थोडासाच कमी पडतो–'

आता या उदन्तातला 'उ' उडाला (की उडाली !) आणि दन्त शिल्लक राहिले. (म्हातारपणी तर दातच उडतात आणि काहीच शिल्लक राहत नाही.) एकाद्याच्या जवळ खायला काही नसलं तर म्हणतात, दात कोरून पोट भरायची वेळ आलीय ! तर तसं आता म्हणाल की बाकी सुरेख विषय संपले म्हणून दातावर गदा आली असावी. पण तसं नाही हं !

अनेक संकृत कवींनी या दातांना सौंदर्यवर्णनात प्रमुख स्थान दिलं आहे. 'तन्वी श्यामा शिखरिदशना पंक्वबिंबाधरोष्ठी.' दात कसे टोकदार हवेत. बाकीचे अवयव नाक, डोळे, कितीही रेखीव असले अन् त्या रमणीचे दातच एखाद्या सज्जन स्त्रीप्रमाणे पक्व बिंबाच्या आत न रहाता बाहेर येऊन जगाचं निरीक्षण करू लागले तर ते दृश्य प्रेक्षणीय असणार नाही. तिचं हसणंच हास्यास्पद होईल. तेव्हा स्त्रीच्या सौंदर्यात दातांनाही फार मोठं स्थान आहे. पण केव्हा ? तर त्यांनी म्हणजे दातांनी (आणि स्त्रियांनीही) आपलं स्थान सोडलं नाही तरच !

पण या दातांची सोबत जन्मापासून नसते आणि आयुष्याच्या शेवटी तर स्वार्थी सोबत्याप्रमाणे ते आपल्याला सोडून जातातच. कृत्रिमतेनं आपण त्याची जागा भरून काढण्याचा प्रयत्न केला तरी

ते काही खरं नाही. ते कधी दगा देतील याची तर मुळीच खात्री नाही. खायचे दात आणि दाखवायचे दात निराळे असले म्हणजे फजितीशिवाय काय पडणार पदरात ! एकदा काय झालं, आमच्याकडे आमचे काही मित्र जेवायला आले. त्यापैकी एकजण दंतधारी होते. नवीन नवीन लोक प्रथमच जेवायला आलेले. तेव्हा खूप खपून जेवणाचा मेन्यू अगदी भरघोस, भरपेट होता. पण पहिल्या घासात केस निघावा किंवा खडा कचकन् दाताखाली यावा, तसे एका पाहुण्याची कवळीच तुटून दातच हातात आले ! झालं, तोंडाला पाणी सुटणारा बेत असला तरी जेवणाचं पाणी झालं. खाणं आहे पण दात नाहीत, अशी स्थिति होऊन त्या आमच्या मित्रांना खाता येईना फारसं. फक्त दहीभात अन् ऐनवेळेला केलेली खीर यावरच त्यांना संतुष्ट रहावं लागलं. त्यांना इतर पदार्थ खाता येईनात म्हणून आम्हालाही ते खाणं ओशाळगत वाटू लागलं. 'प्रथमग्रासे मक्षिका पातः' ऐवजी दंतपातः झाला आणि अशी ही चमत्कारिक दंतकथा घडली त्या दिवशी !

ज्या दातावर आमचं पोट अवलंबून असतं ते येताना मात्र फार त्रास देतात. लहानपणाचा साधारणतः पहिला आजार म्हणजे दात येताना होणारे कष्ट. पिलाला शारीरिक, आईला मानसिक. ते इवलंसं तोंड कधी सुकतं तर कधी सुजतं. तापानं जीव हैराण झालेला असतो अर्भकाचा, अन् काळजी-जाग्रणानं आईचा. मग हळूच, रांगोळीचा बारीक ठिपका असावा असा पिटुकला दात बाहेर डोकावतो. आईला मग तो नादच लागतो. आज कुठला दात बाहेर आला बरं ! एक चांदणी बाहेर आली की तिच्यामागे एकेक करून सगळ्या डोकावू लागाव्यात, तशा शुभ्र दंतकळ्या शोभू लागतात. चेहऱ्याला एक सुरेखसा आकार येतो, पूर्वीचं दंतहीन हास्य आता भरल्यातोंडी अधिकच लोभस वाटतं.

बालमुखातून दिसणाऱ्या इवल्या कण्या पाहून आईला ब्रह्मानंद होतो खरा, पण त्याच बालकाला पुढं शिस्त लावताना, त्याच मातेला आपल्याच दातांच्या कण्या कराव्या लागतात !

'आलक्ष्य दंतमुकुलाननिमित्त हासैः'. निर्व्याज हास्यामुळे दिसणारे कुंदकळ्यासारखे दात आणि अस्पष्ट उच्चाराचे मुग्ध शब्द हा मातापित्यांना आपल्याकडून मिळणारा निर्व्याज आनंद आहे. आणि ते नवीन आलेले धारदार दात वापरून पाहण्याची त्या अर्भकाची धडपड. आमच्या पिकीनं तर लाकडी पलंगाचा कठडा कुरतडून ठेवला आहे अन् त्या प्रयत्नात स्वतःला लागून पण घेतलं आहे बरेचदा. बाल्यांत दाताची चिन्हे अशी अनेक वस्तूवर उठतात. तारुण्यात अन्यस्थळी !

पण एकदा हे दात येऊन भागत नाही. दुधाचे दात पडायला लागतात, परत प्रतीक्षा सुरू होते दातांची. शाळेत पडत्या दातांनी जाताना लाज वाटू लागते. मला वाटतं, लाज ही गोष्ट त्याचवेळी आयुष्यात प्रथम शिरते, पडलेल्या दातातून. तो पडलेला दात उशीखाली ठेवायचा किंवा छपरावर टाकायचा. दात पडलेल्या ठिकाणी जीभ लावावीशी वाटते, पण लावायची नाही. दात वाकडे होतात म्हणे. (एवढं खरं, दात वाकडे असले तरी बोलणं सरळ असावं म्हणजे झालं.) त्या दातपडक्या फटीपण मोठ्या गोड दिसतात. त्या फटीतून बाल्य निघून जात असतं अन् आयुष्यातल्या नव्या पर्वाला सुरुवात होत असते, अडनाडं वय सुरू होतं. येणाऱ्या नवीन दातांबरोबर नव्या चवी आयुष्यात येऊ लागतात.

दुधाचे दात परत येतात तरी पण आयुष्य आटत आलं म्हणजे पडलेले दात म्हणजे काळाला येण्याकरता पडलेली खिडारेच. आधीव्याधि पण घुसत असतात त्यातून. ते दात गेले म्हणजे आयुष्याची सगळी चवच जाते. बरेच वर्षापूर्वी माझेकडे माझे एक दूरचे सासरे बरेच दिवस राह्यला आले होते. जेवणाच्या टेबलावर, फ्लॉवर अॅरेंजमेंटच्या शेजारीच त्यांचा दातांचा अल्युमिनियमचा डबा विराजमान झालेला असायचा. जेवायच्या वेळी ते दात काढून (म्हणजे डब्यातून) लावायला लागले म्हणजे माझा मुलगा त्याच्या तोंडाकडे बघत बसायचा, मोठ्या कुतूहलानं. पुष्कळदा, त्यानं आपले दात काढून पाहण्याचा प्रयत्न केला त्यावेळी ते त्याच्या हाती आले नाहीत, ते बरं

झालं. अन् दात न काढण्याबद्दल मला त्याचे कान हाती घ्यावे लागले.

प्रत्येक गोष्ट कशी वेळच्या वेळी व्हायला पाहिजे. 'अवेळ तरीहि बोल कोकीळे' असं कवि म्हणतात. कोकिळेचे अवेळीचे बोल गोड असतील, पण ती ओरडायला लागली की उन्हाळा आला आहे की काय अशी धास्ती वाटू लागते. आंब्याचा अवेळीचा मोहोर फळं धरतोच असं नाही. तसंच अवेळी आलेल्या दातांचं आहे असं म्हणतात, मुलांना जन्मतः दात असू नयेत. तसे असल्यास ते अशुभ समजतात. मग त्याकरिता करावी लागते शांती, त्या विधीला म्हणतात 'दंतजनन-शांती.'

आता आपण ठायी ठायी, टूथपेस्टच्या, टूथब्रशच्या जाहिराती वाचतो. अन् शेवटी, सगळ्या टूथपेस्टचे फायदे सारखेच वाटू लागतात. पूर्वीच्या काळीही दात कसे स्वच्छ करावेत याचं शास्त्र होतंच. या दंतधावन विधीत एका ठराविक झाडाची काटकी घेऊन तिचे टोक कुंचल्यासारखे करून त्याने दात घासायचे. झाडाच्या शोधार्थ सकाळी बाहेर पडल्यानं सकाळचं फिरणंहि होत असावं. झाड शक्यतो दुसऱ्याच्या घरातलं असल्यास चांगलं!! मागे एकेकाळी आमच्या घरातल्या कडुलिंबाच्या झाडाला फार मागणी होती! झाडाची फांदी वापरल्यामुळे रोज नवा ब्रश तयार होत असे. ज्या वनस्पतीचे कुंचले तयार केले जात, त्याला उद्देशून पुढील श्लोक म्हणत.

'आयुर्बलं यशोवर्चः प्रजां पशून् वसूनि च।
ब्रह्म प्रज्ञां च मेधां च त्वं नो देहि वनस्पते॥'

'हे वनस्पते, तू आम्हाला, आयुष्य, बल, यश, तेज, संतति, पशू, धन, बुद्धी व धारणा दे.'

ज्या झाडांना काटे असतात अथवा चीक निघतो, अशा झाडाची काटकी दंतधावनाला योग्य म्हणून ठरवली गेली होती. उदाहरणार्थ, खदिर, करंज, आंबा, निंब, बेल, रूई, उंबर, बोर, मालती, शिरीष वगैरे. काडीची चव खारट, तुरट किंवा कडवट असावी. दंतधावन सूर्योदयापूर्वी करावं असा नियम होता. आता आम्ही सूर्याच्या साक्षीनं ब्रशिंग करतो! दंतधावन करताना पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे तोंड करावे

हा आणखी एक नियम. पण आता आम्ही 'करीन ती पूर्व' असा अलिखित नियम पाळीत असल्यामुळे तसा प्रश्नच उरत नाही. तोंड स्वच्छ करताना चुळा किती भरायच्या तर बारा ! प्रत्येक गोष्ट कशी बारकाईनं केली जात असे.

पण त्यावेळी एक चमत्कारिक नियम होता. पती परदेशी गेला असता स्त्रीनं म्हणे दात नाही घासायचे ! म्हणजे कठीणच. मग काय 'पिया गये परदेस' असं आळवीत बसायचं, मिटलेल्या तोंडानं, दातांवर दात आवळून किंवा दातओठ खात ! हल्लीच्या दिवसात टी. व्ही. वर दाखविल्या जाणाऱ्या जाहिरातीप्रमाणे 'क्या हुआ ! कुछ नही' अशी स्थिती व्हायची अनेक दिवसाच्या विरहानंतर !

या दात घासण्याच्या अनेक नियमावलीत एक नियम असाहि आहे. आचार्यांसमोर दात घासू नये. आता म्हणजे, घेतला ब्रश हातात की घातला तोंडात, अन् बोबड्या बोलानं बोलत आपण घरभर फिरत असतो. जिथं कुणासमोर तोंड उघडायचं याचाच विधिनिषेध नाही, तिथं दात कुणाला दाखवायचे हे कुणी ठरवावं ! अमक्या समोर अमुक करायचं नाही असे सगळेच नकार आता नष्ट झाले आहेत ना!

* *

पाऊलखुणा

गंधयोजना

परतायला जरा रात्रच झाली होती. बाहेरच्या गार वाऱ्यातून बंद खोलीत येताच एकदम गुदमरल्या सारखं झालं. भराभर खिडक्या उघडल्या मी ! त्या बरोबर सुगंधाची एक झुळुक आत आली. अगदी आतपर्यंत तो सुगंध भरून घेतला; अन् कपडे बदलायला आत वळले,

चैत्रातली हळंदीकुंकू सुरू झाली होती. उष्मा जाणवायला लागला होता. खोली अजूनहि गरमच होती, म्हणून खिडकी आणखी उघडली आणि गजाला धरून तशीच उभी राहिले. परत परत सुगंध जाणवू लागला. जरा निरखून पाहिलं तर कडूलिंबाचं झाड फुललं होतं नाजूक फुलांच्या गुच्छांनी, असंख्य चांदण्याचे घोस लटकावेत तसं !

मनात आलं, पानात तर कडुपणा पुरेपूर भरलेला. फळंही रुचकर नाहीत. मग या फुलोऱ्यात कुठून आला हा मादक गंध ! तेवढाच तो अल्प क्षण माधुर्याचा, पण केवढा श्रमहारी ! ह्या सुगंधात केवढी शक्ति आहे की जी तुम्हाला क्षणकाल का होईना जीवनाच्या दुसह्य वातावरणातून वर उचलते. कवि म्हणतो ते खरंच आहे, 'गंधरसाविह किमुविद्येते, विफलं भ्राम्यसि' – गंध आणि रस या– वाचून नुसत्या आकृतीला काय महत्व ? शाल्मलीचं फूल आणि कमल आकृतीच्या सारखेपणामुळे एकच वाटलं तरी ते खरं नव्हे ! एवढंच काय, 'गंधेन देवाः तुष्यन्ति–' देव पण गंधामुळं आनंद पावतात, मग माणसाला त्याचं वेड लागलं तर नवल काय !

'कुणाला वेड कनकाचे' असं म्हणतात. मला सुवर्णाचं नसलं तरी सुगंधाचं फार वेड आहे–हव्यास आहे ! खरं तर कित्येक वास असे असतात की ते आपल्या जन्मापासूनच आपल्याशी निगडित असतात. मला वाटतं, बाळाला जसा आईचा आवाज ओळखता येतो, तसा वासहि कळत असावा. बाळपणीचे वास म्हणजे, धुपाचा, बाळंतशेपाचा वास, ऊदभरला वास, या अनेक वासांच्या सहवासात, जीवनाचा कोवळा कोंब उमलू लागतो. त्या वासात गुरफटलेले इतर वासाचे घुमारे–बाळाच्या तेल माखल्या टाळूचा वास, आईचं दूध पिऊन, ओघळ गेलेल्या बालमुखाचा वास, हा तर जगातला अत्यंत सुंदर सुवास ! ब्रह्मानंदाचाच सुवास ! न्हायल्यानंतर त्याच्या इवल्याशा, लुसलुशीत शरीराचा निर्मळ सुवास मातृत्वाच्या तृप्तीचा वास ! 'जयाचेनि सौरभ्ये जीवि जोडे। वेदवतीये' –जसं त्या अलौकिक सुवासानं पृथ्वीला अस्तित्व प्राप्त होतं तसंच या वात्सल्याच्या सौरभानं स्त्रीला अस्तित्व मिळतं.

सुवास हा एखाद्या सुंदर चित्रासारखा असतो. त्या सुवासाला भावना असतात. त्याचा स्वतःचा अर्थ असतो. अनुभव असतो. त्या सुवासाचा जितका अस्वाद घ्याल, तितका तो अनुभव जास्त गाढ येतो. सुवासालाहि पोत असतो, वस्त्रासारखा. काही वास जाड असतात. काही गुलाबांच्या फुलांचे असतात तसे. सप्ततर्णीच्या फुलासारखे काही सुगंध तरल विरळ असतात, धुक्यासारखे, जुईच्या फुलासारखे नाजूक. आणि अनेक वासाबरोबर जीवनांतल्या अनेक स्मृती निगडित असतात. दुधातुपाचा वास हा समृद्धीचा वास आहे. पण कांद्याला तुम्ही 'कंदर्प' म्हणून म्हटलेत तरी त्याचा दर्प सुसह्य होत नाही असं म्हणतात, An apple a day keeps the doctor away, but an onion a day keeps everybody away.' कुवासाचा असा परिणाम, कुसंगती सारखा.

आमचे हे मला नेहमी म्हणतात, 'ज्यात त्यात नाक खुपसतेस !' म्हणजे वास घेण्याकरताच हं ! सवयच आहे मला, स्वादाअगोदर वास घ्यायची. वासामुळे चवहि वाढते. खरं तर त्यांनीच ही गोष्ट मला सांगितली. हे एकदा जर्मनीतल्या 'विनरी'त गेले होते. (विनरी, वाइन करायची जागा.) उत्कृष्ट अशी ती 'विनरी' होती, व्हिजिटर्स पैकी

आठदहा लोकांना वाइन मद्यांचा उच्च नीच स्तर जोखण्या करता बोलावलं. त्यावेळी त्यांना सांगण्यात आलं प्रथम त्या मद्याचा वास हुंगा, मग हळूहळू अगदी छोटे छोटे घोट घ्या. म्हणजेच वासामुळे स्वाद वाढतो. आणि स्वादहि नाजुकतेनं घ्यायचा. प्रत्येक वासहि सारख्याच प्रमाणात जाणवत नाही. तसंच मनुष्य स्वभावाचं असतं, नाही का ? काही सेंट्स्, तुम्ही लावलीत की ती हळूहळू पसरू लागतात आणि बराच वेळ टिकतात. काहींचं व्यक्तिमत्त्व असं मोकळं असतं की बूच उघडलं की सुवासाचा घमघमाट यावा तसं खळखळत सगळं वातावरण भारून टाकणार !

काही सूक्ष्म, अबोल स्वभाव असे असतात की बऱ्याच वेळानं जसं जसं त्यांच्या सहवासात तुम्ही याल तसं तसं त्यांच्या स्वभावातल्या गंधछटा पसरू लागतात. सेंट जसा तुमच्या शरीरातल्या उष्णतेमुळे पसरत जातो तसा तुमच्या सहवासाच्या उबेमुळे स्वभावातले सुवास उमलत जातात. चंदनी वस्तूंचा पण उन्हाळ्यात जास्त वास जाणवतो. हे वास जसे फुलांचे असतात, गंधांचे, व्यक्तीचे असतात, तसे प्रसंगांचेही असतात. स्थळांना तर असतातच. सुवास असतात, कुवास असतात. आमचे एक मित्र आहेत, पान खाण्यात पटाईत. पण ते पानहि त्यांना सुगंधी हवं. दिल्लीला असताना तर ते दहा मैल सदरबाजारात जाऊन विवक्षित वासाचाच मसाला घेऊन येणार. एखादी कलाकृति घडवावी त्या नजाकतीनं शिरा काढण्यापासून पट्टी बनवण्यापर्यंत सर्व गोष्टी करणार. विडा तयार झाला की डोळे मिटून हळूच एका गालात सरकावून देतील आणि त्या सुवासिक तांबूलाचा आस्वाद चाखतील. आमच्यासारखं कडबा खावा तशी पानं खाणार नाहीत.

तसंच, माझी एक मैत्रीण आहे. तिच्या घराला नीटनेटकेपणाचा, नीटस देखणेपणाचा, झुळझुळीतपणाचा, वास येतो. तिच स्वभाव गोड, माणूसप्रिय आहे. आदरातिथ्य भरपूर आहे. पण इतरांच्या कुचाळक्या, फालतू चौकश्या नाहीत. खूप घाईत असली तरी शांत संयमित असते. तिच्या सहवासात काही घटका घालवल्या तरी मला खूप बरं वाटतं. सुगंधित, सुस्नात वाटतं. मनातली खळबळ निघून

गेलेली असते. म्हणूनच घरातल्या व्यक्तीच्या स्वभावामुळे त्या त्या घरांना विशिष्ट वास निर्माण झालेला असतो. सूक्ष्म पण निश्चित असा. एकदा संध्याकाळी नेहमीप्रमाणे उदबत्ती लावली होती. कधी नव्हे तो त्यांना वास आला. बाहेरून येताच म्हणाले, 'काय उग्र दर्प येतोय ! कशाचा आहे ?' मी म्हटलं, 'उदबत्ती लावली आहे देवाजवळ.' तर म्हणाले, 'तू आणतेस, ती नेहमीची नाहीय. भलताच ब्रँड दिसतोय.' मला वेळ नसल्यामुळे मी नोकराला सांगितलं होतं. तो दुकानदारानं पुढे केलेला पुडा घेऊन आला होता ! त्यानं वासापेक्षा स्वस्तपणा पाहिला !

असं हे वासाचं. असे निगडित होतात आपल्या स्वभावाशी. द्रौपदीच्या अंगाला म्हणतात कमळाचा वास येत असे; आणि तो अनेक योजने पसरत असे. आता कुणीतरी म्हणतील, त्याकाळी कमळाचं अत्तर काढण्याची कला अवगत होती अन् द्रौपदी ते वापरत असे !! पण सहस्रदल, टवटवीत, कमलाप्रमाणेच तिचं व्यक्तिमत्त्व असावं. नूरजहांनं नाही का आपल्या गुलाबी सौंदर्याला अनुरूप अशा गुलाबाच्या 'इत्रा'ची सुरुवात केली आणि ते लोकप्रिय केलं. मत्स्यगंधेच्या शरीराला माशाचा वास, त्यावर तिच्या लावण्यानं मात केली आणि त्याच रूपामुळं तिला सुगंधाचं देणं लाभून ती 'योजनगंधा' बनली.

दवाखान्यांना एक सार्वजनिक (impersonal), व्यक्तिमत्त्व नसलेला असा वास असतो; जंतुनाशकं व इतर औषधं मिसळून झालेला. त्या वासात जशी स्वच्छता अभिप्रेत असते तशीच त्यात वेदनेची छटा पण मिसळलेली असते. स्वच्छतेला पण अनेक वास असतात ! माझ्या मैत्रीणीच्या घरातल्या स्वच्छतेला कुटुंबीय वृत्तीचा वास असतो. स्वच्छ केलेला देव्हारा, चिंचेने घासून पुसून चकचकीत झालेले देव, त्यावर वाहिलेली सुगंधी फुलं, त्या फुलात मिसळलेला उदबत्तीचा वा धुपाचा वास. हा पावित्र्याचा वास, मन प्रफुल्लित करणारा !

ताज्या टवटवीत फुलांना, ती सुकून गेल्यावर येणारा निर्माल्याचा वास. तो असतो कुबट. गोष्टींची उपयुक्तता संपली की

जुनाटपणाचा वास येतो, नकोसा. आयुष्याचं पण तसंच आहे ! आयुष्य निरोपयोगी झालं की त्याचंहि निर्माल्य होतं. त्याला वास रहात नाही– सहवास मिळत नाही, तसाच जुना– कुबट वास येतो. तसंच जुन्या पुस्तकांना, ठेवणीतल्या कपडचांना, त्यांचाहि वापर कमी झाल्यानं ! वाहत्या पाण्याचा निर्मळ वास. आणि साठलेल्या गति नसलेल्या पाण्याची स्थिती. किती फरक आहे ! वाहत्या जीवनालाहि कर्तृत्वाचा सुरेख सौरभ असतो.

सकाळी सकाळी ब्रेकफास्ट टेबलावर, गरम चहाच्या कपाबरोबर उघडल्या जाणाऱ्या पेपरला ताजा खुसखुशीत, कधी कधी सनसनाटीही, गंध यतो. पण तोच पेपर साठवून साठवून त्याची रद्दी झाली की त्याची सद्दी संपते. दंव भरल्या गवतावर पायाचा ओला ठसा उठत असताना, त्या हिरव्या मखमलीला सकाळच्या प्रसन्नतेचा, उबदार कोवळेपणाचा नाजूक गंध असतो. संध्याकाळी मात्र त्याच गवतातून खरपुसलेल्या उन्हाचे उस्कारे सुटत असतात. पृथ्वीचा दिवसभरचा शीण त्या तिच्या उष्ण, गंधभरल्या श्वासातून जणू प्रतीत होतो.

दिल्लीला, हिवाळचाची सुरुवात झाली की, विशिष्ट प्रकारचा वेखंडासारखा वास येई. जणु काही तो सौरभ शिशिराचा निरोपच घेऊन येई– 'मी येत आहे.' काही दिवसांनी कळलं तो वास आहे सप्तपर्णी या नावाच्या झाडाचा. झुबकेदार फुलं येतात त्याला. इंग्लिशमध्ये त्याला 'स्कॉलर ट्री' म्हणातात. उग्र वास असतो त्याचा. भ्रमरांना या फुलांचा वास फार आवडतो म्हणतात. आता या सप्तपर्णी झाडाचा वास माझ्या मनात हिवाळ्याशी, थंडीशी संलग्न होऊन बसला आहे. त्यामुळे थंडीला सुरुवात झाली की त्या वेखंडाच्या वासाची आठवण येते. ती दुतर्फा झाडं डोळ्यासमोर उभी राहतात. त्या अतीव थंडीच्या आठवणीनं अंगावर काटा येतो. धुरातून आकृति तयार व्हाव्यात त्याप्रमाणे त्या वासातून प्रसंग साकार होतात. लिंबाच्या फुलाचा वास म्हणजेही उन्हाळ्याची चाहूल. देवासमोरच्या प्रज्वलित उदबत्तीनं सर्व घर दरवळून उठावं तसं संध्यासमयी, जात्या सूर्य-

किरणाचं तेज पिऊन प्रमुदित झालेल्या या इवल्याशा कळचा आसमंत भारून टाकतात.

शिकेकाईचा वास हा लहानपणच्या अनेक वासापैकी एक. ते दर रविवारचं डोक्यावरून न्हाणं. ते शिकेकाई उकळणं. गवला कचऱ्याचा वास न्हाणीघरातल्या धुराच्या वासात मिसळतो. धूर आणि शिकेकाई दोन्ही डोळ्यात जात असतात. आता शँम्पूची बाटली उघडली की काम होतं खरं. पण असंही वाटतं, आयुष्यातले अनेक सुवास असे बाटलीत बंद करून ठेवले तर किती बरं होईल ! थेंब थेंब वापरता येतील. दुःखाच्या दुर्गंधानं डोकं जड झालं की त्या सुगंधानं धुवून हलकं करता येईल. पण एकदा वाटतं की बाटलीत बंद करून ठेवलेली चाफ्याची फुलं काळी पडतात तसं होईल का ? कारण सुगंधाला म्हणा, सुखाला म्हणा, खेळतं मोकळं वातावरण हवं. साचेबंदपणात गुदमरायचाच सौरभ ! पावसाळ्यात सुरुवाती सुरुवातीलाच येणारा मातीचा वास तर सगळ्यांचा आवडता आहे. मृद्गंधाचे अप्रुप इतर कश्शालाही नाही; पण धुवांधार पाऊस रोज रोज पडू लागला म्हणजे येऊ लागतो तो कुबट वास, न वाळलेल्या कपड्यांचा !

असे या आयुष्यात अनेक सुवास दरवळतात. अनेक कुवास नशिबी येतात. सुखदुःखानं विणलेलं वस्त्र पांघरलेल्या या जगात या गंधयोजनेमुळे तेवढाच आल्हाद येऊन जातो. दूषित वातावरण कमी होतं. छोट्याशा उदवत्तीनं घर सौरभानं सुखासीन होतं.

'का सौरभ्य जीर्णु जैसा । आमोदु मिळोनि जाय आकाशा ।
माघारा कमलकोशा । न येचि तो'

अशा सुखदुःखरूपी वासांच्या अनेक प्रखर वा सूक्ष्म गंधछटा पिऊन विकसित होणारं मनकमळ न कोमेजता विकसित व्हावं. आणि त्याचा स्वतःचा असा सौरभ, त्या महान् निर्लेप सुगंधाशी मिसळून जावा.

* *

पाऊलखुणा

न केलेले भाषण

आमचा एक मित्र आहे बंगाली. मराठी बोलण्याची त्याला भारी हौस ! बंगाली रसात घोळलेली त्याची ती मराठी बोली, वाटते पण मजेशीर. त्याचं एक ठरलेलं वाक्य आहे 'केले, पन् झ्यालेच नाई'– तर तसंच माझं हे भाषण. भाषणाची पूर्वतयारी, अनेक प्रकारे, खूप केलेली ! पण ऐनवेळी झालं काय की, त्या भाषणाशिवायच एकंदर समारंभ पार पडला.

अर्थात त्या न झालेल्या भाषणामुळं, त्या समारंभात काहीं फारशी मोठीशी उणीव राहून गेली असं माझ्याशिवाय इतरांना वाटलंही नसेल. उलट नेहमी बायकांच्या फार बोलण्यावर आक्षेप घेणारे लोक म्हणतील, असं प्रत्येकच बाईच्या बाबतीत होईल तर फार बरं. पण एवढं मात्र खरं की इतकी तयारी करूनही न बोलणं, म्हणजे साग्रसंगीत स्वयंपाक करून लोक न जेवण्यासारखंच आहे !

कुठल्याही गोष्टीचं असंच आहे. त्याच्यामागचे कष्ट सत्कारणी लागले तर ते जाणवत नाही. म्हणूनच, भल्या मोठ्या सभेत बोलायची संधी चालून यावी अन् शेवटी ते भाषण मात्र तसंच गुंडाळलेलं राहावं. आपलाच गुंडाळा होतो त्यामुळं ! केवढी रुखरुख लागून राहते मनाला ! अगोदरची काळजी, झोपेविना रात्री छातीतली धडधड, ते विद्वत्ताप्रचुर भाषण तयार करता करता सगळं मटेरियल गोळा करण्यासाठी केलेली धडपड !

बरं, लहानपणापासूनच 'मितभाषिणी' हेच मुलीचं खरं विशेषण, खरं वैशिष्ट्य, हे मनावर पक्कं ठसवलेलं. एका दृष्टीनं तेही बरंच म्हणा. न बोलून शहाणपण मिळविता येतं. पण म्हणून तोंड अगदीच बंद ठेवावं असंही नाही. शाळेत वादविवादात खूप वेळा भाग घेतला हिरीरीनं. तावातावानं मुद्दे मांडताना समोरचं टेबल बडवलं होतं. पण ते वेगळंच. प्रथम पुष्कळशा पुस्तकं चाळायची, दुसऱ्याचे विचार आपले म्हणून, सुवाच्य अक्षरात उतरवून घ्यायचे. मग पाठांतर. ते करता करता मध्ये मध्ये वडील-माणसांकडून सूचना, कुठल्या शब्दांवर जोर द्यायचा ते बघा. (खरं म्हणजे जोरदार शब्द कुठे आणि कसे वापरायचे हयांचा अभ्यासच हवा नीट !) नीट 'पॉजेस्' घ्या, मध्ये मध्ये. नाहीतर सुटेल भाषणाची आगगाडी एका दमात, एका श्वासात.

अशी एकंदर बरीचशी पूर्वतयारी. त्यातच अर्थात् जेवणाच्या टेबलावर अनेक विषयावर घातलेले वादविवाद आम्हा भावंडांच्या वाक्पटुत्वाच्या कसोटया लावीतच; अन् त्याबरोबरच ते वादविवाद ऐकणाऱ्यांच्या सहनशीलतेच्या पण. ही सगळी तयारी आतापर्यंत फारच जुनाट झालेली. शस्त्र ठेवून ठेवून गंजावीत तशी गंजलेली ! तेव्हा यांना परत झिलई–पॉलिश् करायला हवं. पण हे भाषण प्रकरण, अन् तेही अध्यक्षीय; माझ्यापर्यंत आलंच कसं ते सांगायचं राहूनच जाईल. नेहमी नमनालाच घडाभर तेल जळतं तसं व्हायला लागलं आहे !

आता या एवढया मोठया दिल्ली शहरात नेहमीच सभा-संमेलने, संवाद, विवाद, सतराशे साठ चर्चासत्रे ही सतत चाललेली, राष्ट्रीय, परराष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सगळयाच पातळीवरचे कार्यक्रम. तर तसाच आमच्या संस्थेत एक मोठा 'फ्लॉवर शो' होतो. तो होण्यापूर्वी दोन-तीन महिने आणि झाल्यावर निदान महिनाभर चर्वितचर्वणाला विषय. 'शो'चं, त्या प्रदर्शनाचं एकंदरच काम जंगी. जवळपास एका प्रदर्शनाचा मंडप उतरला की, लगेच दुसऱ्या वर्षीच्या प्रदर्शनाची पूर्वरूपरेखा आखायला सुरुवात. सगळंच काम मोठं व्यवस्थित असतं, असायलाच

हवं असतं. फुलांचे प्रेमी–रसिक, माळी, लहान मोठे बगीचेवाले अगदी वाट पाहात असतात फेब्रुवारीतल्या त्या दोन 'फुललेल्या' दिवसांची. शहरातल्या दूरदूरच्या कानाकोपऱ्यांतून फुलं येत असतात, गाड्या भरभरून, ट्रक्सवर लादलेल्या, अनेक रंगाच्या, अनेक फुलांच्या कुंड्या डुलत डुलत येत असतात. फुलांच्या बास्केट्स्, फुलदाण्या, हातही फुलात गुंतलेले, भाज्या येतात, पानं येतात, फळं येतात, अनेक गंध आणि रंग येत असतात. अगदी पार्वतीचीच मंगळागौर सजावी असं रमणीय दृश्य असतं.

फुलांच्या विविध रचना. स्त्रियांच्या चहा-पाण्याच्या स्टॉलवरचे खमंग टमंग वास, त्या सुवासिक वातावरणातूनही वाट काढतात. फेब्रुवारीतल्या थंडीला शह देणाऱ्या चहाच्या कपातले वाफारेही खुशबूदार असतात. एक मोठा मेळाच असतो; एक दिवसाचा. थोडीशी 'फूलवालोंकी सैर'ची आठवण करून देणारा, विज्ञानाचा परिसर सुगंधानं भरून टाकणारा. फेब्रुवारीची वाट पाहयला लावणारा. पण त्यावर्षी काय झालं कुणास ठाऊक! ऐनवेळी माशी शिकली; माशी कसली, मोठा मासाच थाडकन् शिकला! आतापर्यंत सुरळीत, सुसूत्र चाललेल्या कार्यक्रमाच्या गाड्याला मोठा धक्का बसला! प्रदर्शनाला राहिले होते फक्त दोनच दिवस अन् त्याचे मुख्य अतिथी (आपल्या अ–तिथी या नावाला साजेसे), ते बाहेरदेशी गेलेले होते, ते अजून काही मायदेशी परतले नव्हते; परतण्याची आशापण नव्हती! कार्यक्रम जेवढा मोठा, तेवढा त्याचा नियोजित अध्यक्षही मोठाच. अर्थात् तितकाच तो कार्यमग्न (त्यामुळे लोकांची कार्य मात्र भग्न!) हे समीकरण ठरलेलं. ते कमी करणं अशक्य! त्याच्या डायरीत जी चिमूटभर जागा उरली असणार, त्यात असंख्य कार्यक्रम, पळापळांच्या मोजमापानं बसवलेले असतात. अर्थात् म्हणूनच अशी इतरांची पळापळ होते ती गोष्ट सोडा.

तर आता काय करायचं! एवढी मोठ्ठी पोकळी निर्माण झालेली. सभेच्या शोभास्थानी कुणाला बसवायचं. कोणी मिळेनाच. म्हणजे कुणी लायक माणसं शिल्लक नव्हती असं नाही काही!

यमुनेच्या तीरावर घोटभर पाण्याला कमी नाही. पण इतक्या मोठ्या माणसाना, अमुक तमुक येत नाहीत, तेव्हा तुम्ही या असं कसं म्हणायचं ! आता मधे फक्त एकच दिवस उरलेला–असं अगदी 'अकराव्या तासाला' आमंत्रण स्वीकारून जायचं म्हणजे तेवढं 'रिकामपण' कबूल करायचं ! प्रदर्शनाचे प्रमुख विश्वजितदा अगदी हवालदिल झाले होते. अध्यक्षांची वाट पहात कार्यक्रम पुढं ढकलणं तर अगदीच अशक्य ! फुलांचं उमलणं आणि सुकणं हे काही कुणाच्या मर्जीवर निर्भर नव्हतं. बाहेर देशांतून विमानानं आलेले 'बर्डस् ऑफ पॅरेडाईज', ऑर्किड्स्, इतर अनेक सुमदलं, उद्याच्या अंधारावरोबर मिटून गेली असती. टवटवीत भाज्यांचा दिखल झाला असता !

सगळं वातावरण कसं सुगंधी, उत्साहाचं होतं. मीही ठरवलं होतं, झक्कपैकी पाच–सहा अॅरेंजमेंट करायच्या फुलांच्या. खूपशी वॉजेस्, पिन होल्डर्स, फुले, काटे, वाळक्या काड्या, दगड अन् धोंडे, पाण्यांची भांडी, असं सगळं साहित्य गोळा केलं अन् समोरच्या व्हरांड्यात येऊन बसले. फुलांपेक्षा काड्या-कुड्याच जास्त होत्या. पण नवीन प्रकारची रचना, कशाचीही म्हणजे हे सगळं हवंच. मूळ विषयापेक्षा फाफट-पसाराच अधिक. मागेपुढे होतं, सगळ्या बाजूनं माझी कलाकृती कशी दिसते हे बघण्यात, मी आपली आपल्यावरच खूश होते, तोच आवाज आला, 'नमस्ते जी–'

एका हातात काटे अन् दुसऱ्या हातात फुले अशा अवस्थेत मी फाटकन् वळून पाहिलं, आवाजाच्या दिशेनं. विश्वजीत दा अन् त्यांचे सहकारी उभे ! मी एकदम विचारलं, 'मिल गया जी कोई आपको ?' अर्थात् हा माझा प्रश्न निरर्थक होता. उत्तर त्यांच्या चेहऱ्यावर निराशेच्या अक्षरात स्पष्ट लिहिलेलं होतं. 'जी नही. इसीलिये तो आपके पास आये हैं'. त्याचं म्हणणं भगीरथ प्रयत्न केले पण कोणीही येऊ शकत नाहीत. गंगावतरणापेक्षा अध्यक्षांना मिळवणं कठीण झालं होतं. 'तुम्हाला खूप इंटरेस्ट आहे या पुष्पप्रदर्शनात, होय ना भाभीजी ?' मी अर्थात्च अगदी ठासून होय म्हटलं. कारण प्रदर्शनंच झाली नाहीत, तर माझ्या कलाकृती मी दाखवणार तरी कुठे हो !

माझी ही दहा बारा फुले उगीचच सुकून जाऊ नयेत एवढीच मला काळजी ! हजारोंनी आलेल्या त्या फळाफुलाचं मला काय होय ! खरं तर मला जरा रागच आला होता त्या मंडळीचा. मला डिस्टर्ब (!) केल्याबद्दल. त्यांची पुढची सूचना ऐकून तर माझा बर्फच झाला. 'भाभीजी ! आपही देखिये ना कोई मिलता होगा तो'. म्हणजे या हॉर्टिकल्चर सोसायटीच्या फ्लॉवर शो करता अध्यक्ष मी शोधून देऊ ! कमाल आहे ! ! ती काय 'कुकिंग कॉम्पिटिशन आहे की काय ?' मी म्हटलं 'क्या आप मजाक कर रहे हैं ! मैं जरा देखूं तो यह अरेंजमेंट करके ! कल सबेरे दस बजेके पहले रखना है मुझे'

ही अगदी उघड सूचना होती, त्यांना जाण्याची. पण उलट त्यांनी व्हरांडातल्या खुर्च्या ओढून घेतल्या आणि वसले ऐसपैस. माही परत जमिनीवर ठाण मांडलं, त्या पसाऱ्याच्या मध्यभागी. एक सुरेखशी कल्पना मनात आली ती करून पाहणार तोच विश्वजीतदा जरासे खाकरले अन् जरा जोरातच म्हणाले, 'भाभी, आपही हो जाई ना अध्यक्ष. मैं अब कहाँ कहाँ ढूंढू !' 'जी ऽ-ऽ' मी, फुलातला काटा कचकन् टोचावा तशी किंचाळले. हातातला जाडजूड पिन्होल्डर पायावरच पडणार होता. फुलं तर आधीच पायदळी विखुरली होती. अन् त्यांचा श्वेतवर्ण चेहऱ्यावर चढला होता.

'छोडोजी'.. 'नहीजी'... 'मजाक'... हे आणि असलेच शब्द टेबलटेनिसच्या चेंडूसारखे दहा मिनिटं सटासट इकडून तिकडे फेकले जात होते.

'मी खरंच तुम्हाला विनंती करायला आलो आहे. उद्याचं अध्यक्षपद तुम्ही स्वीकारावं म्हणून. घरचंच तर काम आहे .. वगैरे वगैरे...' घरचं काम म्हणजे तो काय स्वैपाक होता ! मी काय त्या एवढ्या समुदायासमोर, त्या एवढ्या मोठ्या स्टेजवर जाऊन बसू ! छे छे ! फेब्रुवारीचा महिना असून माझ्या अंगाला घाम सुटला. पुन्हा म्हणून या फुलांच्या आणि प्रदर्शनाच्या वाटेला जाणार नाही अशी मनातल्या मनात शपथ घेतली. त्या धक्क्यामुळे आलेली माझी स्तब्धता –'मौनं संमति लक्षणम्' समजून ती त्रयी खुश्हाल–खुषीत निघून गेली.

जाता जाता एकानं एक स्तुतिसुमन माझ्या दिशेनं भिरकावलं 'छान बोललात हो तुम्ही. सवय आहेच तशी! अन् नुसती बक्षीसं तर द्यायची.' एखाद्या 'स्टिल् लाइफ्' किंवा 'स्टिल्ड लाइफ्' सारखी बसून राहिले. अवाक् होऊन!

घरी आल्यावर आमचे हे तरी नको वगैरे म्हणतील असं वाटलं होतं, पण तेही झालं नाही. मूळ अध्यक्षांची अनुपस्थिती ही बाबच गंभीर होती. त्यांनी वाटाण्याच्या अक्षता म्हणून मलाच अक्षता लावावी लागलीं– 'चंदनार्थे अक्षतां समर्पयामि' या तत्त्वानुसार. मुकाटचानं मी त्या पुष्परचनेचा पसारा गोळा केला. माझ्या चेह-याप्रमाणंच ती फुलं पण सुकली होती. अन् अध्यक्ष व्हायचं म्हणजे नक्की काय करायचं ह्याचा विचार करू लागले– म्हणजेच कांही वेळ सुन्न बसून राहिले. आता मुख्य मुद्दा, किंवा मुद्दे म्हणा, करायचं भाषण आणि नेसायची साडी ह्या दोन्हीचाही विचार व्हायला हवा. हे सगळं करायला जेमतेम चोवीस तास. त्यापैकी रात्र झोपेत किंवा चिंतेत जाणार. प्रथम हाताशी येईल त्या फुलदाणीत फुलं कोंबली अन् हॉर्टिकल्चर वरची जमतील तेवढी पुस्तकं 'इश्यू' करून आणली. त्यांचे घवघवीत आकार पाहून तर जीव धडकलाच. पण उद्याच्या संध्याकाळपर्यंत हा जीव घट्ट धरायलाच हवा मुठीत! कॉलेज सुटल्यापासून नोट्स काढायची सवय सुटली होती.

माझी सगळी धडपड पाहून एक मैत्रिण म्हणाली पण, 'अग, इतकं काय सीरियसली घेते आहेस हे भाषण. मुद्देसूद बोललंच पाहिजे असं कुठं आहे. अन् लोक तरी कुठं असतात ऐकण्याच्या मनस्थितीत. त्यांचा डोळा बक्षिसावर. त्यातून तुझं बोलणं–कोण ऐकणार!' तिचं धीर देणारं वक्तव्य! पण म्हटलं तसं नकोच. आपण आपलं व्यवस्थित तयारी करून जावं. ती रात्र, दुसरा दिवस मी फुलांच्या इतिहासात आकंठ बुडले होते. जळीस्थळी मला फुलं दिसत होती. जेवताना मुलानं विचारलं 'आई, भाजी कसली आहे ग!' मी उत्तरले 'हायब्रिड टी'ची. एवढं मात्र खरं, जेवणानंतरची आमची बायकी सवय सोडून, मी अगदी 'फूलवालो की सैर' या दिल्लीतल्या प्रसिद्ध

फुलमेळ्यापासून आज तागायतचा फुलांचा, फुलांच्या प्रदर्शनाचा इतिहास लिहून काढला होता. माझ्या 'फेअर अॅन्ड लव्हली' हस्ताक्षरात भाषण चांगलं जाडजूड दिसत तरी होतं. साडीचा प्रश्न त्या मानाने पटकन् निकालात निघाला. माझी एक शुभशकुनी साडी आहे. परीक्षेच्या वेळी असायची तशी. साडीत सगळ्या फुलांचे रंग एकवटलेले म्हणून ब्लाऊज–मॅचिंगचा प्रश्न नाही. अन् मुख्य म्हणजे ती साडी फारच 'फोटोजेनिक' आहे, मी नसले तरी! हळूहळू घड्याळाचा काटा साडेचारकडे झुकायला लागला. संध्याकाळी पाचला फंक्शन सुरू होतं. माझ्याही कमरेचे काटे ढिले व्हायला आले होते. त्यातच घरातून उठणारे उत्साहवर्धक उद्‌गार 'आई, नेहमीचा तेलहळदीचा लिंबू छाप चष्मा नको. नवा घाल. पर्स ने. तुझा होल्डॉल नको:' मी आपले गॉगल्स चढवले डोळ्यावर. माझा अर्धा अधिक तरी चेहरा लपेल. अन् कुठे पाहतो आहोत, हे समजायला नको. 'गॉगल्स भाषणाच्या वेळी काढ हं! सूर्य काही थांबणार नाहीये तुझं भाषण ऐकायला–'

म्हणजे नवीन पर्समध्ये जुन्याच वस्तू भरायच्या. काही राहिलं नाही ना. मनाशी काळजी, ती कुठल्याच पर्समध्ये राहणार नाही. नेहमीच्या लिंबू छाप चष्म्याची सवय. काहीच नीट दिसत, उमगत नाही. कालचीच वेळ अन् कालचीच त्रयी परत उगवली. आज त्याच्या चेहऱ्यावर हास्य अन् माझ्या चेहऱ्यावर त्यांची काळजी. अशी देवघेव! समारंभ खुल्या मैदानातच होता: 'अजापुत्रं वलिं दद्यात्' या म्हणीचा अर्थानुभव मनात घोळवत मी त्यांच्याबरोबर प्लॅटफॉर्मकडे आले. हस्तिनापुराच्या त्या परिसरातला तो प्रेक्षक समुदाय 'अठरा अक्षौहिणी'पेक्षा अनेक पटीनं जास्त भासत होता. आता या प्लॅटफार्मच्या पायऱ्या कशा करतात, पाह्यलत काय? मी पाह्यलंय. लहान-मोठे खोके. एकावर एक डुगडुगते ठेवलेले. त्यावर लाल कापड, तो लाल रंग अंतरंगातला धोका दाखवीत असावा. 'रेडकार्पेट' खाली घाण किंवा खाचा–खळगे असतात, समजत नाही. तर या स्टेजला पायऱ्या होत्या तीनच. मधली नेमकी डुगडुगती (ते नंतर कळलं. फॅशन म्हणून साडी पायघोळ. खरं म्हणजे पायऱ्या चढताना, उजव्या हाताच्या,

नेलपेंट लावलेल्या दोन बोटांनी ती चिमटीत धरायची, बेतानं उचलून. पण संयम नाही, अन् ऐनवेळी लक्षात आलं, बोटांची शाई तशीच आहे !

तेव्हा ती, म्हणजे साडी, बरोबर मधल्या पायरीशी पायात-आली ! मी धडपडले. श्रोतृवृंदातून हास्याच्या बारीक बारीक लहरी सळसळल्या, उभ्या पिकातून वारा जावा तशा. त्या तीन पायऱ्या-तीनशे झाल्या, 'भासत जरि शतगुणित' होऊन. मी तर रोजच्या पायऱ्या पण चुकते. ही तर नवीच. खाली न पाहता उंच उंच पायऱ्या झप् झप् ऐटीत चढायच्या कशा ! म्हणूनच प्रत्येकानं आपआपल्या पायरीनं राहावं हे खरं ! माझ्या पूर्वीच्या अध्यक्षांची मालिका बघितली तर मी म्हणजे गुलाबगेंदाच्या हारात झेंडूचे फूल चुकून यावं तसं झालं होतं. बर्ड ऑफ पॅरॅडाईजच्या ऐवजी गावठी सदाफुली. झेंडूच्या फुलांच्या माळा करून दरवाजाला टांगतात.. अपूर्वाईनं गुच्छ करून काही कोणी देत नाही !

अर्थात् सुरुवातीला ओळख करून देताना डॉ. पालनी आपल्या खुसखुशीत विनोदपूर्ण भाषेत मोठी सुरेखच, वास्तवतेला फारसं न सोडता, जमेल तितके गुण अध्यक्षांच्या अंगी चिकटविण्याचा प्रयत्न केला. बिनकाटचाच्या पण सुगंधी गुलाबाप्रमाणं असणारं त्यांचं भाषण वातावरण प्रसन्न करून गेलं. माझं वर्णन ऐकून मलाही क्षणभर वाटून गेलं, चला, अगदीच काही नगण्य नाही आपण ! पण हे सगळं होत असताना, एका हातानं पर्समधले भाषणाचे कागद बाहेर कसे काढता येतील, हा प्रयत्न चालला होता. म्हटलं नेहमीप्रमाणं सेक्रेटरीचं लांब-लचक अहवालवाचन होईल. तोपर्यंत मुद्दे एकदा मनात घोळवून ठेवावेत. माझी ती शोधाशोध शेजारी बसलेल्या विश्वजीतदांच्या लक्ष्यात आली– काही पाणी वगैरे पाहिजे का ही त्याची विचारणा ! मी मनात म्हटलं, सध्या तोंडचं पळालं आहे, तेव्हा नंतर लागेलच.

नेहमी कंटाळवाणं वाटणारं ते अहवाल–वाचन, आजतरी फार लवकर संपल्यासारखं वाटलं. मी भाषणाचे उलट सुलट झालेले कागद परत जुळवण्याच्या खटपटीत होते, तोच अनाउन्समेंट झाली की

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३७०२
दा. क्र. 28632
संदर्भ शाखा (स्थल प्रत)

अध्यक्षांच्या हस्ते बक्षीस–समारंभ होईल. म्हटलं भाषण बहुधा नंतरच करायला सांगणार असतील ! ठीक आहे. तेवढीच आणखी फुरसत श्वास घ्यायला. बक्षीसं देण्याकरता, त्या डुगडुगणाऱ्या पायरीच्या वरच्या जागी उभं राहण्याची विनंती करण्यात आली आणि त्या क्षणी बक्षीस ठेवलेल्या टेबलाकडे माझी दृष्टी गेली.

ते मोठाले चॅलेंज् कप्स, त्या ढाली, ती असंख्य पाकिटे, तीन किंवा पाच रुपये घातलेली. तो बक्षिसांचा 'मिनी' डोंगर म्हणजे माझ्या सहनशक्तीला आणि ताकदीलाच चॅलेंज होतं असं वाटून गेलं. एकेक नाव पुकारलं जायचं, विजेता यायचा. सुरुवातीच्या त्या ढाली–त्या मोठ्या मोठ्या ढालीमागं, मला नाही वाटत मी कुणाला दिसले असेन. बरं प्रत्येक ढाल मिळालेल्या विजेत्याचा अट्टाहास-अध्यक्षांबरोबर आपला फोटो हवाच. त्यामुळं मागच्या बाजूनं ढालीलाच दोन हात लावले आहेत, असं बहुधा बहुतेक फोटोंत दिसत असणार. बरं ती ढाल अवजड, दुसरे दोन हात समोरून जेमतेम धरत असत, त्यातच फोटोग्राफरकडे तोंड अर्धवट, त्यावर 'स्माईल प्लीज' या आज्ञेनुसार हास्य.

बरं हे पेले सुद्धा तीन-चार शेर दूध मावेल इतके–असे. काहींच्या खालच्या बैठकी निसटलेल्या; पुष्कळदा असंही झालं की पेला माझ्या हातात अन् बैठक त्या विजेत्याच्या पायावर. बैठक मारायचीच वेळ त्याच्यावर. दोन्ही हात असे गुंतल्यावर शेकहॅन्ड करणं शक्य नाही. मानेनं नमस्कार स्वीकारून मानेचा काटा ढिला व्हायची वेळ आलेली. अंबाड्याचं शेपूट हारासारखं गळ्यात. हसून हसून ओठ तडतडू लागले. गालांची अवस्था गलितगात्र झालेली. ज्या ढालीकरता काल संध्याकाळी मी फ्लॉवर अॅरेंजमेंट करीत होते तीच मला आपल्या हातानं–हसून दुसऱ्याच्या स्वाधीन करावी लागली होती, आपली कन्या दुसऱ्याला द्यावी तशी ! आमच्या गावात इतके उदार लोक असतील अशी मुळीच कल्पना नव्हती ! किती पेले, किती ढाली लोकांनी आप-आपल्या नावांनी दिल्या होत्या. 'युगे अठ्ठावीस' ती बक्षिसे देत मी उभी होते. पण बक्षीसाचं टेबल असं रिकामं होत होतं

तसा समोरचा पेंडाल–मंडप पण. ते ज्यांनी बक्षीसं घेतली होती, सूज-पणानं निघून जात होते. कार्यक्रम संपेपर्यंत थांबलंच पाहिजें असं स्पर्धेच्या नियमात नव्हतं.

दोन–तीन हजारांतले दोनशे जेमतेम शिल्लक होते. आभार-प्रदर्शनाची लांबलचक यादी वाचण्याअगोदर माझ्या हातात एक पुष्पगुच्छ देण्यात आला. आणि एवढं मात्र खरं कीं त्यातून डोकावणारी दुर्मिळ पुष्परत्नं पाहून मी माझा सगळा सगळा शीण विसरले; भाषणही विसरले. विश्वजीतदांनी माझी फुलांची आत्यंतिक आवड लक्षात ठेवली होती. दो करातही मावणार नाही असं ते सुगंधी देखणेपण माझ्याकरता एकत्र करण्यात आलं होतं. ते त्याचे निःशब्द आभार होते. त्या फुलांच्या चुकून बाहेर आलेल्या ओल्या दांड्यामुळे साडी खराब होऊ नये म्हणून, त्यांनी माझ्या भाषणाचे कागद गुंडाळले, ते शब्द मुखरित झाले नाहीत तरी सुगंधित व्हावेत म्हणून! फुलांवरच्या प्रबंधापेक्षा त्याचे सुगंध टिकतील असं वाटून गेलं! निदान मला तरी!!

* *

पाऊलखुणा

बा अदब ! बा मुलाहिजा !!

ही ललकार, कुठले राजे महाराजे येणार आहेत म्हणून त्यांच्या स्वागताकरिता आहे असं समजू नका. उरले आहेत कुठे राजे महाराजे! पण या ललकाऱ्या लुप्त झाल्या तरी असं वाटतं ते शब्द, त्यातला भावार्थ, नाहीसा होता कामा नये. तो अर्थ आपण नीट विचारात घ्यायला हवा.

असहिष्णु, असमंजस भावनातूनच अनेक संघर्ष निर्माण होत असतात. मुलाहिजा न ठेवण्याची वृत्ती व्यक्तीला घातक होते. प्रसंग तसा छोटासाच ! मला स्वतःला फुलांची आवड म्हणून, ओळखीच्या ठिकाणी जाताना, बरेचदा मी फुलं घेऊन जाते; भेट म्हणून. नव्वद टक्के अनुभव असा, ती ठेवल्या ठेवल्या मान टाकतात अथवा कशीबशी कुठेतरी कोंबली जातात !

फक्त एकच सुखद अनुभव ! एक साधारण ओळखीच्या बाई. पण त्या असाधारण, अत्यंत मोठ्या, सार्वजनिक कार्यकर्त्या. घरचा खूपच पसारा खूपच मोठा. त्यांच्या भेटीचा पहिलाच प्रसंग. भेट होताच मी म्हटलं. 'आमच्या बागेतली, मी लावलेल्या पैकी चार फुलं आपल्या करिता.' त्यांनी ती हातात घेऊन हुंगली. शेजारच्या माणसाला लगेच पाण्यात ठेवायला सांगितली, अन् म्हणाल्या, 'जराशानं लावीन नीटपणे.' कामातली व्यग्रता खऱ्याखुऱ्या मोठ्या लोकांच्या बाबतीतही बारीकसारीक गोष्टींची दखल घेण्याच्या आड येत नाही. तो त्यांचा स्वभावच बनलेला असतो.

आपल्या रोजच्या जीवनातही अनेक प्रसंग असतात. ज्याबद्दल आपण सूक्ष्मतेनं विचारच करत नाही. एकदा रिक्षाची वाट पहात असताना, काही जळाल्याची घाण आली. बाजूलाच झाडाखाली पालापाचोळा पेटवला होता. त्यात बहुधा रबर व इतर काहीबाही जळत होतं. झाडाला व जवळच्या घराला धग लागत होती. त्याची पर्वा आम्हाला कशाला हवी! प्रदूषण वाढत जातं, जनातलं–मनातलं, आम्ही थोडेच जबाबदार!

त्या उलट, कोणा एकाच्या फाटकासमोरचा रस्ता. जाण्या–येण्याच्या वाटेतच मोठा दगड पडलेला. कितीतरी लोक त्याला ठेचकाळून, शिव्या घालून गेलेले. अगदी आमच्या समोरच एक वृद्ध पडतापडता सावरले. पण उठताच लगेच तो अवजड दगड बाजूला करण्याचा त्यांचा प्रयत्न! दुसरा माझ्यापेक्षाही म्हातारा पडायला नको. किती दूरवरचा विचार!

नुकतेच आम्ही कैरोला गेलो होतो, त्या वेळची गोष्ट. एका हिंदुस्थानी कुटुंबात आम्हाला जेवायला बोलावणं होतं. कैरोला जाऊन एक दोनच दिवस झाले होते. परमुलखात येणारा अनोखेपणा होता. यजमानगृही आम्ही सांगितल्या वेळेपेक्षा पाचदहा मिनिटेच उशीरा पोहोचलो; तर तिथं टी. व्ही. वर हिंदी फिल्म चाललेली! आम्ही जाताच, जेमतेम दोन खुर्च्यांवर आम्हाला बसवलं आणि सगळी मंडळी परत फिल्म पहाण्यात गुंग! दोन तासानं फिल्म संपल्यावर, ते लोक सत्यसृष्टीत उतरले. आणि ते आम्हालाच काय म्हणतात, 'आज इंडियन फिल्म होती. जरा लवकर का नाही आलात?' म्हणजे आता सांगा! आम्ही नवीन आलेली माणसं. आम्हाला काय माहीत तिथल्या टी. व्ही. ची वेळ, अथवा त्यावरचे कार्यक्रम. जेवणाचं आमंत्रण देतानाच या गोष्टीची कल्पना दिली असती तर बरं नसतं का झालं? परदेशात इंडिअन फिल्मचं अप्रूप वाटणं साहजिकच असलं तरी बोलावलेल्या पाहुण्यांचा आदर न ठेवणं यात मुलाहिजा आणि आदब या दोन्ही गोष्टी डावलल्या जातात. मग वाटतं अशी आमंत्रणं आदरातिथ्याकरता नसून स्वतःच्या डामडौलाकरताच असतात की काय!

पार्टीवरून आठवलं. हल्लीच्या जीवनात पार्ट्यांची देवाण–घेवाण ही अगदी आवश्यक बाब होऊन बसली आहे. एक 'स्टेटस सिम्बल ! अशा पार्टीत तुम्ही सहभागी झालात म्हणजे असं इंप्रेशन दिलं जातं की तुम्ही म्हणजे त्या पार्टीचा प्राण ! तुम्ही गेला नसतात तर ती पार्टी 'फेल्युअर' झाली असती. माझीही स्वत:बद्दल अशीच गोड समजूत होती ! अशीच एक पार्टी संपली. यजमान–यजमानीण यांचा तोंडभरून निरोप घेतला. बाहेर पडले. थोडा रस्ता चालून जाताच चष्मा तिथेच विसरल्याचं आठवलं. दार उघडंच होतं. आत शिरले तो माझ्यावरच टीका–टिपणी चालू होती !

ऐकून खाल्लेल्या वस्तूंची चवच गेली. त्या उलट जाणाऱ्या पाहुण्यांना, घरच्या पायरीवर उभी राहून निरोप देणाऱ्या गृहिणीबद्दल असे उद्‌गार ऐकले आहेत.

'आमची पाठ वळताच तिनं लगेच तोंड फिरवलं नाही, तर गाडीच्या खिडकीतून वळून पाहताच तिला तिथंच उभी पाहून बरं वाटलं. कधी हे लोक टळतात असं झालेलं दिसलं नाही.'

असं म्हटलं आहे, 'Life is not so short but there is always time for courtesy.' आयुष्य किंवा तुमचा वेळ इतका काही थोडा नाही की तुम्ही चांगुलपणा, सभ्यपणा दाखवू शकणार नाही ! या छोट्या पण अर्थपूर्ण गोष्टीत, मुलाहिजा ठेवल्यामुळे, अदब ठेवल्यामुळेच, आयुष्याला गोडी येते. देवघरात लावलेल्या उदवत्तीमुळं आजूबाजूचा परिसर सुगंधित व्हावा, तसं या छोट्या पण चांगुलपणायुक्त वागणुकीचं आहे.

लहानपणी, वेणीफणी झाली की गुंतवळ तसाच बाहेर टाकायचा नाही ही शिकवण असे. चिमणीच्या तोंडात म्हणे केस जातात ! आता माणसांच्या तोंडात गेले तरी काय पर्वा ! सगळ्या गोष्टींचाच गुंतवळ झाला आहे. आमचं घर स्वच्छ झाल्याशी कारण. आम्ही जाता जाता दुसऱ्यांच्या बागेतली फुलं तोडतो. सौंदर्याचा मुलाहिजा नाही. सहज गप्पात कुटाळक्या करतो. दुसऱ्याच्या भावनांबद्दल विचार नाही.

एक सुंदर कार्यक्रम चाललेला असतो. फुकट असल्या मु- अर्थातच हॉल भरलेला असतो. जागा नसतानाहि, उशीरा येऊनसुद्धा जागा मिळणं हा हक्क आहे या भावनेनं हुज्जत चाललेली ! 'अदब' या शब्दानंच लाजेनं मान खाली घालावी !

त्या कार्यक्रमाच्या रंगतीपेक्षा मला जागा मिळणं हेच महत्त्वाचं असं ज्या व्यक्तींना वाटतं त्यांना 'आदाब अर्ज' करून सांगा वंस वाटतं– जीवनाची कदर करायला शिका. वस्तूंची, व्यक्तींची, ध्येयांची. नाहीतर ही बेपर्वा वृत्ति तुमच्यावरच बूमरँगसारखी उलटेल.

आयुष्य समृद्ध करण्याकरता फार मोठ्या गोष्टींचीच जरूर असते असं नाही.

रस्त्यावर बरेच ठिकाणी पाटया असतात, 'थांबा आणि पुढे जा.' तसंच आयुष्याच्या वाटचालीत थांबून विचार केलात तर तुमचं तुम्हालाच बरं वाटेल. क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीचीहि निगाह राखत गेलो, तर राजेपद जरी नाही तरी आयुष्याचा साधासुधा मार्गच राजपथ होईल; आणि मग तुमचा–इतरांचाहि आयुष्यक्रम सुसह्य होईल !

* *

पाऊलखुणा

आइनारवाना

'अंदाज अपने देखते हैं
आईने में हो।
और ये भी देखते हैं
कोई देखता न हो।'

आदिमायेचं ते मूठभर रूप, समोरच्या पुरुषभर आरशात, आपलं चिमखडं रूप पाहण्यात गुंग होतं. त्या इवल्याशा गोजिरवाण्या प्रतिबिंबानं तो प्रशस्त आरसाच जणु उजळून निघाला होता. त्याचं दर्पण हे नांव सार्थ करणारं; त्या इवल्याशा रूपामुळं आरशालाच जणू गर्व चढावा असंच ते मोहक बालरूप. दर्पाचा अजून लवलेश नसलेलं; पण सौंदर्याचा, स्वत्वाचा प्रथमच साक्षात्कार झालेलं. पण मी तिच्याकडे पहात आहे हे कळताच गोडसं लाजलेलं !

बहुधा प्रत्येकालाच बघायला हवं असतं आपापलं रूप. क्वचित् एखादा असाही निघतो, 'दर्पणसे मुझे नफरत है. बड़ी उमीदसे मैं भी सामने गया।' काय मनुष्यस्वभाव असतो बघा ! आपण रूप बघत असतांना, दुसऱ्यानं डोकावलेलं आपल्याला आवडत नाही. पण इतर वेळा मात्र पहावं अशीही इच्छा असते. अर्थात् परत परत पहाण्यासारखं आपल्याजवळ काही आहे की नाही याचा अंदाज आपल्या आरशानं प्रथमदर्शनीच दिलेला असतो.

हा जुना आरसा नुकताच माझ्याकडे आला आहे, खूप खूप जुना. पण तो जुना असला तरी माझं त्याच्याबद्दल कौतुक, नाविन्य कमी झालेलं नाही अजून तरी ! नकळतच मी त्याच्यासमोर उभी राहते अन् स्वतःचं रूप न्याहाळता न्याहाळता, मनात येतं किती रूपं– किती अनेकविध रूपं या आरशात प्रतिबिंबित झाली असतील. तीही कितीतरी वर्षं ! असं म्हणतात, हा आरसा माझ्या आजोबांकरिता आणवला गेला. कांच उत्तमपैकी बेल्जियम घडणीची. बिल्लोरी, त्याकाळी पद्धत होती तशी. सोनेरी नक्षीदार फ्रेम, चांगली तीनचार बोटं रुंद. मोठा देखणाच दिसत असावा त्याकाळी हा आरसा. आता मात्र वृद्धापकाळीसुद्धा बरंचसं सौंदर्य टिकून असावं, असं झालंय याचं. सोनेरी वर्ख जागोजागचा निघून गेला आहे. खपल्या निघत आहेत. पाराही उडून जात आहे. निघून गेलेल्या काळाचं प्रमाण म्हणून की काय, आरशावर काळे डाग पडले आहेत.

अन् आरशाच्या या थोड्याशा धुरकटलेल्या अवस्थेमुळेच की काय, माझंही प्रतिबिंब घूसर होत जातं. विचाराच्या भरात मी खाली बसते. इतर अनेक स्त्रीरूपं माझ्या समोर उभी रहातात. जुन्या काळची कुणी पुरंध्री, माझी आजी, पणजी, क्वचित काळी क्षणभर, या आरशासमोर थांबली असेल का ! आरशासमोर उभं राहणं हे काही चांगलं समजलं जात नसे म्हणे ! मग पटकन पाहून नथेचा चाप तिनं ठीक केला असेल. तिरप्या नजरेनं खोप्यावरचं मूद-अग्रफूल दिसतं का निरखलं असेल. कारण भाळावरची चंद्रकोर रेखायची ती फणेऱ्याच्या पेटीतल्या चतकोर आरशातच !

आमच्या आईनं आमची वेणी या फणेऱ्याच्या पेटीसमोर बसवून घातलेली आहे. सुबकशी, छोटीशी–तिरपा आरसा ठेवून आमची छबी दाखवणारी. तिच्या पोटात कुंकू, मेण, हस्तीदंताच्या फण्या. वेणी झाल्यावर मात्र हळूच आम्ही दिवाणखान्यात जाऊन त्या मोठ्या आरशात बघून घ्यायचो अन् कानामागे केसात बोटं घालून वेणी सैल करून घ्यायचो. खोप्यानंतर मानेवर रुळणारे, गजरा माळलेले अंबाडे या आरशानं पाहिले. मग तर नागिणीसारख्या दोन शेपट्या !

आता तर लांबत जाणाऱ्या काळावरोबर केसाचं आखूडपणही या दर्पणाला आपल्यावर बिंबवून घ्यावं लागत आहे ! पण त्याची स्मृति जर पाऱ्यासारखी हळूहळू उडून जात नसेल तर तो नक्कीच मनाशी म्हणत असणार, 'अरे, हिची आई पण अशीच दिसायची हं.' एखादी माहेरवाशीण आलेली पाहून !

पण नुसती माणसांचीच प्रतिबिंबं नव्हेत तर अनेक सजावटी-सुद्धा या आरशानं पाहिल्या आहेत. मला विशेषतः आठवतात त्या भाद्रपदातल्या उभ्या महालक्ष्म्या. काय आरास असायची ! घरातल्या गृहलक्ष्मीच्या अंगावरचे ठळक ठळक दागिने त्या महालक्ष्मीच्या अंगावर सजून बसलेले असत. वरती टांगलेलं करंज्याचं मखर. चिचेनं घासूनपुसून लख्ख केलेल्या, उगाळलेल्या कोळशानं डोळे, केस रेखलेल्या त्या पितळेच्या मुखवटचांवर काय तेज चढलेलं असे. त्यांची ती बाळं. त्या आरशासमोरचं ते दृश्य काय देखणं असायचं. देवीचं दर्शन घेता-घेता आपल्या कपाळीचा मळवटही हळूच नीटनेटका करायची एखादी नववधू !

यावरूनच कधीतरी ऐकलेली एक गोष्ट आठवली. असं म्हणतात, सोलापूर जिल्ह्यात चैत्रगौरीच्या लाकडी फ्रेमला मोठ्या समईवर बांधून नऊवारी साडी नेसवतात आणि चेहऱ्याच्या जागी छोटासा आरसा बसवतात. हळदी-कुंकवाला येणाऱ्या सुवासिनीनं गौर पाहिली की तिला आपलीच प्रतिमा गौरीत दिसते. किती सुंदर कल्पना आहे नाही का ! पण स्त्रीचं हे गौरवपूर्ण लक्ष्मीरूप, सन्मानानं राखलं पाहिजे, अन् राखण्यासारखं असलं पाहिजे !

आता ठायी ठायी, अन् अनाठायीसुद्धा, असणारे हे आदर्श आरसे पाहून मनात येतं; अगदी सुरुवातीला माणसानं आपलं रूप कसं पाहिलं असेल ? नारसिससारखं पाण्यातच का ? जर माणसाला स्वतःची बाह्य ओळखच प्रथम पाण्यात झाली असेल, तर पाण्यात पाहणं हा वाक्प्रचार कां ! नारसिससारखं उभ्या जागी, आपलं आपल्यालाच, मुग्ध करून टाकणारं सौंदर्य प्रत्येकाजवळ असतंच असं

नाही. पण रूपदर्शनाची ही तहानही पाण्यामुळं भागली असेल. अर्थात रूप नीट दिसायला पाणीही नितळ हवं.

पण मग ज्ञानाचं फळ खाल्ल्यावर स्त्री इतकी स्वस्थ बसली नसणार. एकदा स्वरूपाची जाणीव झाल्यावर, ते वारंवार आणि सहज दिसायला हवं ! मग काश्यांचा उपयोग–अभ्रकाचा शोध–आपलंच रूप आपल्याला हवं तेव्हा कसं पाहता येईल, याचा शोध ! एक गोष्ट वाचली होती, जपानमधील आरशाबद्दलची. एका खेडुताला प्रथमच एक आरसा मिळतो. त्याला वाटतं, आपल्या वडिलांचा तरुणपणातला चेहरा दिसतोय. मोठ्या भक्तिभावानं, तो आरसा घरी आणतो. मधून मधून, त्या आपल्या वडिलांच्या (!) चित्राचं तो भक्तिपूर्वक दर्शन घेतो; अर्थातच आपल्या बायकोच्या नकळत. पण नेहमीप्रमाणंच, त्याच्या बायकोला संशय येतो.

नवरा घरी नसताना, बायकोनं ते तथाकथित चित्र पाहिलं. अन् मग तिची खात्रीच झाली, आपल्या नवऱ्याचं दुसऱ्या स्त्रीवर प्रेम आहे म्हणून. मग अर्थातच संशयकल्लोळ ! ही गोष्ट वाचली अन् मला तांब्यांच्या कवितेची आठवण झाली. ते लहानपणचं माझं आवडतं गीत. अन् एकदा अशीच मुलाला खेळवीत बसले असताना, समोर टांगलेल्या आरशासमोर एक चिमणी येऊन सारखी टोच्या मारू लागली. चिमण्यांचा हा स्वभाव आपल्या माहितीचाच आहे ! चिमणीला, बाहेर जायला रस्ता मिळेनासा झाला, किंवा काठी घेऊन आपण तिच्या मागे लागलो, की ती या भितीपासून त्या भितीपर्यंत शट्लकॉकसारखी टक् टक् करीत असते. पुष्कळदा खिडकी उघडी असूनही बाहेर जात नाही.

तर अशीच एक चिमणी त्या दिवशी आरशावर चोच आपटत होती.

'चिव चिव चिमणी छतात छतात ॥
आरसा लोंबे भितीला–भितीला ॥'
चिमणी पाहे सवतीला । सवतीला ॥

चिमणीला वाटतं, 'अरे ही तर दुसरी चिमणी म्हणजे सवतच!' मग ती जणु लागते तिच्यावर प्रहार करायला. पण होतं काय! त्या सवतीला तर लागतच नाही. उलट आपलीच चोंच दुखते.

आपली तर समजूत अशी आहे, आरशात माणसाचे जे प्रतिबिंब दिसते, तो तर माणसाचा आत्मा होय. कौषितकी उपनिषदात आरशाचा उल्लेख आलेला आहे 'एष आदर्शे पुरुषः तमेवाहमुपासे' आरशातल्या या पुरुषाची मी उपासना करतो–म्हणजे या आत्म्याचीच उपासना काय! आदर्श म्हणजे आरसा जो आपल्याला आदर्श रूप दाखवतो. जे इतर सहजासहजी पाहू शकतात, पण आपणच आपल्याला नीट पाहू शकत नाही (पुष्कळदा ओळखू पण शकत नाही!)

'ए, कुंकू तर वाकडं लागलं नाही ना? नाकाला तर कुठं काळंबिळं लागलं नाही ना?' सखीनं सांगितलं, 'आदर्शानं दाखवलं तरच कळायचं.

पण ही आपली प्रतिमा नीट दिसायला आरसा स्वच्छ हवा. 'हे बहु असो आरिसा। आपणपै देखावया जैसा। पुढत पुढती बहुवसा। उटिजे प्रीति।' आरशाप्रमाणेच मनाचं आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्याला पाहण्याकरिता आरसा आवडीने वारंवार पुष्कळ स्वच्छ करतो, तसंच मनही स्वच्छ ठेवायला हवं. तरच त्यात उठणारं प्रतिबिंब सुस्पष्ट असेल. सर्द वाऱ्यानं तर आदर्शाला लगेच काळिमा येतो. आजूबाजूच्या वर्दळीत, हवेच्या संसर्गानं आरसा स्वच्छ राहत नाही. तसंच मनहि निर्लेप असू शकत नाही. कवीनं मनाला आरसाच म्हटलं आहे. 'पुहुपमध्य जिमि बास बसत है। मुकुरमांहि जस छाई.' फुलामध्ये जसा सुवास वास करतो, तसं या मनमुकुरात–आरशात, परमेशाची छाया.'

तर असे हे आदर्श, अनेक प्रकारचे–प्रकाश परावर्तित करणं हा यांचा गुणधर्म. आरशातहि दोन किंवा तीन म्हणा– प्रकार. एक म्हणजे साधा. काही प्रकार– अंतर्गोलाकार (कॉन्केव्ह) असतात. त्यात पाहिलं की चित्र मोठं दिसतं. तर काही असतात बहिर्गोलाकार (कॉन्व्हेक्स). त्यात पाहिलं तर चित्र–प्रतिबिंब लहान दिसतं. तसंच

आपल्या मनाचं असतं. मनाच्या आरशात हे दोन्ही प्रकार असतात. समोरची प्रतिमा, आहे त्याच स्वरूपात आपण पुष्कळदा पाहू शकत नाही. ती व्यक्ति म्हणा, समस्या म्हणा, त्याची यथायोग्य प्रमाणं (डायमेन्शन्स) त्या व्यक्तीच्या अन् आपल्या जवळिकीवर, आपल्या मनाच्या स्थितीवर, बुद्धीवर निर्भर असतात. आपल्या कुवतीनुसार ती लहानमोठी होत जातात. तसंच या मनमुकुरावरही अनेक विचारांची– पूर्वग्रहांची पुटं चढलेली असतात. प्रतिमा धूसर होतात त्यामुळं.

पण निदान नवं वर्षंतरी–किंवा त्याची सुरुवात का होईना, दर्पणासारखी निर्मळ आनंददायी (संदीपयति चक्षु इति दर्पणः– डोळ्यांना आनंद देणारा तो दर्पण) व्हावी, ह्या हेतूनं असावी. ही तमिळ कल्पना ! तमिळ नववर्षाच्या आदल्या दिवशी, संध्याकाळी आरशासमोर फळं फुलं, धान्य धन हे ठेवतात. अन् नववर्षाच्या दिवशी सकाळी, गृहलक्ष्मी शुचिर्भूत होऊन–प्रथम आरशाचं आणि त्याच्या-समोर ठेवलेल्या वस्तूंचं दर्शन घेते.

काही ठिकाणी तर मुलाला एक वर्षापर्यंत आरसा दाखवला जात नाही. का कुणास ठाऊक ? पण खरं तर आजूबाजूची जाणीव व्हायला लागली म्हणजेच माणसाला स्व–रूपाची जाणीव–जिज्ञासा उत्पन्न होते. त्यापूर्वी, त्या बालजीवाला आपल्या रूपापेक्षा, अस्तित्वा-पेक्षा, मातेच्या रूपाची, तिच्याच अस्तित्वाची जाणीव असते. त्याला त्याचं रूप दिसतं तर ते मातेच्या नेत्रातच ! मग स्वत्वाची ओढ सुटते, पाय फुटतात, जगाची ओळख होते अन् जगापुढची आपली प्रतिमा कशी दिसते, हे निरखण्याकरता दर्पणाची गरज भासू लागते.

तर याउलट, एक पद्धत अशी आहे म्हणे, की वयाच्या ऐंशीव्या वर्षी, नवराबायकोनं एकमेकांचं रूप आरशात पाह्यचं ! मला वाटतं तोपर्यंत रूप इतकं ठसलेलं असावं की डोळे मिटून पाहता यावं ! कारण ते मनमुकुरावर कायमचं कोरलेलं असतं. त्यावेळेपर्यंत, पाऱ्या-सारखाच चंचल भाव असलेल्या मनाला बहुधा स्थैर्य प्राप्त झालेलं असतं. आयुष्याच्या धकाधकीत, मनाच्या काचेवर चरे पडले असले,

तरी जर ती अभंग राहिली असली, तर आयुष्याचा, जीवनाचा 'आदर्श' कायम राहिला असंच वाटत राहील.

असं म्हटलं आहे, 'जीवनात प्रकाश पसरविण्याचे दोन मार्ग आहेत. एक तर प्रकाशदायी अशी ज्योत बना; ते जर शक्य नसेल तर तो प्रकाश परावर्तित करणारा आदर्श–आरसा बना–' आरशाला 'आत्मदर्श' असंहि म्हणतात. पण खरोखरी पाहता, या बाह्य आरशात तुमचं रूप न पाहता, तुमचं मनच आत्मदर्श बनलं पाहिजे. तुमचं मनमुकुर स्वच्छ, निर्मळ असेल तर ज्या बिंबाचं तुम्ही प्रतिबिंब आहात, ते बिंबच तुमच्यासमोर अतिविमल स्वरूपात उभं राहील– सगळाच प्रकाश पुनः पुनः परावर्तित होऊन तुमचं खरं स्वरूप झळाळून उठेल !

* *

पाळलेणा

तुमची चिंता-आमचे लेखन

म्हणजे एकंदरीत, असून अडचण अन् नसून खोळंबा, असा प्रकार झाला आहे, आम्हा लेखिकांच्या बाबतीत ! आम्ही लिहावं तरी पंचाईत न लिहावं तर तुटवडा ! अन् हा असला अडचणीचा खोळंबा नुसता लेखिकांच्याच बाबतीत को सगळ्या स्त्री जातीबद्दल ! आम्हांला मात्र ना चिंता विषयाची, ना लिहिण्याची.

तसं पाहिलं तर, मलाही एकेकाळी, लिहिणं या गोष्टीबद्दल अत्यंत कंटाळा होता. शाळेत असताना निबंध आणि पत्रं, यांची प्रगती एका पानापुढे कधी व्हायची नाही. शिक्षिका म्हणायच्या, "अग जरा अवांतर वाचावं. विचार करावा माणसानं." तर तसा कादंबरी वगैरे वाङ्मयाचा मी फन्ना पाडीत असे. विचार करणं मात्र जरा भारी पडायचं डोक्याला. बरं पत्रं-पत्रं अशी काय लिहावयाची ! तुम्ही खुशाल, आम्ही खुशाल ! हवं तर तुम्ही खुशाल समजा आम्ही खुशाल आहोत म्हणून !

त्यातूनही जास्त महत्त्वाचा विषय लिखाणाचा म्हणजे जमाखर्च. लग्न झाल्यावर हे "अर्थखातं" फारसा अर्थ नसलेलं, आमच्या हाती आलं. जमाखर्च आणि डायऱ्या लिहिणं हा आमचा अनुवंशिक गुण आहे. किंवा उचललेला आहे. मी जमाखर्च लिहावयाला बसले म्हणजे बारीक सारीक हिशेव बरोबर असतो. मोठ्या रकमेचा घोळ मात्र काही केल्या संपत नाही अन् मी तर लिहित असते; एकनाथांच्या

तल्लीनतेनं. तशी प्रत्येकच लेखनाच्या आणि कामाच्या बाबतीत माझी तल्लीनता असते. काहीजण त्याला निद्रा–समाधी म्हणतात. पण ते काही खरं नाही. अर्थमंत्र्याच्या थाटात बजेटिंग चाललेलं असतं. हे शेवटी म्हणतातच, "अग आली ती जमा, झाला तो खर्च, उरली ती श्रीशिल्लक." फक्त एवढंच, उरत काहीच नाही, कुठल्याच हिशेबात.

तसंच डायऱ्या पण खूप वाचल्या आहेत; सालोमन ग्रँडीच्या आयुष्याप्रमाणे लिहिलेल्या, "Born on Monday" या चालीवर नोंदी केलेल्या. जुन्या कॅलेडर्स इतकाच त्यांचा उपयोग. संस्कृतमधल्या "पादपुराणार्थे" घातलेल्या शब्दाइतकाच त्या आयुष्यातल्या घटनांना अर्थ.

आता आई-वडिलांचं होमवर्क सुटलं आहे की नाही कुणास ठाऊक ! पण पूर्वी तरी माझं ते महत्त्वाचं लेखनकार्य–निदान लेखनाकरता साहित्य जमवण्याचं काम असायचं. मुलाचं होमवर्क पूर्ण झालेलं आहे की नाही– नाहीतर ते पूर्ण करण्याची जवाबदारी तुमची. त्माच्या निबंधाचे अनेक विषय– त्यातला एक विषय "आई" हा असायचाच! तर त्या सगळ्या विषयांवर माहिती गोळा करून देणं हे माझं मोठं संशोधन कार्य असायचं. पण तेही अवचित सुटलं. मी त्याला पुरवलेल्या अन् अगदी बरोबर असलेल्या (पण शाळेतल्या टीचरला अज्ञात असलेल्या) माहितीबद्दल, त्यानं वर्गात बोलणी खाल्ली त्याच टीचरकडून. आणि त्या वेळेपासून आपल्या आईला काही कळत नाही हा मुलाचा ग्रह कायमचा होऊ नये म्हणून त्या बाजूचं लेखनकार्य मी आवरत घेतलं.

तरी एकूणच, लिहिण्याची खुमखुमी सुटेना. पुन्हा आमची वंशावळी नडली. एक काका साहित्यिक, दुसरे समीक्षक, वडील कवि, आता या सगळ्या साहित्यगंगेच्या परिसरांत राहून मी कोरडी कशी राहूं ! मला लिहिलंच पाहिजे होतं. माझ्या 'मी' पणाकरता. साहित्य प्रेमा करता म्हणून नव्हे. पण इच्छा म्हणजे कुवत नव्हे, हे कधी डोक्यातच आलं नाही नव्हे जमेतच धरलं नाही. जमेच्या बाजू लक्षात न घेताच आपण अनेक गोष्टी जमवत असतो, त्यातला प्रकार. वाटलं,

लेखन काय सहज शक्य आहे– बऱ्याच वर्षांपूर्वी नाशकास गेलो होतो. कवि गोविंदांच्या घरी जाण्याचा योग आला. तेव्हा काका म्हणाले होते, बघून घे एका कवीचं वसतिस्थान. ही खोली त्यांची. तुला जरा आवड आहे काव्याबिव्याची. विचार आला, त्यांची खोली पाहून आमचा उथळपणा काय कमी होणार! उलट आमच्या कमीपणाची जाणीव झाली तरी पुरे म्हणते मी.

पण ते असो! त्यातूनही लिहायचचं ठरवलं तर, सगळ्यांत सोपा विषय म्हणजे प्रवासवर्णन. पूर्वी "काशीच्याच पुढे जरा" (वाचा सावरकर) असलेली विलायत आता अगदी अंगणांत येऊन बसली आहे. कमरेत झुकलेल्या महाराजांच्या कृपेनं! पूर्वी फक्त भूगोलाच्याच पुस्तकांत वाचलेली अन् नुसती डोळ्यांसमोरून गेलेली नावं आता पायाखाली घातली जात आहेत. आमची पायधूळ त्या त्या देशांवर झडली आहे असं दाखवणारी प्रवासवर्णनंही आम्ही लिहितो. लेखाला सोपासा विषय मिळतो अन् "केल्याने देशाटन"ची जाहिरात पण होते.

पण खरंच, मी काय पाहिलं असतं! आपण स्थळं पाहतो, पण त्या त्या स्थळी राहणारी माणसं पाहत नाही. कधीच्या काळी ही संधी मिळालेली असते, देश पाहण्याची, फेरफटका मारण्याची, ह्यांच्या कृपेने. कारण फेरा माझा होतो, फटका बसतो यांच्या खिशाला; अर्थातच माझ्या "शॉपिंग" मुळे! मालांनी दुकानं खच्चून भरलेली असतात. मित्र मैत्रिणीकरता "सूव्हिनीर्स" घ्यायची असतात; माझ्या प्रवासांची त्यांना आठवण असावी म्हणून. मला आठवतं, शेक्सपिअरच्या घरासमोर उभे राहून आम्ही आमचे फोटो काढून घेत होतो. त्या आनंद कल्लोळात मला फक्त एकच नाटक अथवा त्या नाटकाचं शीर्षक आठवलं, "मेरी वाइव्हज् ऑफ विंडसर."

या माझ्या प्रवासाच्याच सुमारास, आमच्या कॉलेजवरची एक कामगार स्त्री रुक्माबाई पंढरीला जाऊन आली, अर्थात् पायीच! आल्या आल्या माझे हात आपल्या खरबरीत हातात घेऊन म्हणाली "बाई, बगीतलं मी इटुबाला." तिच्या चेहऱ्यावरचे कृतार्थतेचे भाव.

ते तिचं प्रवास वर्णन कुठंच आलं नाही. तेवढ्या दिवसात मी बरंचसं जग पाहिलं होतं अन् तिनं फक्त विठोबा !

अन् इतकं सगळं असूनही मी परत लिहायला बसते. (दळायला बसते या चालीवर !). सगळं साहित्य, एकदाचं गोळा होतं; न चुरगळलेले कागद, नवीनच घेतलेली अन् सगळ्यापासून छपवून ठेवलेली बॉलपेन आणि डोकं (चुकूनच ठिकाणावर असलेलं)! मग मी बसते लिहायला, पलंगाच्या टोकावर, टेलिफोनच्या जवळच. एक पाय खाली सोडलेला, त्यामुळे लेखनही अगदी एका पायावर ! टेबल खुर्ची नसतेच कधी.

मागे कुठं तरी एका गोष्टीत, एकानं नियम केलेला असतो; एकाच पायावर सतत उभं राहून, रामनाम घेण्याचा. तशी माझी सगळी कामं पाय बदलून अथवा " चाल " बदलून चाललेली असतात. तर मग अशी बैठक घेऊन मी मोठ्या अक्षरात शीर्षक लिहिते. चार पाच ओळी नीटसपणे लिहून होतात तोच टेलिफोन वाजतो. तो असतोच मुळी नको तेव्हा वाजण्यासाठी. टेलिफोनच्या जवळ बसा अथवा दूर, तो घेण्याचं काम माझंच– मग ज्याचा त्याचा निरोप पोहोचवायचा. आवाजाच्या टप्प्यांत असेल तर ओरडून, नाही तर स्वहस्ते, नव्हे स्वचरणी, जाऊन ! बरं फोन माझाच असला तर लिखाणाऐवजी भाषण सुरू होतं.

मग परत उडालेले कागद एकत्र करून, म्हणतात तसा प्रतिभेचा धागा पकडून (प्रतिभा म्हणजे लोकरीचा गुंडाच किनई!) लिहिणं सुरू होतं. एक कागद जेमतेम भरतो, दुसऱ्यावर आकडा घालावा तर कुणी भेटायला आलेलं असतं, विचारायला मागायला आलेलं असतं– वाटीभर बेसन, चमचाभर दही. तेवढ्यात साहेब घरात असल्यास " अहो ! जरा चहा देता का ! " या अत्यंत गरीबपणानं केलेल्या या मागणीचा पुरवठा– साखरेचा भाव आणि अभावही मनात घोळवत केलेला.

उद्या साखर खुली होणार, या आश्वासनावर आजचा चहा होत नाही. गडप झालेल्या रॉकेलवर स्वयंपाक होत नाही. " मग काय !

भाझी हाडं घालू चुलीत." हा इंधन प्रकार किती युगं चालणार! मनात खूणगाठ बांधली जाते. "डालडा गडप व्हायच्या आत आणला पाहिजे." लेखनाचा विषय त्या डालडच्याच्या डब्यात गोठला जातो.

लेखनाचे कागद ठेवावेत जरा आवरून ! नायिकेच्या येण्यापेक्षा मोलकरणीचं येणं वा न येणं महत्त्वाचं असतं. एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत लिहिलेले कागद तपासण्यापेक्षा कालच्या खरखटचा भांड्याचा ढीग उपसणं जास्त जरूरीचं ! माझ्या डोक्यांत dishwasher गरगरम असतो अन् त्या बरोबरच कुकरच्या शिटचा ! आली, आली, म्हणजे स्फूर्ति नव्हे ! मोलकरीण आणि तीही आनंदाची बातमी घेऊन "बाई ! जास्त मिळतीया – आणून ठेवा – दिवाळीस मग पंचाईत नको." "बरी आठवण केलीस". म्हणजे आता बघा–दिवाळी अंकाकरता लिहावयाचं साहित्य बाजूस ठेवून, दिवाळी करता लागणाऱ्या साहित्याची लांबलचक (ज्याची लांबी पाहून नवऱ्याच्या मानेत लचक भरते) यादी सुरू होते !

खरं म्हणजे मी एकच प्याल्याच्या चालीवर एक झक्क कादंबरी लिहिणार होते, आमच्या मोलकरणीवर. झोपडपट्टीत राहणारा, दारू पिऊन अथवा न पिताच मारणारा नवरा. सगळं मटेरियल तसं तयार होतं. पण म्हटलं प्रथम आपली धुणी धुवून घेऊं या ! मग बाहेरची वेशीवर टांगता येतील, सावकाश गणं ! पण खरं तर, सावकाश बसून लिहायला मला तसा वेळच नसतो. लिहायला काय, वाचायला पण. अमेरिकेत तर म्हणे कादंबऱ्यांच्या सुद्धा लांब लांब वाजणाऱ्या रेकॉर्ड असतात; त्या ऐकत ऐकत आपण आपली दुसरी कामं करावीत, मशीननं. मग असाही विचार येतो लक्ष्मीबाई टिळकांनी कुठला वेळ काढला इतकं लिहायला. कां त्यांच्या परसात भाजीबरोबर साहित्यही फुलत होतं ! त्या म्हणे, पुष्कळ वर्षं, राहुरीला राहिल्या होत्या. अगदी "भाऊ होते, नाना होते, मीही होतो" अशा थाटात, मीहि होतेच की तिथे ! माझ्या अंगणी मात्र कांहीच फुलेना. म्हटलं, त्यांच्या त्या घराचं दर्शन घ्यावं अन् मिळवावी स्फूर्ति ! कारण आता "स्फूर्ति मिळेल काहो बाजारी" असं विचारण्याची वेळ आली आहे !

कारण तुम्हाला हवं असतं, पर्लबक् किंवा तत्सम तोडीचं लिखाण. पण केले नाहीत का प्रयत्न मी तसे ! पूर्वी नाही का पाटीवर मुळाक्षरं काढून देत, त्यावरून गिरवायचं. तसं मोठ्या लेखकांच्या लिखाणाचा अनुवाद कधी माझ्या नावावर, कधी माझ्या परवानगीनं त्यांच्या नावावर छापून, त्यांच्या स्फूर्तीचं मूळ नाही तर कूळ घटविण्याचा प्रयत्न थोडा थोडका का केला ! पण हे लक्ष्यातच आलं नाही. नुसता पोहरा असून भागत नाही. आडातच काही हवं. अन् नसलं तर वरून पाणी टाकून विहीर भरत नाही !

अन् त्यातूनही खरोखरीच मनमोकळंपणानं लिहिण्याचं ठरवलं तर जमेल का ! आहे तेवढं धैर्य, तेवढी विशालता मनाची, सखोलता अनुभवाची? कारण आपण जे जे लिहितो, ते सगळंच आपल्याच अंगाशी चिकटत जाणार ही भीति असतेच. सगळेच अनुभव प्रथम पुरुषी एकवचनी असतात असं नाही, हे खरं. फक्त ज्यावेळी तेल तिखटांच्या जंजाळातूनही, स्वत:च्या अनुभवाबरोबरच दुसऱ्याचे अनुभव, परकाया प्रवेशाप्रमाणे सहानुभूतीने, सहभावनेने जगता येतील, त्याचवेळी ते तुम्हाला वापरता येतील.

जसा आरशाचा आकार वाढावा तसं त्यातलं तुमचं रूप वाढत जातं, त्याचं संपूर्ण दर्शन होत जातं. मोठ्या आरशातून दिसणाऱ्या आम्ही जशा खऱ्या, तशा टीचभर पर्समधल्या बोटभर आरशात पावडर लावण्यापुरतं दिसणारं तुमचं नाकही खरं ! पण माझा सगळा राग त्या नाकावर बसत असला तरी नाक म्हणजे मी नव्हे ! तसंच लेखनाच्या आरशांचं आहे.

तसंच चिमूटभर फुलवलेल्या कापसाची वात डौलदार दिसली तरी माझ्या लिखाणाचा प्रकाश (!) पडायला हवा असला तर सगळ्या आयुष्यात चिमटी चिमटी अनुभव घेऊन फुलवायला हवा ! काही लिहिण्यासारखं गाठी असलं तर मग लिहिणं ओघातच येईल. तुम्हा आम्हाला चिंता नको त्याची. ते लिखाण दुसऱ्या करता कोणा-

करता असणारच नाही. माझ्याच करता असेल, मात्र आत्मकेंद्रित असणार नाही !

एवढं मात्र नक्की की तोपर्यंत तरी समर्थांच्या उक्तीप्रमणे "अखंडीत काही तरी" यावर "काहीतरी" वर जोर देत "लिहीत जावे" करणार आहे.

* *

पाऊलखुणा

माझे छंदोपाख्यान

काळाप्रमाणं शब्दांचे अर्थही बदलतात की काय, कोण जाणे ! आमच्या लहानपणी (कुठल्या युगात होतं ते लहानपण !) हे असले छंद बिंद, असली फ्याड्स नव्हती. उलट छांदिष्ट, नादिष्ट असल्या कुठल्याच शब्दाचे अर्थ अन् त्यातून अभिप्रेत होणारा ध्वनि, " इष्ट " नव्हते. सकाळी उठल्यापासून, किंवा उठवल्यापासून, तो रात्रीपर्यंत, " जारे पोरानो झोपायला " अशी आज्ञा होईपर्यंत, नाकासमोर दिवस काढायचे, किंवा मोठ्यांच्या डोळ्याच्या धाकात ! फक्त क्वचित् काही वेळ घालवण्यासाठी अथवा लग्नाच्या बाजारात काही जास्तीचे गुण चिकटविता यावेत या दृष्टीनं काही अवांतर गोष्टी शिकण्याची मारून मुटकून परवानगी मिळाली तरच शिकायच्या–करायच्या.

आणि त्यातही फार फार म्हणजे आमची धाव असायची– रांगोळ्याचे मुंग्यासारखे काढलेले ठिपके, त्या ठिपक्यांना जेमतेम साधणाऱ्या वक्ररेषा. लोकरीची झबली, टोपली, जी बहुधा कुणाच्याच अंगाला येत नसत; आणि लोकांना दाखवून दाखवून ज्यांचा मूळ रंग आता ओळखू येत नसे. शाळेत विणकाम, शिवणकामाचा तास असल्यास, दोन चार बोटं लांबी रुंदीचे केलेले किंवा लाडीगोडी लावून कुणाकडून तरी करवून घेतलेले आणि वहीत बरोबर उलटे शिवलेले नमुने– तेही वार्षिक परीक्षेच्या जेमतेम अगोदर. त्या आमच्या आद्य कलाकृति. मग साथ आली " ग्लॅक्सोची बाळं " भरण्याची. फळीवर नीट मांडलेले ग्लॅक्सोच्या दुधाचे रिकामे डबे आणि त्या डब्यातल्या

दुधावर गुटगुटीत झालेलं बाळ. त्या रांगत्या बाळाचं चित्र आणि त्याला सुशोभित करण्याकरता लागणारं सगळं सामान तयारच मिळे.

ती कला (!) शिकवणाऱ्या बाई, आमच्या शाळेच्या जायच्या यायच्या रस्त्यावर राह्यच्या. एका चाळीत, एका खोलीत त्यांचा सारा संसार आणि त्यातच आमचा क्लास. रस्त्यावरच्या दगडी पायऱ्या. आत अंधारी ओसरी. त्या ओसरीवरचा अंधार भर दुपारीही ओसरत नसे. त्या ओसरीवर आम्ही ५–६ शाळकरी मुली दाटीवाटीनं ती "बाळं" भरायला शिकत असू. एकमेकींची बाळं एकमेकीच्या मांडीवर. त्या पाच बाळांचे पन्नास प्रकार. रंग नाही. संगती तर कसलीच नाही. कुठलीच कळा नाही. ठरलेलं सामान नुसतं टांचायचं– चिकटवायचं. आम्हाला उत्साह पण तितकाच. त्याही पेक्षा कमी त्या बाईना. जितकी "बाळं" आम्ही भरत बसू, त्याहूनही जास्त बाळांनी तिचं घर भरलेलं होतं. आमच्या "बाळांना" कपडे शिवायला सांगून ती घरात जायची, तिच्या बाळांचे कपडे बदलायला. क्वचित् प्रसंगी आम्हालाही ते काम करायला लागायचं. क्लासचा हा पहिला अनुभव काही सुखद नव्हता.

त्यानंतर, घरीं आपणहून काही करायला गेलं कीं "काय उगीच छांदिष्टपणा लावला आहेस"– "पुरे झाले नसते उद्योग"– "घरात उगीच अडगळ" वगैरे उत्साहवर्धक वाक्ये ऐकायला यायची. मग एक दिवस घरासमोरच गायन क्लास सुरू झाला. त्याकाळी, त्या लहानशा गावांत संगीत क्लास ही अपूर्वाईची गोष्ट होती. तशी आमच्या घराण्यातही होती थोडीशी संगीताची आवड. पण म्हणून घरच्या मुलीनं, गायन शाळेत शिकायचं? अहं ते शक्यच नव्हतं. मग क्लास–शिकवणी घरीच सुरू झाली. त्यावरोबर आमचा "सोलो" प्रोग्राम. पहिला मोठा कार्यक्रम म्हणजे सुंदरशी पेटी खरेदली गेली; खूपसे पैसे खर्चून! शिष्या कशीही असली तरी वाद्य मात्र चांगलं हवं.मग सुट्टीच्या दिवशी पेटीमास्तर येत आणि छानपैकी "आर्केस्टा" सुरूं होई. आजुबाजूला वावरणाऱ्या अनेक माणसाचे सप्त नव्हे तप्त सूर– इतरही अनेक तार–मंद्र! भांड्यांच्या आवाजातला जलतरंग. अशा पार्श्वभूमीवर अन् आमची कमाल मर्यादा अगदीच किमान असल्यामुळे, मास्तरांनी

पहिल्या दिवशी सांगितलेल्या "लंबोदर गिरीजा नंदना" नंतर सगळाच आनंद होता.

मग लागला वाचायचा नाद. घरात तशी पुस्तकं पुष्कळ होती; बंगाली, इंग्रजी कादंबऱ्या होत्या. मराठी तर होत्याच. "दुर्दैवी रंगू" आणि "वुमन इन् व्हाईट" चिकटून चिकटून बसलेल्या. शाळा सुटल्यावर घरी गेलं कीं गरम गरम काही चाऊ म्याऊं खात खात, एका हातात पुस्तक घेऊन वाचत बसावं, पण तेही जास्त वाचायचं नाही, लहान मुलीनी वाचून वाचून डोळे खराब होतात. डोळ्यांना प्लस-पॉइंटच्या चष्मा लागला की तेवढेच मार्क मायनस होतात, लग्नाच्या परीक्षेत. त्यामुळे जुन्या जमान्यातल्या आजीचा धोशा सारखा– वाचू नकोस. पण मग मी तिला म्हणायची "आजी, तुझ्या सरस्वतीच्या हातात पण पुस्तक आहेच की"! हळुहळू दिन प्रतिदिन वयाबरोबर अक्कल वाढू लागली. क्षितिजं विस्तीर्ण होऊ लागली. मूल्यं वाढू लागली. अन् मग जुन्या अर्थांचे नवीन शब्द जिभेवर घोळू लागले. त्याच लाटेवर छंदाची झाली "हॉबी!" तसंच म्हटलं तर "हॉबी" ह्या शब्दाचा वेबस्टर साहेबाच्या शब्दकोशातला अर्थ जरा वेगळाच आहे. ते म्हणतात "हॉबी" म्हणजे लहानखुरा पण दणकट घोडा किंवा तट्टू (पण अडेल नव्हे बरं का). एखाद्या दणकट घोड्यावर स्वार होऊन योद्धा कसा पराक्रम गाजवतो, तसंच एखाद्या विषयाला घट्ट पकडून त्याचा पाठपुरावा करायचा.

तेव्हा खरं म्हणजे या अर्थावरून तरी "हॉबीज्" च्या मागे न लागण्याचा शहाणपणा मी धरायला हवा होता. पण ते नाहीच. सगळ्यात सोपी वाटणारी हॉबी शोधण्याचाच छंद मग मी धरला. रेडिओवरली भाषणं ऐकून आणि सुंदर सुंदर देखण्या कव्हरांवरची सजलेली घरं पाहून गृहसजावटीचा प्रयत्न सुरू केला. कारण आता गृहिणीपदही प्राप्त झालं होतं. प्रयोग करायला हक्काची जागा होती. अर्थात् गृह-सजावटी ऐवजी "होम डेकोरेशन" म्हटलं की जास्त वजन येते त्या शब्दांना! सजावट म्हटलं की बनावटीची भावना येते. किंवा चैत्र गौरीची सजावट पायऱ्यापायऱ्यांची डोळ्यांसमोर उभी राहते. पण मूळ

मुद्दा होता सजावटी अगोदरच्या स्वच्छतेचा. अन् मग त्या स्वच्छते-मध्येच सगळी एनर्जी खर्च झाली. त्यानंतर काही काळ इतर छंद "आनंदाचे कंद" असलेले मागे लागले होते. त्यांचे अनेकविध छंद पुरविण्यात वेळ गेला. माझ्या मुलानं वयाच्या दहाव्या अकराव्या वर्षी पोस्टाची तिकीटं जमविण्याचा छंद सुरू केला. मला वाटतं ह्या सगळ्या छंदांना, निदान काहीना तरी,वयोमर्यादा असतात–कालमर्यादा असतात. पुष्कळसे छंद, आंब्याला आलेला खूपसा मोहर गळून पडावा, तसे तसे पुढे गळून पडतात, सुटून जातात. तर त्यावेळी आमच्या घराच्या खोल्या खोल्यांतून अनेक देशांचे "स्टँप्स्" मारलेले होते. एकदा मी विचार केला. त्याला वेळ नाही तर आपणच बसावं चिकटवायला. पण वाटलं तेवढं सोपं नव्हतं ते काम, सगळ्या छंदाना पण पेशन्स लागतो, याची छोटीशी चूणूक त्यावेळी लागली. झालं एवढंच, इतस्ततः फिरणारे देश, पुस्तकात जाऊन बसले, एकमेकांच्या गळ्यात गळा घालून एखाद्या आंतरराष्ट्रीय परिषदेत वसावे तसे.

मग ठरवलं, आता काही दिवस मुक्त छंदात (!) घालवायचे, म्हणजे सगळ्या छंदापासून मुक्त व्हायचं. काही म्हणता काही करायचं नाही. मग कसं छान सुरू झालं. स्वैपाकपाणी– आला गेला– (म्हणजे आलाच जास्ती) गप्पा टप्पा. फार तर दुपारच्या वेळी दोनाचे चार; एक सुलट आणि बाकी सगळेच उलटे. अशा प्रकारच्या अनेक उलट–सुलट गप्पांनाही मुबलक वेळ आणि विषयही मिळे. तसं म्हटलं तर हाही एक प्रकारचा छंदच नव्हे का! अन् मग एक दिवस, एका उच्चभ्रू– पॉश पार्टीला जाण्याची वेळ आली. अर्थात् अशा पार्ट्या अटेंड् करणं ही "हॉबी" तर सगळ्यात ग्रेटच! पण तो त्या वेळे-पर्यंत मला नडला नव्हता. तर त्या दिवशीच्या त्या पार्टीतल्या एकूण एक महिला, नव्हे ज्या लेडीज् होत्या, त्यांच्यापैकी प्रत्येकीला कसली ना कसली तरी "हॉबी" होती अन् त्या त्यांच्या हॉबीज्ही हायक्लास होत्या.

कुणी फावल्या वेळात सोशल वर्क करीत होत्या. कुणी कलेची साधना करत होत्या. काहींच्या रंगवलेल्या बोटातून चित्रकला नुसती

ठिपकत होती. रेन्वा, गोया आदि कंपनी कालच त्यांच्या घरी येऊन गेली होती. कुणी पियानो शिकत होत्या. मी तर अजून तो पाहिलाही नव्हता. बहुतेकांनी जपानी पुष्परचनेचे सगळे "चॅप्टर्स" संपवले होते. माझ्या बाबतीत मात्र "अंगी वेष असावा बावळा। परि अंतरी नाना कळा" यापैकी पहिलंच अर्धुक खरं होतं. म्हटलं हे काही खरं नाही. आपणच कशा अशा बिनछंदाच्या. कुठलं तरी वाद्य शिकलं पाहिजे. वाद्य वाजवणारी व्यक्ति कशी ग्रेसफुल दिसते. त्यातूनही लहानपणी पेटीवर केलेली गणपतीची आळवणी आता काही तपानंतर तरी फळ-फळली तर पहावी.

एकदा केव्हांतरी, कुणीतरी, माझ्या यजमानांचं संगीत प्रेम लक्षात घेऊन, आणि ठेवून, मला दिलरुबा दिला होता. इतकी वर्षं तो "दिलरुबा हा या जिवाचा" जीवापलीकडे जपून ठेवला होता, मी माझ्याकडून! एक दिवस त्याची खोळ उघडून पाहिली. बऱ्याचशा तारा तुटल्या होत्या. खुंटचा न पिरगळल्यामुळे त्याची जागा सोडून लोंबत होत्या अन् बो चे केस तेलाच्या जाहिरातीतल्याप्रमाणे, तुटके-तुटके झाले होते. दिलरुब्याच्या मूळ किंमतीच्या दुप्पट खर्च करून मी तो नीट करून आणला. वाद्य आता देखणं दिसू लागलं. चांदणी चौकातला तो दुकानदार म्हणालादेखील, "आजकल बहोत लोक नही सीखते है यह इसराज। आप जरूर कोशिश करियेगा।" म्हटलं वा! छानंच झालं! मग पूसा रोडवरची मास्टरजीची "संगीत ॲकॅडमी" सुरू केली. विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मेळावा भरलेला असे. मास्टरजी सतारिये, त्यामुळे इतर सगळेच सतारवादक. एक-दोन वेळा मास्टर-जींनी म्हणून पाहिलं "रहने दीजिये इसराज। आपभी सितार सीखिये ना।" पण इथे तर शिकण्यापेक्षा इसराज, म्हणजे दिलरुब्यावर, केलेला खर्च सार्थकी लावायचा होता.

तेव्हा सुरुवातीचे काही महिने, परत परत ढिल्या पडणाऱ्या तारातून सरगम शोधण्यात गेले. जास्त वेळ प्रॅक्टिस केली की बोटं काचायची. अर्धा अधिक वेळ "बो"ला राळ लावण्यात जायचा. तो कितीही घासली तरी तारा मधूर वाजायच्या नाहीतच, कारण तो

पर्यंत त्या परत उतरलेल्या असायच्या, आमच्या चेहऱ्याप्रमाणं ! इतर विद्यार्थ्यांच्या अनेक "दा दिडदा"त आमची तार लागायची. मग नोटेशन समोर ठेवून, त्यातले सरगम, आमची बोटं आणि इसराज मधून निघणारे सूर यांचा त्रिवेणी संगम होईस्तो क्लासची वेळ संपत आलेली असायची. मग दुसऱ्या दिवशी, तेच "नोटेशन" आणि तीच "रिपिटिशन्". या करता मला पाश्चात्य पद्धती आवडते संगीताची ! नोटेशन पाह्यचं अन् वाजवायचं ! अर्थात् मला संगीतातली भैरवी लवकरच वाजवावी लागली.

नंतरचा काळ अर्थातच विश्रांतीचा ! उत्साहाची लाट आता ओहटीकडे लागली होती. एक दिवस माझ्याच पठडीतल्या एका मैत्रिणीकडे गेले होते. तर तिच्या उत्साहाला नुसतं उधाण आलं होतं. ती नुकतीच कुलूव्हॅलीत असलेल्या रोअरीच् आणि देविकाराणीच्या निवासस्थानीं गेली होती; अन् तिथली त्यांची काही पेंटिंग्ज् तिनं पाहिली होती. तिच्या मुखातून विशेषणं, एकावर एक, भारावल्या-सारखी वाहेर पडत होती. Simply marvellous, heavenly. त्या तिच्या प्रतिक्रियेबद्दल मला आश्चर्य वाटलं नाहीच. दिल्लीला असतांना, एकदां मी एम्पायर स्टोअर्समध्ये गेले होते; कॅनॉटप्लेसमध्ये असलेल्या. तिथे आले होते देविकाराणी आणि रोअरीच्. ती कलामूर्ति अन् कलामर्हषि 'याच देही याच डोळा' पाहिल्या होत्या. त्यानंतर लगेच रोअरीचची, आमच्या 'लिनलिथगो' लायब्ररीत असलेली, हिमालयीन् निसर्गचित्रे पाहिली होती. जणु प्रत्यक्ष हिमशिखरे तिथे उभी होती, कॅनव्हासच्या आधारे. त्या शिखरावरचं सोनेरी ऊन, नक्कीच कुठल्याही रंगाच्या ट्यूबमधून निघालं नसणार !

आणि त्या अविस्मरणीय कलाकृति पाहून, माझी ती मैत्रिण म्हणत होती "मी आता स्कूल ऑफ आर्ट जॉईन करणार ! तूही चल मला कंपनी म्हणून." तिचं हे वक्तव्य ऐकून थाडकन् जमिनीवर आपटले. तिच्या त्या निश्चयापासून तिला परावृत्त करण्याचा मी किती तरी वेळा प्रयत्न केला. पण छे ! कॅनव्हासवर वाळून गेलेल्या तैल-

रंगाप्रमाणं तिच्या मनांत, चित्रकला शिकण्याची कल्पना, चिकटून बसली होती. शेवटी म्हटलं "ठीक आहे, पण प्रथम आपण एखादा क्लास जॉईन करू. मग आर्ट स्कूलचं बघू." आमच्या "लिमिटेड कंपनी"नं एका चित्रकलेच्या वर्गात नाव घातलं. नाही तरी "क्लासेस जॉईन" करण्याबद्दल मी म्हणजे एक "क्लासिकल" उदाहरण होतेच. यथावकाश पेंटिंगचं सगळं सामान आणलं गेलं. ट्यूबमध्ये रंग होते पण हातात नैपुण्य नव्हतं. तेव्हा माझी ती चित्रकारी– त्याचे रंग कागदावर, कॅनव्हासवर उतरले, पण टिकले नाहीत. ते टिकणारे नव्हतेच. बोटावरही राहिले नाहीत कारण बोटातच नव्हते. बर्फ कितीही गोळा केला तरी त्याचा हिमालय होत नाही.

ते सूर, ते रंग, ती जाण मुळातच हवी. पण माझे हे सगळे छंद, ग्लासभर पाण्यात, चिमूटभर फ्रूटसाल्ट टाकून आलेल्या फेसासारखे, फेसाइतकेच, क्षणिक असत. अशावेळी शेवटी राहते ती फक्त खारट–तुरट चव–फेस ओसरल्यावरची. क्षणिक उत्साह म्हणजे कुवत नव्हे हे कधी जाणवलंच नाही. त्यानंतर अनेक छंद आले आणि गेले. मध्यंतरी चिंध्याच्या वस्तु पाहून चिंध्या गोळा करायला सुरुवात केली. पण "आता चिंध्याचा गालिचा होण्याऐवजी गालिच्याच्या चिंध्या होणार बरं कारे राजू" असे दबके उद्‌गार ऐकू येऊ लागले. नवीन ऋतुप्रमाणे माझा नवीन छंद सुरू झाला की "घेई छंद–खर्च परि बेबंद" असं संगीत सुरू व्हायचं. कारण माझ्या कुठल्याही छंदावर अनिर्बंध टीका करणं हा इतरांचा विनखर्ची छंद होता. शिवणकाम, बागकाम सगळं झालं. पण मातीचे कण हाताला लागले तरच सुगंधाचे क्षण मिळू शकतात. शेवटी छंद लावून घेणं एवढाच छंद उरला.

तेव्हा आता कुठल्याही छंदाच्या फंदात पडायचं नाही असं ठरवलं आहे. मात्र या छांदिष्टपणाचा एकच फायदा झाला आहे. कुठल्याही "पॉश" पार्टीत, मी आता कुठल्याही विषयावर बेधडक बोलू शकते. एकेकाळी मीही पं. रविशंकरांच्या शिष्यांच्या हाताखाली

शिकत होते, असले वाक्य, फारसा खोटेपणा पदरी न घेता, हळूच सोडून देता येते. संभाषणाच्या ओघात चित्रकलेच्या क्षेत्रातली मोठी मोठी नावं मी विष्णु सहस्रनामाप्रमाणं, सहज घेऊ शकते, पण मग असंही वाटतं, ह्या छंदिष्टपणात आपल्या हाती फारसं काही लागलं नसलं तरी दुसऱ्याच्या परिश्रमांची, कलागुणांची जाण आपल्याला ठेवता आली तरी पुष्कळ झालं. आणि हे सगळे उद्योग करताना माझ्याही हाती चार क्षण आनंदाचे लागले, हे काय कमी झालं!

* *

पाऊलखुणा

आभार–एक मानणे !

अथवा न मानणं पण ! नाही तरी पुष्कळ गोष्टी या आपल्या मानण्यावरच अवलंबून असतात नाही का ! आपआपसातली नाती–गोती, प्रेमभावना, अनेकविध संबंध हे सगळं शेवटी मानण्यावरच असतं ना ! हिंदीत एक म्हण आहे, " मान न मान, मै तेरा मेहमान" अशी जबरदस्ती आपण काही करू शकत नाही.

तर तसंच हे आभार मानण्याचं–समजा, नाहीच मानले आभार आम्ही कुणाचे तर ! केलं एवढंसं तर काय मोठंसं ओझं उचललं ! आम्हाला नाही बाई हे असले परदेशाचे रीतिरिवाज पटत– फार 'फॉर्मल' वाटतं नाही का ! (फक्त परदेशच्या 'इंपोर्टेड' वस्तू मात्र चालतात.)

'थँक्स अ लॉट'–'थँक्यू व्हेरी मच्.' आपण आपल्या रोजच्या जीवनक्रमात हा शब्दप्रयोग कितपत वापरतो, किती अर्थपूर्णतेनं वापरतो? कधी काळी परदेश गमनाची संधी मिळाली तर मग मात्र हे आभाराचं ओझं पदोपदी सांभाळत फिरावं लागतं. क्रिसमसच्या दिवसात त्यांचा सांताक्लॉज, जसा पाठीवर भलंमोठं गाठोडं घेऊन खेळण्याचं वाटप करीत असतो, तसंच या आभाराचं तिकडे चाललेलं असतं.

आपल्या जिभेला नसतं तितकंसं वळण. पण इतर नव्या पदार्थाची चव जशी तिला लागते, तसंच या आभाराचं पण आहे. तथापि, परदेशातून परतताना कस्टमच्या कटकटीतून बाहेर पडलो की ही

सवय सोडून येऊ नये ! कदाचित् तिकडे हे आभाराचं वाटप जरा जास्ती प्रमाणात करत असतील. पण कोणी थँक्स म्हटलं की त्यावरही लगेच उत्तर येईल– "यू आर वेलकम्." हे उत्तर वा प्रतिसाद म्हणा, मला फार आवडतो. 'नो मॅन्शन' पेक्षा. कारण कुठल्याही गोष्टीला, कृतीला, प्रतिसाद कसा येतो हेही तितकच महत्त्वाचं असतं.

आम्ही तुमच्याकरता जे काय अल्पस्वल्प केलं, त्याची तुम्हीही दखल घेतलीत, ते प्रेमपूर्वक ग्रहण केलंत ! आमची अशीच तयारी आहे तुमच्यासाठी काहीही करण्याची ! मला वाटतं हे आभार प्रदर्शन (प्रदर्शन या शब्दाला एक जरासा हलकासा अर्थ चिकटला गेला आहे. पण प्रकर्षेण दर्शयति–वैशिष्ट्यपूर्वक जे दाखवलं जातं ते) हा नुसता उपचार नसावा. तो नाहीही ! तर ती एक मनोधारणा आहे. एक संस्कृति आहे. त्याच्यामागे माणुसकीचं, गुणग्राहकतेचं एक मनोरम दर्शन आहे. पण आपण म्हणतो, तोंडदेखले काय आभार मानायचे, कौतुक करायचं. मनातल्या मनात आम्हाला वाटतं ना खूप त्यांच्याबद्दल !

मनातल्या मनातलं, आपलं आपल्याला तरी कुठं खरं खरं कळत असतं. मग आपल्या मनातलं दुसऱ्यापर्यंत नको का जायला ! आणि त्या भावना पोहोचायला शब्दांची मदत तर हवीच. पण तरीही हे नुसते शब्द नकोत. शिंपल्यात मोती असेपर्यंतच त्या शिंपल्याना किंमत. रिकामे शिंपले कितीही चकचकीत दिसत असले तरी नगाच्या लेखी त्याची किंमत शून्यच. धन्यतेचे, आभाराचे सूर मनापासून निघाले तरच त्यात गोडी. मनाला वाटलेल्या खुषीमुळं सहजस्फूर्त येणारं हास्य आणि पब्लिकपणाचा मुखवटा लावल्यावर ओढून ताणून चिकटवलेलं रबरी हास्य.

या धन्यवादात–आभारात, दुसऱ्याबद्दलची गुणग्राहकता असते; असावी; म्हणूनच त्या त्या व्यक्तीबद्दल कौतुक व्यक्त करण्याची बुद्धि असते. म्हणजे काय, की नुसतं एक "थँक्यू" कुणाकडे तरी फेकून, आभाराची अर्पण पत्रिका दिली जात नाही. जशा मनोवृत्तीत सूक्ष्म तरल छटा हव्यात, तशा त्या वागण्यात हव्यात. हळदीकुंकवाच्या

वेळी फसक् फसक् करून जसं गुलाब पाणी उडवलं जातं, तसं आभाराचं नको, असं गुलाबपाणी कुठंही सांडतं. तशा प्रकारच्या आभाराच्या उधळपट्टीला अर्थ नाही, उलट ती व्यर्थ जाते. त्या उलट ही कृतज्ञताबुद्धि, हाताला हळूच अत्तर लावावं, तशी हळुवारपणे दाखवायची असते; तरच तिचा सौरभ जास्त वेळ टिकतो; ती जाणीव मनांत खूप वेळ घर करून राहते.

आयुष्य, खरंतर अशा हळुवार वृत्तीनं "अति हळुवारपणे चित्ता" जगायचं असतं. माझी एक मैत्रिण आहे. स्वतः देखणी, रूपानं, मनानं आणि कृतीनं पण. रूपाचं देखणेपण दिसतं. मनाचं सहजी दिसत नाही. पण ते कृतीनं दाखवता येतं किंवा कृतीतून सहजगत्या प्रगट होतं. ही माझी मैत्रिण स्वतः स्वयंपाकात सुप्रण आहे; पण जेवायला आली की मनापासून जेवेल. स्वयंपाक छान झाला आहे, असं आवर्जून म्हणेल. विशेष आवडलेल्या पदार्थाची कृति विचारेल–हे सगळे आभाराचे प्रकार नाहीत का! मनापासून दिलेली दाद म्हणजेच तुम्ही केलेल्याची पावती. दुसरी माझी सखी अशीच. कधी एखादी वस्तु दिली की "ए, मला अगदी हेच हवं होत हं" अशी वाखाणणी मनापासून करील. तिच्या घरात सुबत्ता अमाप नांदते आहे, अन् त्याच-बरोबर मनात सहृदयता पण!

त्याच्या बरोबर उलट असलेले अगदी असली नमुने पण मिळतात. 'कसं काय वाटलं गं मी दिलेलं टेबलक्लॉथ! मी स्वतः मुद्दाम तुझ्या-करता भरलंय!" "नाही बाई अजून पाहिलीच नाहीत तो सगळी पुडकी उघडून. अग, किती म्हणून उघडायची! ढीग लागले आहेत नुसते आहेरांचे. वेळ आहे कुणाला पाह्यला." हे खरं जरी असलं तरी दुसऱ्या पद्धतीनं सांगता येतं- अन् या सगळ्यावर कडी म्हणजे "अग, मी सुद्धा पुष्कळ केल्याहेत असल्या वस्तु क्लासमध्ये जात होते तेव्हा." म्हणजे दिलेल्या गोष्टीबद्दल आपुलकी, साधे आभार तर नाहीतच पण चक्क उदासीनता तुच्छ बुद्धीची नव्हे काय! म्हणजे आभा राचा भारच वाटतो त्यांना!

आपल्याला मिळालेल्या, किती गोष्टींची, केलेल्या किती कृत्यांची अपूर्वाईनं दखल घेतली जाते. आहेराचंच बघाना ! केवढ्याचा आहेर आला आहे, तेवढ्याचा परत करणं या पलिकडे त्या त्या वस्तूचं गुण-ग्राहकत्व केलं जातं का ! लग्न समारंभांतही आहेर स्वीकारला जातो, तो सुद्धा किती यांत्रिकपणे ! क्यूत माणसं उभी असतात, हातात लहान मोठी रंगीबेरंगी पुडकी घेऊन. ती जशा भावनेनं दिली जातात, तितक्याच सहजतेने स्वीकारली जातात. अशा वेळी वाटतं तोंडदेखलं का होईना कोणी म्हाणवं, " ओ हाऊ नाइस ! " कुठलंही देणं स्वीकृत करायचं असतं. आपलसं करावयाचं असतं. ही आपुलकीची भावना आली की कृतज्ञता, आभार मागोमाग येतात.

आता, या पत्राबद्दलची प्रत्येकाची प्रतिक्रिया वेगवेगळी होईल, पण निदान मला तरी आवडलं हे पत्र. ते आहे माझ्या मैत्रिणीच्या मुलीचं-आईला लिहिलेल्या त्या पत्रात तिनं शेवटी चक्क लिहिलंय् " थँक्यू डिअर." खरं तर आपण मातृऋण मानत असतो; निदान शिकवण तरी तशीच आहे. " मातृ पितृऋण " वगैरे मानण्याची म्हणजे पुन्हा हे " मानणं" आलंच. आणि तसं ते मानलं तर त्याची भरपाई नव्हे पण जाणीव हवीच. इथं तर कन्यकेने आभारच मानले आहेत; मातेला प्रिय समजून ! आम्हाला लहानपणी कविता होती शाळेत. " थोर तुझे उपकार आई– वदत विनोदे हासत " वगैरे.

पण या पत्रात मुलगी लिहिते " तुझ्या पत्राचं लांबलेलं–लांबणीवर टाकावं लागलेलं उत्तर द्यायला आजच, रात्रीच्या या शांतवेळी वेळ मिळाला आहे "– तान्हुल्या लेकीमुळं आणि इतर व्यापामुळं दिवस लहान होतो आहे. श्रांत देहानं अन् आसुसल्या मनानं, ती हे उत्तर लिहित असते. अन् ते लिहितां लिहितां तिला जाणवतं, तिच्या आईनं पण, असंच धावत्या, पळत्या क्षणांना पकडून, तिची काळजी, तिचं वात्सल्य, शब्दबद्ध केलं असणार. मग अनेक जाणीवा, मुलीसमोर उकलत जातात. म.तृत्वाची खरी कल्पना स्वतः माता बनल्यावरच आली तर येते. जीवनाची अत्यल्प झलक साकारून जाते. मनांतल्या भावना अंतःस्फूर्तीनं कागदावर रेखल्या जातात " थँक्यू डिअर "–

त्या उलट माणूस किती स्वार्थी असू शकतो, याचं ढळढळीत उदाहरण म्हणजे दुसऱ्या एका मैत्रिणीनं– आपल्या स्वतःचा अनुभव म्हणून सांगितलेला. रात्रीचे नऊ वाजले होते. ही तिच्या घरी आलेल्या मैत्रिणीला, रिक्षा पाहून द्यायला अन् रस्त्यापर्यंत सोडायला म्हणून, आपल्या बिल्डिंगच्या दारापर्यंत गेली. मैत्रिण निघून गेली आणि दारात दुसरी रिक्षा शिरलेली दिसली. त्यातून एक तरुण जोडपं खाली उतरलं. त्या तरुणीच्या कडेवर एक सहा सात महिन्यांचं मूल आणि तोंडावर थकल्याचा भाव. दूरच्या प्रवासाहून आलेले दिसत होते. ज्यांच्याकडे ते लोक पाहुणे म्हणून आलेले, ती मंडळी, ते घर सोडून गेलेली. कुठं गेली केव्हा गेली, यांच्याबद्दल आजुबाजूच्या लोकांना थांगपत्ता नाही.

रिक्षात सामान, मनात काळजी, रात्री नऊ वाजता, या शहरात आपल्या नातलगांचा पत्ता काढायचा कसा ! माझ्या मैत्रिणीने त्यांना पाणी वगैरे विचारलं, त्यावर त्या लोकांनी विचारलं, आपल्याकडे फोन आहे का ! मुंबईला आमचे नातलग आहेत, त्याना फोन लावून, इथल्या लोकांची माहिती विचारू कां ! क्षणभरच विचार करून, त्यांची ती दयनीय स्थिति पाहून माझ्या मैत्रिणीनं, त्या अनोळखी जोडप्याला घरात घेतलं. एस्. टी. डी. करू दिला. त्या फोनवरून त्याना त्यांच्या नातलगाचा ठाव ठिकाणा मिळाला. ओझं उतरून, हलक्या झालेल्या मनाने, ते जोडपं आभार मानून अन् पैसे पाठवतो असं सांगून निघून गेले.

पैसे अजून येताहेत ! पण ज्यांच्या ओळखीखातर, तिनं आपली खास दीडतासाची झोप गमावली, त्यांच्याकडून मात्र चकार शब्दात विचारणा नाही मग आभाराची वात कुठली ! पुन्हा तिला वाटेल का अशी कुणाला मदत करावीशी ? मागं एक अशीच गोष्ट वाचली होती. संकटात ऐन वेळी मदतीचा हात मिळालेला एकजण कृतज्ञतापूर्वक आपल्या उपकारकर्त्याला विचारतो "तुम्ही दिलेल्या या अनमोल मदतीबद्दल, मी तुमचे आभार कसे मानू !" उपकारकर्ता उत्तरतो, "मी दिलेल्या या मदतीची जाणीव ठेवून, तूही असाच दुसऱ्यांना मदत करत जा. तेच आभार मला मनापासून दिलेस असं वाटेल."

म्हणजे आभार ही पटकन् मानून संपवायची आणि नंतर चटकन् विसरून जायची गोष्ट नसते, नसावी. किंबहुना, अशा प्रकारची ही आभाराची साखळी, हे लेणं, ही प्रवृत्ती वाढायला हवी. आम्हा बायकांत एक पद्धत आहे, कुणाकडून जिन्नस घालून आलेलं भांडं तसंच रिकामं परत करायचं नाही. चिमूटभर साखर का होईना, घातलीच पाहिजे. हा एक आभाराचाच प्रकार, एक भाग झाला नाही का! मनाचं हे भांडं हे दुसऱ्यानं आपल्यासाठी केलेल्या घेतलेल्या कष्टासाठी, प्रेमानं जाणीवपूर्वक, कृतज्ञतेनं भरून ठेवावं, हेच नाही का दर्शवत! एकदा तर मी पाठवलेल्या मिठाईच्या भांड्यात, पांढऱ्या शुभ्र मोगऱ्याच्या कळ्या परत आल्या होत्या. झाकण उघडताच सगळं वातावरण सुगंधानं भरून गेलं. अशी निर्मल देखणी दाद, कुठल्याही गोष्टीला मिळाली नसेल. आपल्या आभाराची जाणीवही अशीच रसिकतेनं, नाजूकपणं द्यायला हवी.

पूर्वी दिल्लीत राहात असताना, आजूबाजूची लहान लहान मुलं सुद्धा हातावर काही गोड धोड ठेवलं की चटकन् "थँक्यू! आँटीजी" म्हणायची. मला ते कानाला कसंतरी अन् कृत्रिम वाटे. हे काय उठल्या सुटल्या 'नमस्ते आँटीजी! थँक्यू आँटीजी!" पण मग असंही वाटतं, हे सगळं शाब्दिक खरं, तरी काही काही संस्कार हळूहळू अंगात भिनत जातात. हवं तर ते शब्द घेऊ नयेत पण त्यातला अर्थ तरी हवा. पूर्वी पद्धत असे, जेवल्यानंतर म्हणायची "अन्नदाता! सुखी भव! अन्नदात्याचे कल्याण होवो" मिळालेल्या सुग्रास अन्नाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं ही पण मनपसंत पावतीच नव्हे काय! "ओ:! थँक्यू फार अ लव्हली लंच!" या सारखीच.

"यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वया अनुपास्यानि"– या उपदेशाप्रमाणे जिथं जे चांगलं असेल, तेच तेवढं घ्यावं, नाही कां! पूर्वी कोऱ्या कोऱ्या साडीची घडी मोडली, की देवाला, घरातल्या मोठ्यांना नमस्कार व्हायचा. ती काही देणगीची पावती नव्हती; जाण होती दिल्या घेतल्याची. आयुष्यात ही अशी जाण असणं, कुठल्याही गोष्टीची,

हेच महत्त्वाचं. कारण आयुष्य ही एक सतत चालणारी देवाण–घेवाण आहे.

पुष्कळदा वघा, घाट वगैरे असतील, रस्ता चांगला नसेल त्या ठिकाणी तेवढा तो प्रवास संपल्याच्या ठिकाणी 'धन्यवाद', 'आभारी आहोत' वगैरे पाटच्या असतात. आपण आपले स्वतःचेच प्राण सुरक्षित ठेवल्याबद्दलचे फक्त हे आभार नसतात! रस्ता आपल्या इतकाच दुसऱ्याचा आहे हे लक्षात घेतलं की तुमच्या सुरक्षितेबरोबरच इतरांची पण साधली जाते. जीवन तुमचं असलं तरी सहजीवनातच जगावं लागतं. प्रत्येक क्षणी प्रत्येक कृतीत दुसऱ्याचं सहकार्य हवंच असतं. जिवंतपणी तर हवंच, पण नंतरही दुसऱ्यांच्या मदतीशिवाय गति नाही. 'सहवीर्यं करवावहै', त्या सहकार्याची जाणीव हीच आभाराची सुरुवात.

फक्त एवढंच की दुसऱ्याच्या, केल्या दिल्या गोष्टींची आपण जाणीव ठेवावी, आपण मात्र जाणीव करून देऊ नये. कारण तुम्ही बघाल, आयुष्यात ही जाणीवच कमी पडते. पण तरीही ती इतरांनी करून दिलेली आवडत नाही कुणाला! पण म्हणूनच आयुष्यातल्या लहान मोठ्या बाबीतली खरी महत्ता, त्या मागचा खरा अर्थ ग्रहण करण्याची पात्रता, कुवतही असायला पाहिजे. आणि ती आयुष्य जगताजगता यायला हवी. म्हणजे मग या सगळ्या जीवनाबद्दलच कृतज्ञता वाटून जाते. एखाद्या गायिकेचे भरदार सूर असंही ऐकवून जातात, "शुक्रिया अदा है। ऐ जिन्दगी जो दर्द तूने दिया". इतकी समतोल विचार धारणा बनायला जीवनाचा– आभाराचा खरा अर्थ कळायला वेळ लागेल. पण मग निदान आभार हे एक 'मानणं' न राहता आपल्या कृतज्ञता बुद्धीचा, जाणिकतेचा, रसिकतेचा, अव्याज, सहजस्फूर्त भावपूर्ण उद्रेक असेल.

"अँड मी बिसीच दी, गिव्ह अस् दॅट ड्यू सेन्स ऑफ दाय् मर्सीज् दॅट अवर हार्टस् मे बी थँकफुल."

* *

पाळखुणा

कॅमकांठची संध्याकाळ

'Music, when soft voices die
Vibrates, in the memory'

त्या दिवशी, पावसाला खळ नाही अन् सूर्याला वेळ नाही अशी स्थिती होती. त्यातच कंटाळवाणी दुपार संध्याकाळच्या बाजूला झुकू लागलेली. अशातच टपकन् पत्र येऊन पडलं, दाराच्या रेषेसारख्या फटीतून, डोळ्यातून एकच थेंब टपकावा तसंच. मनावरचा अशांततेचा तवंग जरासा बाजूला होतो. पत्रावर छाप परदेशाचा. तिकीटावर कळे न कळे मंद हास्य करणारी राणी. म्हणजे इंग्लंडचं पत्र! माझ्या नावाचं– कुणाचं बरं! डॉरोथी हॉदर्डचं. गेल्या वर्षी याच सुमारास, तिच्या घरी गेलो होतो, अशाच एका पावसाळी संध्याकाळी. त्या भेटीची आठवण ठेवून परत आग्रहानं तिनं बोलावलं होतं. अगदी सोपंच किनई! काशीला जाण्याइतकी विलायत सोपी झाली असली तरी स्वस्त मात्र मुळीच नाहीये.

पण तिच्या पत्रातला जिव्हाळा मनाला सुखवून गेला. सुरात लावलेल्या तारा कुठल्याहि वाद्याच्या असोत, एकरूप होऊन निनादतात; तसंच आहे हे संवेदनाशील मनाचं. संगीताचे सूर जसे नंतरहि घुमत असतात, तसंच काही काही आठवणींचं असतं. योगायोगानं काही सहयोग जमतात, देशकालातीत, अनोखा आनंद मिळवून देतात. तर तसे, ह्या पत्राच्या ओळी ओळीतून, त्या संध्याकाळच्या स्मृति ओघळू

लागल्या. आपल्या मनाचं एक बरं आहे, बसल्या जागी अनंत योजनें फिरून येतं.

शांततेचीहि फार संवय असणं चांगलं नाही. आदल्या रात्री, लंडनच्या टॉटेनहॅम कोर्ट रस्त्यावरच्या ट्रॅफिकमुळं रात्रभर झोप नव्हती. दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो तर इंग्लंडमधलं ख्यातनाम वातावरण. हवा ढगाळ पावसाळी. सकाळी उठून प्रथम म्हणायचं म्हणे, Good Morning अन् त्या श्वासात पुढची टीकाटिप्पणी, Oh, what a wretched morning! पण त्याच हवेत ऊनपावसाचा खेळहि दिसतो. व्हिक्टोरिया स्टेशनपासून एकच्या सुमारास केंब्रिजची बस घेतली; अन् अडीच पावणेतीन तासांचा मोठा सुखद प्रवास सुरू झाला. दोन्ही बाजूचा प्रदेश इतका आखीवरेखीव–इतका मनोरम, अनेक कवीनी आपल्या शब्दात बद्ध केलेला...टर्नरसारख्या रंगाच्या जादुगारांनी कुंचल्यानी रंगबद्ध केलेला!

लांब लांब, अगदी क्षितिजाला टेकेपर्यंत पसरलेली गव्हाची शेतं, पिवळ्याधमक रंगाची, एकाच उंचीची, जणू आकाशाला पण आपल्यातला सोनसळी रंग देणारी. हिवाळ्यातल्या बर्फाची शीतशय्या मिळाल्यामुळं एकदम जोमानं फोफावणारी गव्हाची शेतं आणि इंग्लिश काव्यात ठायी ठायी आढळणारी गवताची कुरणं. अन् त्या गवतावर पोसलेले, धष्टपुष्ट, लाल रंगाचे देखण्या गाईंचे कळप. आसमंतात धूळ नसल्यामुळे सगळे रंग कसे लखलख दिसत होते. बसमधून जाताना, मधूनच दिसणारी ठेंगणीठुसकी सुबक घरं. त्यांच्या खिडक्यांना लावलेले नाजूक जाळीचे पांढरेशुभ्र कडक पडदे, लोभस दिसायचे. त्या घरासमोरची हातरुमालाएवढी लॉन्स...हिरवीगार, आखीव रेखीव कापलेली. जणू काय फुटपट्टीनं मापलेली. सुंदर स्वच्छ पांढरी फाटकं. गुलाब तर ठायी ठायी फुललेले. झर् झर् ही सगळी मोहक दृश्यं डोळ्यांसमोरून पळत होती. सुळसुळीत रस्त्यावरचा तो प्रवास पटकन् संपल्यासारखा वाटला, नव्हे संपलाच.

केंब्रिजच्या बस स्टँण्डवरून आम्ही आमच्या हॉटेलमध्ये गेलो. त्याचं नाव 'ब्लू बोअर'. अन् साहजिकच त्याच्या लंच–रूमचं नाव

होतं 'हंग्री बोअर!' हॉटेलमध्ये जाताच, सर जोसेफ हचिन्सनकडे जाण्याकरता म्हणून तयार झालो. त्या संध्याकाळचा तो सर जोसेफ यांच्याकडचा चहा दोन महिन्यापूर्वीपासून पत्रापत्री ठरला होता. त्यात चहाची वेळ साडेचार म्हणून दिली होती. 'ब्लू बोअर'च्या घड्याळात साडेचारचा ठोका पडतो न पडतो तोच दारात सर जोसेफ यांची गाडी उभी. गावातली सगळी घड्याळं बहुधा एकाच वेळी लावलेली असावीत. सुंदर चकचकीत पॉलिश केलेल्या त्या लाकडी जिन्यावरून मी खाली उतरत असता समोर एक गृहस्थ उभे, हॅट हातात, माफक, अभिवादनात्मक हास्य– 'मिसेस् जोशी, आय होप!' साडीवाली आणखी दुसरी कोण असणार? बरं झालं मी तयार होते! कालौघात इंग्रजाच्या ज्या अनेक गोष्टी शिल्लक आहेत अन् ज्या नेमक्या आपण घ्यायच्या विसरलो, त्यापैकी वक्तशीरपणा ही एक!

तर आता खऱ्याखुऱ्या लेडीकडं चहा प्यायला जायचं म्हणून मी दबकतच होते. म्हटलं आपलाहि पोशाख 'सूटेबल्' हवा. उगीच कुटे सुरकुत्या मोडायला नकोत, शिष्टाचाराच्या परीटघडी वस्त्राच्या! त्याबद्दल खूपसं ऐकलं वाचलेलं. आम्ही गेल्यागेल्याच चहा आला. आमचीं बहुधा वाटच पहात होते! तो संध्याकाळचा त्यांचा 'हाय् टी.' आमचा संध्याकाळचा, किंबहुना दुपारचा चहा म्हणजे पेटवलेला गॅस थंड व्हायच्या आत संपून जाणार. त्यांचा म्हणजे साग्रसंगीत. चहा लेडी हचिन्सननं स्वतःच आणला. पूर्वीचा लवाजमा बराचसा लुप्त झाला असावा. चहाचा खास इंग्रजी सरंजाम, अति नाजूक, काचेच्या पापुद्र्यापासूनच बनविले असावेत असे कप्स. अत्यंत सुरेख पण सूक्ष्म सुवास असणारा चहा. आसाममधला खास 'एक्स्पोर्ट' क्वॉलिटीचा 'टू लीव्हज् ॲंड अ बड' वाला होता काय! मस्तानीच्या नाजूक गळ्यांतून दिसणाऱ्या तांबूलरसाप्रमाणं चहाही त्या कपातून भासमान होत होता. पण तो तयार करतांना, त्या वृद्ध हाताना तेवढंही सहन होत नव्हतं. कपबश्या खळखळायला लागल्या. शेरभर तरी वजनाची ती चांदीची चहादाणी! मी तर नक्कीच एकाहाती उचलू शकले नसते. तरी पण पदर सावरीत मी उठलेच मदतीला. तर ती म्हणते

'य् सिट् अॅन्ड रिलॅक्स !' मी कसली रिलॅक्स होतेय. मला भीती कप फुटणार अशी !

मी पलीकडे पाहू लागले. गर्भरेशमी हिरव्या साडीसारखं झळाळतं लॉन वरंच दूरवर पसरलं होतं. अन् एखादी केसाची पांढरी शुभ्र बट उडून दूर जावी तशी ती कॅम नदीची रेषा दिसत होती, त्या हिरव्या लॉनला अडवण लावल्यासारखी. बोलण्याच्या नादात, मी 'उद्या मिसेस डॉरोथी हॉवर्डनं बोलावलं आहे.' म्हणताच लेडी हचिन्सननं आपल्या 'अॅरिस्टॉक्रॅटिक' कपाळावर अति सूक्ष्म आंठी पाडून, अन् आपला 'इंग्रजी थंडपणा' विसरून विचारलंच–'कधी लिहिलं होतंन् तिनं ? 'म्हटलं, साधारण तुमचं पत्र येण्याच्या सुमारासच. उद्याचा संबंध दिवस तिच्याबरोबरच आहे.' एका आठीच्या सोबतीला दुसरी आली ! मग मोठ्या आवडीनं मी तिच्या केकचे तुकडे खात आहे, असं पाहून खुषीचं हास्य ओठांवर रेंगाळू लागलं. आणि मी, न खाऊन सांगते कुणाला ! दुसरा उपायच नव्हता. त्या केक्स्वर अन् शाकाहारी सँडविचेसवरच मला सोमवारचा उपास सोडायचा होता ! पण मग मात्र गप्पा खुलू लागल्या. कॅम नदीची श्वेत रेषा अंधारात बिलीन झाली अन् विस्टेरिया वेलीच्या, एखाद्या छोट्याशा प्रपाताप्रमाणं खाली झुकणाऱ्या, पांढऱ्या फुलांच्या झुबक्यासमोर उभ्या असलेल्या त्या वृद्ध देखण्या जोडप्याचा आम्ही निरोप घेतला. इंग्लंडमधल्या जुन्या विश्वविद्यालयीन काळातलं ते प्रतीक होतं काय ! कांही का असेना, दृश्य मोठं लोभस होतं !

अन् दुसऱ्या दिवशी, सकाळपासून एकामागून एक ती केंब्रिजची कॉलेजेस पाहताना वर्डस्वर्थची कविता मनात घोळू लागली. किंग्ज कॉलेजच्या चॅपेलला उद्देशून त्यानं म्हटलं आहे.

'लाइक थॉट्स् हूज स्वीटनेस यील्डेथ प्रूफ दॅट दे वेअर बॉर्न फॉर इम्मॉर्ट्टॅलिटी.'

सकाळी दहा वाजता आपली कार घेऊन आलेले डॉ. हॉरेस आणि डॉरोथी हॉवर्ड असीम उत्साहानं केंब्रिजमधील कॉलेजेस दाखवत होते. इंग्लंडमध्ये कॉलेजेस म्हणजे विद्यार्थी जिथे राहतात, ती जागा.

सेंट जॉन्सच्या इमारतीसमोर आल्यावर डॉ. हॉवर्ड एका दूरवरच्या, दुसऱ्या मजल्यावरच्या खिडकीकडे बोट दाखवून म्हणाले 'युवर हजबंड स्टेड् देअर फॉर टू इअर्स.' अन् बोलता बोलता ते दोनअडीच तपापूर्वीच्या काळात शिरले आणि मग किंचित् वृद्ध आणि अति वृद्ध अशा त्या तरुणांचं 'आमची वेळ– आमचा काळ' यावर सुरस आणि न संपणारं संभाषण सुरू झालं! मध्येच सरळ संथ वाहणारी कॅम नदी दिसताच डॉ. हॉवर्डना 'पंटिंग'ची आठवण झाली. छोट्या छोट्या बोटीतून कॅममधून विहार करणं केंब्रिजवासियांची आवडती गोष्ट. त्या इवल्याशा कॅमचं केवढं ते कौतुक! पावसाळ्यात फुगणाऱ्या आपल्या पुण्याच्या मुठेनं तशा दोन कॅम्स मुठीत घेतल्या असत्या!

सातव्या हेन्रीची गुलाबी युद्धं आणि आठव्या हेन्रीचा गुलाबीपणा आणि त्या पार्श्वभूमीवर त्यांनी बांधलेली ती कॉलेजेस– पटांगणातून जाणारा दगडी रस्ता. त्यावेळी सुट्ट्या असल्यानं तशी शांततच होती मी म्हटलं, 'इथले रस्तेपण किती शांत शांत आहेत.' तर त्यावर हॉवर्ड म्हणतात 'सध्या सुट्ट्या आहेत म्हणून, नाही तर हल्लीची मुलं फार बडबड करतात. वेगानं सायकली हाकणं. आमच्या वेळी पूर्वी '.....' लगेच मला वाटलं, आमच्याच देशातलं कुणी बोलत आहे. किती समान असतात काही गोष्टी! काही वृत्ती!! त्यांच्या टीकाटिपणीबरोबर मी माझंही इंग्लिश इतिहासाचं ज्ञान दाखवीत होते. तर डॉरोथी म्हणाली 'तुला तर खूपच माहिती आहे'– म्हटलं 'होय आम्हाला शिकणं भागच होतं'– पण माझ्या या खवचट उद्गारावर ती नुसतीच हसली.

सौंदर्याचं अजीर्ण होत नाही. पण या दोन डोळ्यांनी, दोनच दिवसांत, अनेक शतकांचा इतिहास देखला. अनेक मैल पायपीट केलेली, कॅलिडोस्कोप पहावा तशी स्थिती झालेली. बावन-त्रेपनमध्ये पाहिलेली अनेक रंगीत पोस्टकार्ड आता प्रत्यक्ष डोळ्यासमोर उभी रहात होती. उभी रहाता रहाता झरकन् निघून जात होती. डॅफोडिल्सच्या फुलांनी भरलेली कॉलेजची अंगणं, आता सध्या नव्हती. त्यांचा मोसम संपून गेला होता. त्यामुळं वर्डस्वर्थची आवडती सोनेरी रंगाची ती फुलं

पाहण्याचं भाग्य लाभलं नाही, पण त्यांना चिरंतनत्व देणाऱ्या ओळी डोळ्यासमोर नाचून गेल्या. 'ॲन्ड देन माय हार्ट विथ प्लेझर फिल्स– ॲंड डान्सेस विथ् द डॅफोडिल्स !'

शेवटी अत्यंत तृप्त होऊन, अन् थकूनही, मी लॉनवरच्या एका ओलसरच बाकावर वसकण मारली, त्या दूरवरच्या ऐतिहासिक काळातून परिभ्रमण करून जणू थकल्यामुळे ! अन् मी बसताच, इतेका वेळ ताठ उभी असलेली डॉरोथी पण 'ओः आय् ॲम ऑल्सो टायर्ड' असं म्हणत बसली अन् पटकन् तिनं पायातले 'शूज' काढून टाकले. त्यातले दोन्ही गवतावर वाकडी तोंडं करून पडले. शेवटी आम्ही दोघीहि बाकावर पाय घेऊन आपआपले दुखणारे पाय चोळत बायकी गप्पा मारू लागलो. संधिवात कसा त्रास देतो याचं साग्रसंगीत तिचं वर्णन, मी माझ्या आवडत्या दुखण्यांचा किस्सा ऐकविला. रात्रीच्या डिनरचा 'मेन्यू' तिने सांगितला. त्यावर पसंती विचारली. या थकलेल्या बाईनं आमच्याकरतां रात्रीचं जेवण बनवायचं. आमच्या-बरोबर इतकं हिंडून. मला तर जेवणाची पण इच्छा नव्हती थकल्यामुळं !

पण त्या अगोदर दुपारचा लंच त्यांनीच युनिव्हर्सिटीच्या कॉम्बिनेशन हॉलमध्ये दिला. कॉम्बिनेशन हॉलमधला लंच म्हणजे मोठा मान समजला जातो म्हणे ! पूर्वी काही वर्षांपूर्वी या हॉलमध्ये तर नाहीच, पण कॉलेजेसमध्ये पण मुलींना, बायकांना परवानगी नव्हती. इंग्लंड तसं सनातनी वृत्तीचंच. आपल्या पूर्वापार गोष्टी अत्यंत हळू टाकणारं. कुठलंहि परिवर्तन हळू स्वीकारणारं. आपण असल्या लोकांना संस्कृति जपणारे म्हणून नावाजतो ! अन् आपल्याकडच्या लोकांना जुनाट म्हणून नावं ठेवतो. आता संध्याकाळी केंब्रिजमधले विद्यार्थी कॉलेजचा गाऊन न घालता बाहेर हिंडतात म्हणून जुने प्रोफेसर कुरकुरताना दिसलेच. युनिव्हर्सिटी असलेल्या गावाना बकालीपणा येऊ नये, त्याचं शैक्षणिक स्वरूप टिकून रहाव ही इच्छा.

तर पंचवीस तीस वर्षांपूर्वी बायकांची पायधूळ न झडलेल्या (पण असं म्हणणं चुकीचंच. एवढी कुठे आली आहे धूळ त्या शीत

प्रदेशात !) अथवा पदस्पर्श न झालेल्या कॉम्बिनेशन रूममध्ये आम्ही शिरलो. जागोजागी छोटी छोटी टेबलं ठेवलेली. एका बाजूला टेबलावर खाद्यपदार्थ मांडलेले. हवं ते घ्या, पैसे द्या व आरामात बसून खा. हे तुमचं खाणं आणि गप्पा मोठमोठ्या लोकांच्या 'कंपनीत' चाललेलं असतं. कारण आत शिरताच डाव्या बाजूला एक प्लॅटफॉर्म होता, त्याच्या वरच्या भिंतीवर अन् इतरत्र सेंट जॉन्स कॉलेजमध्ये होऊन गेलेल्या, अनेक प्रख्यात लोकांचे फोटो लावलेले होते. त्यापैकी आठवतात ते दोघेजण. डॉ. मार्शल हा गणितज्ञ, आणि डॉ. केन्स हा अर्थशास्त्रज्ञ. आमच्या हॉटेलच्या 'हंग्री बोअर' या जेवणघरातहि नामवंत केंब्रिजिअन्सचे पुतळे जागोजागी ठेवलेले होते. कॉलेजमध्ये असताना युनिव्हर्सिटीवरच्या लेखामुळे ज्यांची ओळख झाली तो सर बर्ट्रंड रसेल, तिथे भेटला. गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा जनक सर आयझॅक न्यूटन हा ट्रिनिटी कॉलेजचा विद्यार्थी. जेवणघरात पाऊल टाकताच, त्याचा पुतळा समोर असायचा.

परत आमच्या हॉटेलवर सोडता सोडता त्यांनी गावांतून आम्हाला फेरफटका करवलाच. पोस्टकार्डात पाहिलेला गिल्ड हॉल आणि मार्केट प्लेस करत सेन्ट जॉन्स कॉलेजच्या मागच्या बाजूला असलेल्या 'ब्रिज ऑफ साईज्'वर जाऊन उभे राहिलो आम्ही चौघे. आपल्या कॉलेजचा अभिमान त्या दोघांना परत परत ओढत होता; आणि डॉ. हॉवर्ड मोठ्या कौतुकानं त्या पुलावद्दल सांगू लागला. खरोखरीच त्या पुलावरून आजूबाजूचं दृश्य मोठं सुरेख दिसत होतं. त्या इवल्याशा कॅमवरचा इवलासा पूल हा 'सिंगल स्पॅन', एकाच कमानीवर बांधलेला आहे. असं म्हणतात, रोममध्ये पण अशाच प्रकारचा पूल असून, त्यावरून कैद्यांना फाशी देण्याकरता नेत असत; म्हणून त्याला म्हणत 'ब्रिज ऑफ साइज'. हाहि पूल तसाच म्हणून केंब्रिजच्या या पुलाचं नाव तेच पडलं.

संध्याकाळच्या जेवणाला येण्याचं पुनः पुनः आमंत्रण देऊन हॉवर्ड जोडपं परत गेलं. सकाळपासून त्यांच्या मोटारीच्या पेट्रोलचा मीच हिशेब करत होते. मनांतल्या मनांत ! आपल्या जुन्या विद्या-

र्थ्याच्या अन् त्याच्या पत्नीच्या अल्प वास्तव्यात, आपले पाहुणे म्हणून ास्तीत जास्त स्थळं दाखवण्याकरता त्या दोघांनी घेतलेले श्रम आणि केलेलं आदरातिथ्य–मी तर भारावून गेले. जरा वेळ विश्रांती घ्यावी म्हणून आम्ही 'ब्ल्यू बोअर 'मध्ये परत आलो. अन् एकदम वाटलं कुठल्या ऐतिहासिक काळात आलो की काय ! हाय कॉलर, लांब कोट, तंग विजारी, गुडघ्यापर्यंत आलेल्या आणि पांढऱ्या रिबन्स बांधलेल्या, असे पोशाख केलेले तरूण इकडे तिकडे फिरताना दिसले. कांही जेवणघरांत शिरत होते. मग कळलं काही लॉर्ड लोकांची पार्टी आहे. सोनेरी किंवा पांढरट केंस, गोरा वर्ण. मोठं देखणं दृश्य दिसत होतं, त्या एकंदर पार्टीचं. एलिझाबीथन काळातल्या सिनेमातला प्रसंग पाहतो आहोत असं वाटत होतं.

दुपारची विश्रांती आटोपून ताजंतवानं होऊन डॉ. हॉवर्डच्या घरी आलो. सायंकाळचं सुरेखसं झुळझुळतं ऊन समोरच्या हिरव्या लॉनवर पडलं होतं. लॉन्सची देखभाल करावी तर याच लोकांनी. घरातले उत्तमोत्तम गालीचे जसे सुरेख ठेवलेले, तसेच हे दारीचे ! त्या हिरवळीवर अनेक सुंदर फुलांनी वेलबुट्टी चितारली होतीच; पण मला सर्वात आवडलं ते, घराजवळचं, पण जरासं एका बाजूला असलेलं, उंचसं, डौलदारसं 'मॉकऑरेंज ब्लॉसम्'चं देखणं झाड. कुठंहि गेलं तरी प्रथम माझं लक्ष जातं फुलझाडाकडं ! नाव ऑरेंज ब्लॉसम् असलं तरी फुलं पांढरी होती. लॉनवरहि बरीच पडली होती. माझ्या नेहमीच्या सवयीनं मी काही फुलं उचलून घेताच डॉरोथी मोठ्या खुषीनं हसली. घराच्या नेहमीच्या बांधणीनुसार बैठकीच्या अन् जेवणाच्या खोलीला दोन बाजूंनी काचेच्या मोठमोठाल्या खिडक्या होत्या. मोठं जलरंगातलं चित्र लावलेलं असावं असं वाटत होतं बाहेरचं ते मोहक दृश्य पाहून.

सुंदरसं, उबदारसं घर. अत्यंत व्यवस्थित. मी जराशी विचकतच शिरले तर फर्रदिशी एक खुर्ची ओढून घेऊन डॉरोथी मला म्हणाली, 'ह्या खुर्चीवर बैस. ही माझ्या नवऱ्याची आहे.' ती मोठी आरामशीर असल्यानं त्यानं पटकावली आहे. मला बसवून, माझ्यासमोर तिनं काही

आल्बम्स टाकली. त्यात तिच्या मुलीचे, जावयाचे फोटो होते. नातनातू होते. मधूनमधून येऊन मला ती एकेकाची ओळख करून देत होती. मध्येच तिनं आम्हाला जेवायला हाक मारली. रात्रीचे नऊ वाजत होते तरी दिवस होताच. अत्यंत सुरेख शाकाहारी जेवण, मशूम्स, भाज्या आणि चीज असलेलं, 'आणखी थोडं घे ना' म्हणून डॉरोथी आग्रह करीत होती आणि आम्ही खात होतो.

मग सगळ्या प्लेटी भराभर उचलून म्हणाली 'आता काही धुवायचं नाही. खूप गप्पा मारायच्या.' मला मात्र वाटलं, उद्या सकाळी माझ्यासारखी ही काही मोलकरणीची वाट पाहणार नाहीये. स्वतःच धुणार आणि नवऱ्याला सांगणार बश्या पुसायला. किती तरी वेळा आम्ही 'जाऊ या,' म्हणत होतो अन् ती दोघं आम्हाला बसवून घेत होती. पावसाची बारीक बुरबुर सुरू झाली होती. आता अंधार पडला होता. आजुबाजूला कुठेहि आवाज नव्हता. त्या उबदार घरात आणि वातावरणात एकतानतेनं रंगून गप्पा मारीत होतो. आमचंच एक विश्व निर्माण झालं होतं. मध्येच डॉ. हॉवर्ड म्हणाले, 'पण आता हे सगळं, हा बगीचा, आम्हाला पाहणं फारसं जमत नाहीये. अन् खूपदा परवडत पण नाही. ही एकरच्या जवळपास असलेली जमीन, त्यातली ही फळांची झाडं, तुम्ही आता खाल्लीत ती भाजी, ही फुलबाग, हा खरं तर आमचा मोठाच आनंद आहे हे खरं. पण दिवसेंदिवस कठीण होतंय. हे सगळं विकून छोटासा फ्लॅट घेण्याचा विचार करतो आहोत.'

माझ्या डोळ्यासमोर, माझा पुण्याचा फ्लॅट अन् खिडकीखिडकीतून ठेवलेला बगीचा आला. सगळीच सुंदर स्वप्नं हळूहळू स्वल्प होत जाणार काय? मलाच वाईट वाटलं. घड्याळाचा काटा आता मध्य-रात्रीकडे झुकू लागला होता. वास्तूचं देखणेपण, निसर्गाचं हिरवेपण, माणसातलं लोभसपण अशा अनेक अनुभूतींनी मन कसं तुडुंब भरलं होतं. देश परका असला, मातीमातीत फरक असला तरी आकाश तेच असतं नाही का! मी दिलेली पांढरी काश्मीरी शाल पांघरून डॉरोथी दारात उभी होती. मला विस्टेरियाजवळ उभं असलेलं कालचं वृद्ध

जोडपं आठवलं. माझ्या स्मृतीत विस्टेरिया अन् मॉक ऑरेंजची फुलं एकत्र गुंफली गेली आहेत. या आठवणी अल्पकाळातल्या आहेत, पण काळाच्या लांबी-रुंदीवर आठवणीची तीव्रता-सखोलता अवलंबून नसतेच. म्हणून तर एका संध्याकाळी एकत्र घालवलेले हे काही क्षण म्हणजे जणु काय अनंत योजनं पसरलेल्या समुद्राच्या अल्याड पल्याड राहणाऱ्या आम्हा स्नेह्यांच्या आयुष्यातला 'ब्रिज ऑफ जॉईज्' च बनला आहे.

* *

पाऊलखुणा

वेळ – एक देणं, एक खाणं !

आता तुम्ही म्हणाल, वेळ म्हणजे काय, अशी वस्तू आहे, उचलली हातानं, आणि दिली कुणालाही ! (उचलली जीभ अन् लावली टाळ्याला या चालीवर ?) जीभ आपलीच असली तरी सदैव आपल्या ताब्यात असतेच असं नाही. तसंच तो म्हणजे काय खमंग–टमंग पदार्थ आहे, वाटेल तसा, वाटेल तेव्हा खायला ! पण बघा, विचार करा, सहज लक्षात येईल. या दोन्ही कृती आपण सततच करीत असतो.

किंवा एक गोष्ट तरी आपण अजाणता नेहमी करीत असतो, अन् ती म्हणजे वेळ खाणं ! अशा कितीतरी गोष्टी, दृश्यादृश्य, आपण खात असतो. अर्थात् त्या सगळ्याच मोठ्या चविष्ट असतात असं नाही. मोठ्यांची बोलणी तर अगदी लहानपणापासून आपण खात आलो आहोत, असली अनेक खाद्ये पचनी पाडीत आलो आहोत.

तर तसंच हे वेळ खाण्याचं, अर्थात् दुसऱ्याचाच ! दुसऱ्यांचा वेळ आणि पैसा, या दोन्ही, खर्च करायला फारच सोप्या. तर तसा हा वेळ आपण, आनंदानं, मोठ्या चविष्टपणानं, बरोबर अनेक तोंडीलावणी घेत आस्वादत असतो. काही काही वृक्षावर, परजीवी झाडं बांडगुळं (parasites) असतात ना; ती कशी, त्या झाडाचा जीवनरस शोषून घेतात आणि मजेत जगत असतात. तसंच या वेळखाऊ माणसांचं असतं. मागे काही वर्षांपूर्वी होते एकजण असेच. स्वत: अगदी

नेहमी रिकामे असत. ना उद्योग ना धंदा. कुठल्याहि वेळी यायचे अन् जेठा मारून बसायचे. 'अवेळ तरीही बोल कोकिळे' यावरहुकूम 'अवेळ तरीही येइ कावळचा' असे काव्य त्यांच्यावर केले होते. कावळचाप्रमाणे टोची मारण्याचा स्वभाव होता त्यांचा. आजूबाजूची माणसं भले कामात असोत. सभ्यतेच्या मर्यादा सांभाळून दिलेल्या सूचनांचा त्यांच्यावर परिणाम म्हणून होत नसे.

अशा रीतीनं अनेक ठिकाणी अनेक वेळा आपण आपला वेळ दुसऱ्यावर लादत असतो. पण असा खर्च करायला भरपूर वेळ असला तरी त्याची ज्या ठिकाणी जरूर असते, उपयोग होण्यासारखा असतो, तिथं तिथं आवश्यकतेप्रमाणं आपण वेळ देतो काय! तसंच जर म्हटलं तर दुसऱ्याला देण्यासारखं, अत्यंत अमोलिक, तरीही आपलंच असं असलेलं, दुसरं काय असतं–आपला वेळ, आपलं आयुष्य. अर्थात, त्यावरहि आपला पूर्णपणे ताबा आहे? अस म्हणता येतं का आपल्याला कीं हे आयुष्य माझं आहे, त्याचं मी हवं ते करीन– हा वेळ संपूर्णतः माझा आहे, त्याचा विनिमय, माझ्या मनास येईल त्याप्रमाणं मी करीन? पण जेवढं काही करता येणं शक्य असेल, तेही आपण यथा-योग्य करतोच असं नाही.

एका ठिकाणी म्हटलं आहे, 'यू स्पेंड अॅन् ईव्हनिंग विथ् सम पीपल्, विथ् अदर्स यू इन्व्हेस्ट इट्.' काही लोकांच्या संगतीत, एखादी संध्याकाळ तुम्ही नुसतो खर्च करता. काही काही जण असे असतात की त्यांच्याबरोबर घालवलेला क्षण न् क्षण सत्कारणी गुंतवल्यासारखा असतो, अगदी पैशासारखंच आहे हे! उधळलेला, किंवा विचार न करता खर्चिलेला पैसा, अन् योग्य विनिमय–गुंतवणूक केलेला पैसा!

खरं म्हणज वेळ ही गोष्ट इतकी महत्त्वाची, लवकर संपणारी, परत न मिळणारी आहे हे माहीत आहे आपल्याला. पण या वेळेचा विचार आपण वेळेवर करतो का? 'अब ना बनी तो फिर ना बनेगी। अवसर बार बार नहीं मिलता.' काही महाभाग असेही असतात, त्यांचा वेळ जाता जात नाही. अशांच्या भाग्याचा मला तर हेवाच वाटतो. उलट काही तर असे की अत्यंत 'बिझी'– त्यांना वेळच नसतो,

कशाही करता. पण आमच्यासारखे मध्येच असणारे काही लोक असतात. त्यांच्याचकरता या देण्या-घेण्याच्या गोष्टी !

एक-दोन महिन्यापूर्वीच्या 'रीडर्स डायजेस्ट'मध्ये एक छोटासा सुरेख लेख वाचला, विचार करायला लावणारा. गोष्टी रोजच्याच, आपल्या नेहमीच्या परिचयाच्या; नित्य घडणाऱ्या. एक अमेरिकन गृहिणी, सतराशे-साठ गृहकृत्यात दंग असलेली, नव्हे आकंठ बुडालेली. अनेक प्रकारची अनेक साधनं, उपकरणं हाताशी सज्ज असलेली. सकाळच्या न्याहरीची 'सिंकभर भांडी धुवत असताना, तिची २-२॥ वर्षाची छोटुकली तिच्या पायाशी लोंबकळते अन् म्हणते, 'आई, मला मांदीवर घेऊन दोल बाई दोलाची कल ना !' त्या पिटुकलीच्या तोंडात बोट अन् डोळ्यात अपेक्षा !

नेहमीप्रमाणंच तिच्या आईला, तेव्हा तर अगदी म्हणजे अगदीच वेळ नसतो. त्या क्षणांतर दिवसभराच्या कामाचा प्रचंड डोंगर उभा असतो. आई नेहमीप्रमाणंच म्हणते, 'बेटा, आता सध्या नाही ग वेळ ! एवढं हातातलं काम संपलं की मग–' पोरगी बिचारी दुसरा काहीतरी खेळ शोधते. ती इवलीशी पाठमोरी मूर्ती, आईचं नाही म्हणणं नेहमीचंच म्हणून वळलेली. मात्र आईचे कामातले, भरभर चालणारे हात एकदम थांबतात–मनात विचार मालिका सुरू होते. वाहतुकीचा एक नियम आहे– थांबा, पहा अन् पुढे जा. ती थांबते. अन् आपल्या आजुबाजूला पाहू लागते. तिला वाटतं तात्काल, जरूरीच्या गोष्टी आणि मौलिक गोष्टी (Pressing and precious) यातला फरक आपण कधी लक्षात घेतला आहे काय !

ती मुलीला परत बोलावते. थोड्या वेळ 'डोल बाई डोलाची। खाकेत बुट्टी बोरांची' असली बडबड गीतं होतात. थोड्या वेळातच, मुलगी खूष होऊन, उड्या मारीत निघून जाते. त्या आनंदात आईचे हात अन् डोकं पण भराभर कामं करू लागतं. तिच्या पुढची, न दिलेल्या वेळाची, न केलेल्या गोष्टींची यादी वाढत जाते. अन् उगीचच वेळ जाणाऱ्या बाबींची पण ! वेळेच्या बाबतीत, कुठल्या गोष्टींना

प्राधान्य द्यायचं; कुणाला, केव्हा, किती वेळ द्यायचा, हे सगळंच पथ्य पाळायला पाहिजे.

आठवून पाहा, आपणही पुष्कळदा म्हणतो, चल रे, काय उगीच वेळ खातोहेस–मला आत्ता मुळीच वेळ नाहीये ! वेळ हवा असेल, त्यावेळी तो नसतोच. वर उल्लेखलेल्या मातेप्रमाणे तो काढावाच लागतो. ज्याची त्याची देणी जशी द्यावी लागतात आयुष्यात, तसंच हे वेळचं देण आहे. कामं नेहमीच शिल्लक राहतात, वेळ संपतो, माणसं मात्र निघून जातात, त्यांची वेळ संपली की ! माझ्याच एका मैत्रिणीनं सांगितलेली गोष्ट–नवरा कुठं तरी कामाला म्हणून निघालेला. सकाळची वेळ, ही नेहमीप्रमाणं कामात. त्यानं काहीतरी विचारायला म्हणून दारापर्यंत बोलावलं–ती म्हणते, आत्ता गर्दीत आहे–तुम्ही जाऊन आल्यावर सांगते. तो जातो, पण परत येत नाही ! सांगणं तसंच उरतं–वेळ देण्यासारखं काहीच राहिलेलं नसतं.

त्या उलट, वेळेचा काटेकोरपणानं हिशेब ठेवणारी एक व्यक्ती आपल्या दिवसभराच्या कामाचं, अगदी शाळेतल्या तासाप्रमाणं, त्यांनी वेळापत्रक करून ठेवलेलं; अन् त्याचप्रमाणं सही न् सही वागायचं हा अट्टाहास. 'घटका गेली–पळे गेली' ही मोजदाद बरोबर असली तरी आपल्या कुठल्याही गोष्टीत–वागणुकीत, ताठरपणा असता कामा नये. मग गंमतच जाते सगळी जगण्यातली. आयुष्य नियमबद्ध असावं, पण बंदिस्त, जखडलेलं नसावं.

अगदी थोडा वेळ देऊनही, मिळवलेल्या आनंदाची ही गंमत बघा. मागे आम्ही कैरोला राहात असताना, आमच्या फ्लॅटसमोर एक इंजिनिअर कुटुंब राहात होतं–बरोबर समोरच्याच फ्लॅटमध्ये. चांगलं भलं मोठं कुटुंब होतं ते. एक मध्यमवयीन जाडजूड गृहस्थ, दोन बायका, अनेक मुलं–डब्यातले डबे असावेत तशी उतरत्या वयाची, तसं सगळंच देखणं, आनंदी. फक्त त्या दोन स्त्रियांमधली मोठी (त्या दोघी सवतो–सवती होत्या ही माझ्या मेडसर्व्हंटची बातमी) नेहमी खिन्न असायची. कुठं जाणं न येणं दिवसभर खपणं, खालमानेनं काम. पूर्वीच्या गोष्टीत असे, त्याप्रमाणे ती नावडती असावी.

एकदा आमच्या फ्लॅटकडे गजर गेली तिची–मी बाल्कनीत उभी होते. सहजच हसले पाहून. थोडा वेळ तिच्याकडून काहीच प्रतिसाद नव्हता. पण जराशानं तिच्या डोळ्यात कुठंतरी हसू चमकलं. दोन चार दिवसात ते तिच्या ओठावर उमटू लागलं. अन् मग ती कपडे झटकायला गॅलरीत आली की माझ्या साभिनय अन् दिव्य अरेबिक-मध्ये तिच्याशी गप्पा–किती ५।७ मिनिटं. बाहेरच्या जगाचा तेवढाच वारा तिला. माझ्या इतर मैत्रिणी मात्र म्हणायच्या, काय उगीच तुमचा मूक चित्रपट चाललाय गं ! गालिचा झटकतेस, तसं तिलाही झटकून टाक. काय मिळतं त्या असंबद्ध बडबडीतून !

त्यावेळेचा हिशेब आकडयात नव्हता. माणसं पण अशी झटकून टाकवत नाहीत, निदान मला तरी. माझ्या तिथल्या वास्तव्यातली ती दहा मिनिटं तिला देऊन टाकली होती. तिलाही ती हवी होती. इकडे परतताना, मी माझी भरलेली बॅग तिला दाखवली, तिचे डोळे भरून आले. नाईलच्या पाण्यावर सूर्य किरणं पडून ती चकाकावीत तसे तिचे डोळे, त्या अश्रूंमुळे वाटत होते. मी दिलेल्या वेळाची पावतीच हवी असली तर ती मिळाली, त्या नीलाक्षीच्या डोळ्यातून. सुंदर फुलाला फुलविण्याकरता दिलेला वेळ, हा उगीच गेलेला असतो काय ! फूल तर फुलतंच पण सौंदर्यनिर्मितीचा आनंद तुम्हाला नाही का मिळत ? दुसऱ्याला दिलेलं देणं, तुम्हाला सव्याज परत मिळत असतं.

वेळेचं बहुमोल देणं, दुसऱ्याला अनेक प्रकारे, आपण देऊ शकतो. एक उदाहरण म्हणजे माझ्या ओळखीची एक तरुण मुलगी आहे. शाळेत जाणारी दोन मुलं. इतर नेहमीचं घरकाम, पण सकाळचं घरकाम आटोपलं की रोज ठराविक वेळ, एका आंधळ्या मुलीला तिच्या अभ्यासातला भाग वाचून दाखवते. आपल्या स्वतःच्या वेळेचा इतका डोळस उपयोग दुसरा नसेल. पूर्वी संध्याकाळची दिवेलागणीची वेळ ही 'शुभंकरोति'ची म्हणून दिलेली असे. ती लक्ष्मीची वेळ. देवाची वेळ. लहानपणी खेळातसुद्धा आम्ही पहिला डाव देवाला देत असू. आता दुसऱ्याला डावलूनच आपण काय घेऊ शकतो, ही प्रवृत्ती!

तर ती संध्याकाळची वेळ. लहान मोठी मुलं एकत्र येत; हातपाय धुवून देवाला नमस्कार–पाढे–परवचा, स्तोत्रं होत. एक प्रकारची पवित्र वातावरणनिर्मिती होई. सगळे एकत्र येत. समूह गानाचं महत्त्व सगळ्यांनाच पटत आहे. मुलांना पूर्वी जो हा वेळ दिला जाई, निदान आम्हाला दिला–त्याचं स्मरण अजून आहे. त्या देवाची शिदोरी या वाटचालीवर पुरते आहे.

पण म्हणूनच कुणी आपला उगीचच वेळ खाल्ला, तर कसं बेचैन व्हायला होतं ! सकाळपासून, खपून खपून, कसा छान 'मेन्यू' मी तयार केला होता संध्याकाळी एका नवपरिणीत जोडप्याला मी फराळाला बोलावलं होतं. त्यांच्यावरोबर आणखी एक दोन जोडपी. माझं घरही सुरेखसं सजवलं. पदार्थांचा खमंग वास, फुलांचा नाजूक सुवास, कसं प्रसन्न वाटत होतं. बैठकीच्या खोलीत, आम्ही सगळे त्या जोडप्याची वाट पाहात होतो. 'आला क्षण–गेला क्षण'– म्हणत घड्याळ टिकटिकत होतं. पदार्थ थंड होत होते, अन् मी चांगलीच गरम. शेवटी नाइलाजानं, नायक नायिकेशिवाय नाटक करावं तसं त्या दोघांशिवाय आम्ही पदार्थांचा समाचार घेतला खरा. पण एकंदरीत सर्वच कार्यक्रम बेचव झाला. नंतर सावकाश चार-पाच दिवसानी दोघेही उगवले. बोलावल्याप्रमाणं आपण गेलो नाही याची खंत तर नव्हतीच, मग क्षमायाचना कुठली ! त्यांनी त्या दिवशी आमचा वेळ आणि विशेषत: माझा जीवही खाल्ला, टेबलावर अथवा ताटावर बसून वेळेवर न आलेल्या अशा पाहुण्यांची वाट किती तरी गृहिणींनी पाहिली असेल. त्यांना या खाल्लेल्या वेळेची किंमत जरूर कळेल !

तेव्हा आपणही या वेळ खाण्याबद्दल, मोठं जागरूक असावं. कुठल्याही कार्यक्रमाला वेळेवर जाण्यात जे सौजन्य असतं, जे व्यक्तिमत्त्वातलं देखणेपण दिसतं ते विलोभनीय असतं. ठरलेली वेळ पाळणं आणि उगीचंच वेळ न खाणं यामुळं तुमचीच प्रतिमा उंचावते. माझीच एकदा झालेली फजिती मी तुम्हाला सांगते. मी शाळेत असतानाची गोष्ट. प्रो. फडक्यांचं व्याख्यान होतं. नेहमीप्रमाणं आम्ही उशीराच

गेलो; आम्ही तिघी शाळकरी मुली आणि दोन मोठ्या बायका. व्याख्यान ऐकण्यापेक्षा 'जादुगार' फडक्यांना बघायलाच बरीच मोठी सभा होती. आमच्या छोट्याशा गावात तेवढं सभागृह नव्हतं, त्यामुळं मुख्य हायस्कूलच्या पटांगणावर ही सभा घेतली होती. ते पटांगण घरच्या अंगणापेक्षा मोठं होतं इतकंच. नेहमीप्रमाणंच समोर जागा बरीच होती; मागे मात्र मुंगीलाही मार्ग नव्हता. आम्ही गेलो तर व्याख्यान सुरू झालं होतं; आम्हाला समोर जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. आम्ही पाच जणी अन् आमच्या आडोशानं आणखी पाच-सहा 'लेट कमर्स', समोरच्या रिकाम्या जागेकडे वळलो.

प्रो. फडके आपलं व्याख्यान थांबवून शांतपणे उभे होते, आम्ही बसण्याची वाट पाहात. बाकीचा समुदायही, 'अहो, लवकर जागेवर बसून घ्या', असं न म्हणता, मूकपणे ते चलत्चित्र पाहात होता. वेळ लागला असेल दोन चार सेकंदच. ती सेकंदं गुणिले तो समुदाय आणि तो नामवंत व्याख्याता– किती वेळ खाल्ला आम्ही त्या वेळी ! त्या वेळेपासून वेळ पाळणं हा माझ्या बाबतीत 'मॅनिया' होऊन बसला आहे !

सुरुवातीला ज्या बाईची गोष्ट सांगितली– तिच्यासमोरच्या वेळ न दिलेल्या गोष्टींची यादी असते– त्यात एक म्हणजे न लिहिलेली पत्रं. अनेक एकाकी माणसं असतात, जी तुमच्या दोन ओळींची, दोन शब्दांची आसुसून वाट पाहात असतात. तेवढा वेळ देणं सहज शक्य असतं ठरवलं तर. आपल्या वेळेची गरज जशी लहान मुलांना असते, तशीच आजारी माणसं आणि वृद्ध यांनाही असते. आपल्या नातवांच्या बाललीला, आमच्या आयुष्यातल्या छोट्यामोठ्या गोष्टी, समान वयाच्या लोकांच्या बातम्या ऐकण्याकरिता ही पैलतीरी नेत्र लागलेली माणसं अधीर असतात. कारण फारसा वेळ आता त्यांच्याजवळ नसतो. अन् कितीसा वेळ आम्ही त्यांच्याकरता देतो ? एक वेळ अशीही येईल की, त्याच या वेळ देण्याची आम्हीही वाट पाहू– अन् आमच्याही करता वेळ खर्चायला कुणालाही वेळ होणार नाही. एकजण म्हणतो, 'आय वेस्टेड टाइम, अँड नाऊ डथ् टाइम वेस्ट मी'–

आजारी माणसाचं तसंच. त्या माणसाचा आजार कसा गंभीर आहे, अशा रोगाची माणसं कशी पटकन् दगावतात हे आजाऱ्याला सविस्तर ऐकविण्यापेक्षा, पाचसहा मिनिटे वेळ, एखादा दुसरा गुच्छ, छोटंसं 'Get well' कार्ड हे नेहमीच योग्य ठरतं. बऱ्याच वर्षापूर्वीची गोष्ट. मी एका गावी गेले असता तिथे माझी एक मैत्रीण असते, असं कळलं. अन् असंही कळलं, ती अतिशय आजारी असून दवाखान्यात आहे. माझ्या मैत्रिणीच्या सोबतीला असलेल्या स्त्रीला २-२॥ तासाकरता घरी जाणं आवश्यक होतं. माझ्या मैत्रीणीनं विचारलं 'तू थांबू शकतेस का ग!' मला गावही परकं. अन् उतरलेही होते परक्याकडे. मला जास्त थांबणं शक्य नव्हतं. नाइलाजानं, मी मुक्कामाला परतले खरी पण मनात रुखरुख बाळगीतच. तीच तिची माझी अखेरची भेट. त्या न दिलेल्या वेळेची बोच मला कायमचीच लागून राहणार. जरी पूर्णतया मी जबाबदार नसले तरी!

इंग्लिशमध्ये काळ (Time) हा म्हातारा माणूस कल्पिला आहे. त्याला मागे टक्कल, समोर फक्त केसाचे चारपाच झुपके-हातात कोयता. या टकलावरच्या झुपक्याना पकडणं, हा वेळ पकडणं म्हणजे मुष्किल कामगिरी आणि या सगळ्या वेळ देण्याघेण्याच्या घोळात आपण आपल्याला किती वेळ देतो! नाहीतर 'अरे! मी माझ्या आयुष्यात काहीच केलं नाही. कितीतरी गोष्टी मला माझ्या म्हणून करायच्या होत्या;' वैफल्याची भावना शेवटी निर्माण होते.

कामाच्या रामरगड्यात, जीवनाच्या धामधुमीत क्षणभर वेळ स्वत:ला देऊन अंतर्मुख व्हावं काय! अशीच एकजण-कॉलेजात असताना देखणी, हुशार, अनेक स्वप्नं उराशी बाळगणारी ती प्रत्यक्षात उतरविण्याची ताकद असलेली. पण काय परिवर्तन झालं कुणास ठाऊक! तिला एकंदरीत अंतर्बाह्य व्यक्तिमत्वाकडे पाह्यला फुरसदच नाही. इतके दिवस तिचं लक्ष जगाकडं नव्हतं. आता जगाचं तिच्याकडे नाही. आम्ही दिल्लीला संसार मांडला. तो दुसऱ्या महायुद्धाच्या काळात. महागाई आणि आवश्यक वस्तूंचं न मिळणं. दिल्लीची भयंकर थंडी. सतत गरम पाणी लागे. गॅस आणि गीझर्स यांच्या पूर्वीचा काळ.

कोळशाची खर विकत आणून गोळे करायचे- शेगडचा नीट पेटायच्या नाहीत. हे सकाळी ७ ला जायचे, रबराच्या झाडावर संशोधन करायला, अठरा मैल दूर. सकाळपासून शेगडीचं अग्निहोत्र सुरू. एक दिवस अशीच थकून, कंटाळून, त्या कोळशाच्या पसाऱ्यात मी बसले, फतकल् मारून. खरखरीत झालेले हात एकमेकावर चोळत.

इतक्यात मागचं दार वाजलं; अन् उघडलं गेलं. शेजारच्या गुप्तांची बायको–हातात चहाचे दोन कप, 'बेटा, मुझे मालूम है तू थक गई होगी। ले ये चाय पीले। जा जरा जल्दी हाथ मुँह धोके आ जा.' त्या कपभर चहाची खरोखरच मला जरूरी होती. अन् मग रोज साधारणतः ती वेळ आम्ही आमच्या चहाच्या कपाकरता ठेवत असू. हळूहळू थकल्या भागल्या चार-दोन गृहिणी एकत्र होऊ लागल्या. त्यावेळच्या त्यांच्या एकसुरी आयुष्यात तेवढेच क्षण–विसाव्याचे !

तर असं हे वेळेचं देणं ! त्याचं मोल एकदा पटलं की मग त्याचा अवास्तव खर्चही होणार नाही. जे काय करायचं ते वेळेवर करा–घटिकायंत्रातली वाळू हळूहळू खाली पडते आहे–त्यातला कण न् कण नीट खर्च करायला हवा. दान सत्पात्री हवं.

* *

पालखुणा

अथा तो ब्रह्मजिज्ञासा....

असं म्हणतात, हें ब्रह्मसूत्रातलं पहिलं वाक्य ! पण असल्या गंभीर विषयांशी आमचा बादरायण संबंधही नाही. तसं म्हटलं तर जिज्ञासा हे आमच्या जीवनातलं पहिलं सूत्र आहे खरं, पण ती जिज्ञासा-लोक तिला भोचकपणा म्हणतात. आम्ही तिला ब्रह्मापुरतीच मर्यादित ठेवली नसून तिनं सगळं ब्रह्मांडच व्यापलं आहे. चांगल्या गुणांना, नेहमीच वाईट नावं ठेवणारे लोक या जिज्ञासेला, कधी चांभारचौकशा, नस्ती उठाठेव असं वाटेल ते म्हणू देत. स्त्री जाती-बद्दलचा भलामोठा गैरसमज, हाच त्याच्या मुळाशी आहे.

त्याला कारण आदि स्त्री आहे, हेही तितकंच खरं ! नको म्हणून सांगितलेल्या झाडाचं फळ खाण्याचं ईव्हला तरी कारण ! इतर फळं भरपूर होती की ईडनच्या बगीच्यात ! पण जाणण्याची उत्सुकता, फाजील जिज्ञासा हा गुण तिच्यात होताच. तिनं फळ खाल्लं, ते झाड होतं म्हणे ज्ञानाचं. (म्हणजे ज्ञान पण झाडाला लागत असे की काय !) अन् त्या नको असलेल्या, ज्ञानाच्या झाडाचं फळ खाल्ल्यामुळे ॲडम अन् ईव्ह दोघांच्याही मागं लागली दुःखं आणि त्यांचं अमरत्व पण गेलं.

हा चिकित्सकपणाचा वारसा अर्थातच त्यांनी आपल्या पुत्र-पुत्रीकरता संभाळून ठेवला होताच; तो चालतच आहे अद्यावत् ! आणि संभाषणचातुर्यात तर तो फारच उपयोगी पडतो. काय असतं पहा, अगदी अनोळखी ठिकाणी संभाषण सुरू करायचं अन् ते चालू

ठेवायचं, कठीणच काम असतं. त्यातही आमच्या बिनीच्या प्रश्नात काही ठराविक असतात, निदान पूर्वी तरी ! 'काय हो ! कुठं असता' या प्रश्नाच्या उत्तरावरून रहाण्याच्या जागेवरून बरेचदा रहिवाश्याचं अर्थमानही कळून येतं. बोलणाऱ्या व्यक्ति विवाहित असल्या तर साहजिकच मुलं किती हा प्रश्न, तिकीट यंत्रातून खटकन् तिकीट बाहेर पडावं त्याप्रमाणं पटकन् येई ! - कितीहि खटकला तरी ! मग संभाषणाची गाडी रुळावर येई. विषयाची स्टेशनं घेत घेत !

पूर्वी बरेचदा पुणे रेडिओवर, दोन गुटगुटीत मुलांबद्दल चटचटीत घोषणा येत असताना जास्त मुलं असतीलच अशी अपेक्षा करणंच चूक नाही का ! आता नक्कीच, नेहमीच, एक अधिक एक दोनच होणार. 'इति सिद्धम् !' इतके दिवस जसं गणित अगणित वेळा चुकत असे तसं नाही व्हायचं. आणि दोन्ही मुलं पण गुटगुटीत बरं का ! माझ्या एकाच मुलाला गुटगुटीत करण्याच्या प्रयत्नात मी मात्र सुटसुटीत सुटले आहे. तेव्हा आता 'मुलं किती' हा प्रश्न 'फिजूल' आहे. आणि सर्वसाधारण ओळखीत असं व्यक्तिगत प्रश्न विचारायचं धाडस मी तरी करीत नाही. त्याला कारणही तसंच आहे. बरेच वर्षापूर्वीची गोष्ट. माझ्या सासूबाई माझ्याकडे आल्या होत्या. त्यांना कंपनी म्हणून त्यांच्या समवयस्क बायका मी बोलावल्या. सगळ्याच माझ्याहून मोठ्या, तेव्हा नुसतीच त्यांची नावानं ओळख करून दिली. 'बायोडेटा' द्यायची जरूर वाटली नाही.

मी आत चहा करत होते, इतक्यात एकीनं दुसरीला केलेला प्रश्न ओझरता ऐकला, अन् कान टवकारले, 'मुलं किती ? काय करतात ?' ज्यांच्याकडे हा प्रश्न फेकला गेला होता त्या दुर्दैवानं निपुत्रिक होत्या. होण्याचं वयही निघून गेलं होतं. खूपच लागला त्यांना तो प्रश्न. नको त्या प्रश्नांना उत्तर देता देता त्यांच्या जिभेला धारही आली असावी. ताडकन् त्या उत्तरल्या, 'नाहीत आम्हाला मुलं ! ज्यांना आहेत, त्यांनी तरी काय दिवे लावलेत.' वातावरणात वीज कडाडल्यासारखी वाटली. अन् सलामीलाच घडलेल्या त्या चकमकीमुळं तणाव मात्र निर्माण झाला.

ती गंभीर शांतता मी चहाच्या कपाच्या आवाजानं भंग केली हे खरं, पण खरी रंगत काही आली नाही. पण काही काही प्रसंग असे असतात, ठारविक नियम तिथे लागू पडत नाहीत. परवा काय झालं, खूपच वर्षांनी आमचे एक अमेरिकन मित्र आमचेकडे येणार होते, सपत्नीक. त्यांची बायको माझी चांगली मैत्रीण होती. अर्थात हे नक्कीच, की आल्या आल्या आम्हा मैत्रिणींच्या गप्पा चांगल्याच रंगणार, पण इतक्यात हे म्हणतात, 'डॉ. जॉन्सनला मिसेस जॉन्सन-बद्दल काही विचारू नकोस.' मी म्हटलं, 'म्हणजे काय, तिच्याबद्दल काय विचारायचं. तिलाच विचारीन की, काय हवं ते.'

'अग, पण ही पूर्वीची मिसेस जॉन्सन नाही. त्या दोघांनी एकमेकापासून घटस्फोट घेऊन, परत दुसऱ्याशी लग्नं केली आहेत.'

माझ्या मनात आलं, आता मी कुणाला आणि कुणाच्या मुलांबद्दल विचारू ? पहिल्या लग्नाच्या मुलांबद्दल, की एका कुटुंबातून झालेल्या दोन कुटुंबाच्या मुलांबद्दल ! 'तुमची मुलं, माझी मुलं आणि आपली मुलं' अशा या अनेक मुलांमुळे, मुलांचा मूळ प्रश्न बाजूलाच राहून ही कितवी बायको हा प्रश्न उद्भवला !

मला माझ्या सगळ्याच चौकशा दाबून ठेवाव्या लागल्या. एवढंच नव्हे तर एकंदर चौकस वृत्तीबद्दलच विचार करावासा वाटू लागला. तसं म्हटलं तर, कुतूहल अथवा जिज्ञासा हा मानवी मनाचा सहज धर्म आहे. तहान किंवा खाज, शमविल्याशिवाय चैन पडत नाही, तसंच या गुणाचं–रोगाचं आहे. अन् आहेही फार संसर्गजन्य. फार झपाट्यानं पसरतो. फक्त लागण एका व्यक्तीला अन् बळी दुसऱ्याचा अशी स्थिती असते याच्या बाबतीत. कारण उपयुक्त अशा ज्ञानाच्या बाबतीत, या कुतुहलाचा वापर केला जातो असं नसून, दुसऱ्यांना काय माहीत नाही, किंवा नको असलेल्या काय गोष्टी माहीत आहेत, हेच आपल्याला पाहिजे असतं.

पूर्वीपासून चालत आलेली एक प्रथा म्हणजे 'बाईचं वय अन् पुरुषाचा पगार' विचारू नये. पण असल्याच तर गोष्टी आपल्याला हव्या असतात, मनापासून जाणायला ! एक इंग्लिश लेखक म्हणतो,

Curiosity is looking over other people's affairs ovrlooking our own. ही जिज्ञासा म्हणजे दुसऱ्यांच्या गोष्टीत लक्ष घालायचं अन् आपल्या गोष्टीकडे दुर्लक्ष करायचं. आपलं नाक हे मोठं वाईट आहे. आपल्या जवळपासच्या दुर्गंधीची दखल घेत नाही; परंतु लांबवर चाललेल्या गोष्टींचा, ज्यांचा आपल्या आयुष्याशी दूरान्वयानंही संबंध नाही अशा गोष्टींचा मागोवा घेण्यात फार गोडी, गंमत वाटते. दुसऱ्याच्या दुःखाचा वास लवकर येतो. हे जे चौकसपणाच्या रोगानं पीडित लोक असतात, ते असतात सोनाराच्या नळीप्रमाणे. त्यात जसं इकडून तिकडे वारं जात असतं, तसंच हे लोक इकडच्या बातम्या तिकडे पसरविण्यात पटाईत. 'ऐकलंत का सोनूबाई !' सोनूबाई मोठ्या चवीनं ऐकत असते, चातुर्याने प्रश्न विचारीत असते. नाही त्या गोष्टींचा गंगौघ वाहत असतो.


लहानपणी इतिहासात आम्ही वाचलेलं होतं, चाँदबिबीनं खिडकीत आपलं राज्य स्थापलं. तसंच खिडकीत (म्हणजे आपल्या घराच्या) राज्य स्थापलेली एक व्यक्ति होती. नाव काय सांगायचं तिचं. लोकांनाच नावं ठेवायचा तिचा धंदा ! त्यांच्या फाजील चौकश्यांचं लक्ष झालेल्या बायका त्यांना भोचकभवानी म्हणायच्या. त्यांच्या भेदक डोळ्यातून, त्यांची मार्जारवृत्ति चांगलीच ओळखू यायची. एकानं असे उद्‌गारही काढले होते. Curiosity killed the cat but not the catliness. आवाजहि गुरगुरीत असा. वाढत्या वयानुसार घरात काम फारसं नसायचं, आणि होतं तरी काय ? वेळात वेळ काढून त्या खिडकीत हजर ! आजूबाच्या घरात काय चाललंय, काय ऐकू येतंय, त्याचा सुगावा घ्यायला ! खिडकीच्या चौकटीत फ्रेम केलेला त्यांचा कृष्णवर्णी चेहरा, भोंकर डोळे अन् भोचक वृत्ति ! कितीकाचे भविष्यकाळ त्यांच्या विषारी वाणीनं काळे केलेत ! लोकांची दुःखं तोंडी लावायला नेहमीच चविष्ट वाटतात !

हेहि मात्र तितकंच खरं, की अशाहि लोकांच्या आयुष्याची शेवटी चव जातेच. कारण कुठल्याहि विषयाचा रसास्वाद घेणं वेगळं,

पण तसं करताना, कुणाच्या आयुष्याचा चोथा होता कामा नये. गांधीलमाशीचा डंख हा उगाचच असतो, पण मधुमक्षिकेचा मधु-रक्षणाकरता असतो. तसंच शस्त्र वा गुण, अथवा कुठलीहि गोष्ट म्हणा, दुधारी असते. अन् आयुष्यात पुष्कळदा असली शस्त्रं बूमरँग प्रमाणं आपली आपल्यावरच उलटतात. तेव्हा कुठल्या गोष्टीचा कसा उपयोग करायचा ते आपणच ठरवायचं. 'अमृतं वा विषमीश्वरेच्छया' असं कवि म्हणत असला तरी आपणही असंच अमृताचं विष करत असतो नाही का? अन् ते विषही आपल्या एकटेपणानं प्राशन करावं लागतं!!

* *




REFBK-0024632